मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका



अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

युगवाणी

एप्रिल-मे-जून २०१५




चित्र : चंद्रगुप्त भालेराव

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

युगवाणी

एप्रिल-मे-जून २०१५



अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

युगवाणी

वर्ष ७१ वे / अंक पहिला

एप्रिल-मे-जून २०१५

संपादक
प्रा. अजय देशपांडे

मुखपृष्ठ मलपृष्ठ व आतील रंगीत चित्रे :
चंद्रगुप्त भालेराव
एकनाथ नगर, परभणी
भ्रमणभाष ०२४५२२२५५८५, ८००७३४८४१८

मांडणी, सजावट, अक्षरजुळवणी व मुद्रण :
ॲक्टिव्ह कॉम्प्युटर, वणी, जि.यवतमाळ

मूल्य : शंभर रुपये

वार्षिक वर्गणी : २०० रुपये

ISSN - 2319-6092


प्रकाशक
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक,
नागपूर - ४४००१२
दूरध्वनी ०७१२-२५२३९२९, २५५३७६७

वर्गणी व अंकासंबंधी चौकशीकरिता
दूरध्वनी ०७१२-२५४००१४ / भ्रमणभाष ९९६००३११४८

संपादकीय पत्रव्यवहार
प्रा.अजय देशपांडे
वामनघाट मार्ग, हनुमान नगर,वणी ४४५३०४, जि. यवतमाळ
भ्रमणध्वनी ९८५०५९३०३०
ई-मेल srushti_ajay@rediffmail.com, yugwanivss@rediffmail.com

www.facebook.com/yugwani.ank@gmail.com

अनुक्रमणिका



अनुक्रम

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्‌मयीन नियतकालिक
युगवाणी
एप्रिल-मे-जून २०१५

|| आदरांजली ||

शोभाताई उबगडे

डॉ. विलास चिंतामण देशपांडे

कर्तबगार, ध्येयवादी व निःस्पृह अशा विदर्भ साहित्य संघाच्या सरचिटणीस शोभा उबगडे यांच्या संबंधीचा मृत्यूलेख लिहिताना होणारी मनाची अनुकंपनीय स्थिती वर्णन करून सांगता येत नाही. प्रत्येक मनुष्य जन्मास येतो, हळूहळू आपला पसारा वाढवतो, आपल्या कल्पनेप्रमाणे व शक्तीप्रमाणे आपले ध्येय आखतो, त्यानुसार जगात कार्य करतो आणि अखेर आला तसा निघून जातो ! त्याचे कार्य मात्र मागे राहते. त्याच्या कार्याचे स्वरूप, त्याचा स्वभाव व वागणूक यावरून त्याच्या योग्यतेची कल्पना पटते. मूल्य आणि किंमत यामधील फरक माणूस विसरत चाललेल्या या जगात शोभाताईंचे जाणे मनाला व्याकूळ चटका लावून जाणारे आहे, हे त्यांच्यातील या योग्यते मुळेच !

स्वकेंद्रित संस्थाधिपती आणि त्यांचे संस्थात्मक राजकारण पाहून सामान्य नागरिक हताश झाला आहे. बरबटलेले संस्थात्मक राजकारण सामान्य नागरिकाच्या अपेक्षा पूर्ण करणार नाही. परिणामी बरबटलेले संस्थात्मक राजकारण संस्थांच्या उद्दिष्टांच्यावाढीबरोबरच आहे रे आणि नाही रे यातील दरी वाढवित आहे. या भग्न स्थितीवर भगभगीत झोत टाकला जातोही. अशा प्रकारची स्थिती बहुतेक सर्वच संस्थांमधून आढळून येते. नव्या युगातील नवा नागरिक त्यामुळे भांबावून गेलेला दिसतो. जणू त्याला दिलासा देण्यासाठीच उबगडेंची विदर्भ साहित्य संघाच्या सरचिटणीसपदी नियुक्ती झाली असावी असे वाटते. व्यावहारिक घटनांचे अंतर्गतमूल्य संस्थात्मक जीवन भ्रष्ट करीत नाही ना; याकडे शोभाताईंचे सतत लक्ष असे. विदर्भ साहित्य संघाच्या सरचिटणीसपदाची रयाच त्यांनी बदलवून टाकली. साहित्य संस्थेच्या कक्षा सामान्य लोकांसाठी त्यांनी रुंदावल्यात आणि साहित्य संस्था सामान्यात नेऊन सोडली.

सुखदा (हॅपिनेस), सद्‌गुण आणि सत्य मिळविणे हा प्रत्येकाचा हक्क आहे. या तीन गोष्टी सर्वसामान्यांना मिळण्याच्या आड येतो तो समाजातील काही माणसांचा दृष्टपणा. कधीकधी माणसाच्या कमकुवतपणामुळे या तीन गोष्टी त्याला प्राप्त होत नाहीत. कमकुवतपणा त्याच्या अज्ञानामुळे वा त्याला जाणूनबुजून अज्ञानात ठेवल्या गेल्यामुळे आलेला असतो. 'संस्थात्मक स्वच्छता' (इन्स्टिट्यूशनल हायजिन) वापरून तो बरा करण्याचा प्रयत्न करणे हे कोणत्याही संस्थेतील सरचिटणीसाचे आद्य कर्तव्य आहे. शोभाताई सरचिटणीस पदाच्या या व्याख्येत चपखल बसतात. सेवाभावी संस्थांमधील कार्यकारी, पदाधिकारी आपल्याला संस्थांचे सेवक नव्हे तर मालक समजून त्या तोऱ्यात वागू लागले आहेत, असे चित्र दिसते. उबगडेंच्या बाबतीत हा तोरा त्यांच्या वागणुकीतून व वर्तवणुकीतून कधीच दिसला नाही.



शोभाताई उबगडे

सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, नागपूर

भावपूर्ण

आदरांजली...

• विदर्भ साहित्य संघ, नागपूर •

संत कबीराचे एक वचन आहे, 'जिसे कुछ नहीं चाहिए वहीं शहेनशाह!' उबगडे याचे मूर्तिमंत उदाहरण होत्या. नैतिकता ही मूल्यांची गंगोत्री आहे. कृतकृत्य जीवन व कृतार्थ जीवन हे एकरूप आहेत; यावर त्यांचा गाढ विश्वास होता. त्या तसे बोलूनही दाखवित असत. वक्तशीरपणा, जीवनाकडे पाहण्याची त्यांची विशिष्ट दृष्टी, त्यांचे निर्वैरत्व व सर्वात समानत्व पाहण्याची ममतायुक्त समत्वदृष्टी त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व उठून दिसत असे.

आपली प्रशासकीय कारकीर्द गाजवावी अशी महत्त्वाकांक्षा त्यांच्या मनात कधीच नव्हती. २००५ सालच्या एप्रिलमध्ये विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारिणीत माझा प्रवेश झाला, अन् माझी कार्यालयीन चिटणीस या पदावर नियुक्ती झाली. त्यानंतर दैनंदिन कामकाजातील एक त्यांचा सहकारी म्हणून माझा त्यांच्याशी जसाजसा नित्याचा संबंध येऊ लागला तसातसा एक सरचिटणीस म्हणून उबगडेंचे गुणविशेष माझ्या नजरेस येऊ लागले. २००१ साली उबगडे सरचिटणीसदी विराजमान झाल्या. तत्पूर्वी सरचिटणीसांचे पद हे एक प्रकारचा दरारा निर्माण करणारे होते. हा दरारा त्यांनी आपुलकीत परावर्तित केला.

मराठीविषयक चर्चा करणे हा त्यांचा आवडता विषय होता. उबगडे केव्हाही, कुठेही व कुणाशीही मराठी भाषेवर चर्चा करण्यास आनंदाने तयार असत. त्यांचा पिंडच तसा होता, पण त्यांच्या चर्चेत हटवाद मात्र कधीच नव्हता. शिष्टपणाची व औपचारिकतेची नावड, मनःपूर्वकता, मनमोकळेपणा, प्रतिपक्षाची विचारसरणी व त्यातील ग्राह्यांश कबूल करण्याचा प्रांजळपणा आणि मराठी भाषाविषयक तत्त्वाचे ऐतिहासिक दृष्टिकोनातून केलेले मूलग्राही विवरण हे उबगडेंच्या चर्चेत हटकून आढळतात. त्यांच्या मते, अडचण मराठी भाषेची नसून मराठी लिहिणाऱ्या लेखकांची आहे. परिणामी या मनोवृत्तीवरून नेहमी मराठी विषयक वाद करण्याची त्यांची सवय असल्यामुळेच त्यांच्या कार्यकाळातील 'परीक्षा समिती' विदर्भ साहित्य संघाचे कायम भूषण होऊन राहिले आहे. विदर्भ साहित्य संघाच्या परीक्षांना गती देण्याच्या कामात त्यांचे फार मोठे योगदान आहे.

संस्थेचे कार्य करताना कितीही कडाक्याचा वाद झाला तरीही आपल्या मनाचा समतोलपणा सहसा ढळू न देण्याचा उबगडेंचा गुण ज्यांच्याशी त्यांचे वाद होत असत त्यांच्याशी स्नेह जमविण्यास व टिकविण्यास कारण होत असे. उबगडे या सत्यवक्त्या आणि स्पष्टवक्त्या होत्या. त्यांच्या स्वभावाच्या सरळपणामुळे त्यांच्याविषयी कुणाचा सहसा गैरसमज होत नसे. उत्कट सहवासाने त्यांच्याशी मतभेद असणाऱ्यालाही त्या जास्त प्रिय होत असत. त्यामुळे उबगडेंचे मित्रमंडळ फार मोठे होते.

मुंबई इलाक्यात जन्माला आलेल्या शोभाताई उबगडे यांना त्यांना नकोसे असलेल्या नागपूरात सार्वजनिक जीवनाची दिशा सापडली हे खरेच आहे. ही दिशा देण्यात मनोहर म्हैसाळकर यांचा वाटा मोठा. आपले संस्थात्मक मार्गदर्शक म्हणून ज्यांचा उबगडे आदराने उल्लेख करीत असत त्यात मनोहर म्हैसाळकरांचे नाव अग्रक्रमात असे. आपण अपेक्षित बदल संस्थेत घडवून आणू शकतो हा विश्वास उबडेंना म्हैसाळकरांनीच दिला होता. त्यामुळे शोभाताईंनी असा विश्वास बाळगून आपले नैतिक आणि आत्मिक बळ हीच आपली खरी साधनसामुग्री आहे हे जाणून घेऊन ती मात्र सतत आपल्या आत अंतापर्यंत जागृत ठेवली होती.

शोभा अरुण उबगडे या संस्थात्मक जीवनात निरपेक्ष बुद्धिने व वृत्तीने सचोटीने कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या एका पिढीचे उत्तम प्रतिनिधी होत्या. सामाजिक प्रश्नांचा विचार करतानाही त्यांचा नीतिविवेक जागृत होता. त्यांच्या कार्यरूपाने त्या आपल्यात उपस्थित आहेत. त्यांच्या कर्मनिष्ठेची व नैतिक जीवन जगण्याच्या पद्धतीची थोडी जरी दीक्षा संस्थात्मक जीवनात येऊ पाहणाऱ्यांनी घेतली तरी ती मोठी गोष्ट होईल.

। डॉ. विलास चिंतामण देशपांडे

सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, नागपूर

एफ. एन. ३०१, सुजाता मेन्शन,
४ पायोनियर सोसायटी,
स्वावलंबी नगर, नागपूर - ४४० ०२५
भ्रमणभाष : ९९६००३११४८

|| आदरांजली ||

बाई विणते धागे...

शुभदा फडणवीस

देता यावे हसू निरभ्र अकलंकित
देता यावे हात निर्हेतुक आश्वासक
देता यावे शब्द अम्लान निःसंशय
देता यावे हृदय अपार निरामय

अरुणा ढेरेंच्या कल्पनेतलं दातृत्त्व आम्ही प्रत्यक्ष अनुभवलं विदर्भ साहित्य संघाच्या सरचिटणीस शोभाताईंच्या रूपात. सुहास्य स्वागत, आश्वासक सहकार्य, मनमोकळा संवाद आणि अपार निरामय नातं जोडण्याचं कौशल्य हे गुण शोभाताईंच्या अंतरंगातला अक्षय्य झरा होते. त्याची पाझर आणि ओल गेली ४०-४२ वर्ष विदर्भ साहित्य संघातल्या आणि बाहेरून येणाऱ्या व्यक्तीला जाणवत होती. या ओलाव्यामुळे ती व्यक्ती संस्थेशी जोडली जात होती, एका विलक्षण मायेनं.

९२ वर्ष पूर्ण केलेली संस्था... त्यातील ४० वर्ष एक स्त्री या संस्थेची परम निष्ठेनं सेवा करते... या प्रदेशातील साहित्यिक चळवळींना शिरोधार्य मानते, साहित्य संघाच्या वाटचालीलाच आपला जीवन प्रवास म्हणून स्वीकारते... तिचं असं जाणं ही विदर्भातल्या साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्रातली खळबळजनक घटना ठरते.

१९७५-७६ दरम्यान शोभा अरुण उबगडे साहित्य संघात आल्या अभ्यासक म्हणून. पुढे बैतुले सरांना परीक्षा समिती कार्यात सहकार्य करीत... त्या परीक्षा समिती संचालक झाल्या. २२ वर्ष त्यांनी मराठी भाषेचा प्रसार-प्रचार करण्याच्या हेतूने राबविण्यात येणारा हा प्रकल्प आपल्या विशिष्ट कार्यपद्धतीनं आणि लोकविश्वासातून एका वेगळ्या उंचीवर नेला. २००१ पासून त्या सरचिटणीसपदी रुजू झाल्या अन् त्याच्या जबाबदाऱ्या वाढल्या. वि. सा. संघाची प्रतिष्ठा आणि वाङ्मयीन परंपरा यांचे संगोपन-संवर्धन करण्याचा वसाच त्यांनी अंगीकारला. सकाळी साहित्य संघ उघडल्यापासनू रात्री शेवटचा माणूस तिथून निघेपर्यंत शोभाताईंचा जीव आणि मन संघातच असायचं. शोभा उबगडेंच्या शोभाताई, शोभाकाकू, शोभामावशी, शोभाआजी झाल्या. मात्र तोच उत्साह, तीच पॅशन, तेच पझेशन, निष्ठा, आधार, आश्वासन, प्रेम आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे वि. सा. संघात घडणाऱ्या प्रत्येक घटनेची नैतिक जबाबदारी मनःपूर्वक उचलणाऱ्या म्हणूनच सामर्थ्यवान, निर्भिड आणि सच्चा अशा शोभाताई, सगळ्यांच्या मनात आदरस्थान प्राप्त करून राहित्या.

संस्था हेच जीवन, प्रसिद्धीची अपेक्षा नाही की संधीची लालसा नाही. समारंभाची तयारी सांभाळणे, बातम्या गेल्या का? निमंत्रण पत्रिका छापायला गेल्या? प्रूफ बघितलं? छापून आल्या? पोस्ट झाल्या? बॅनर झाला का? समई, सन्मानचिन्ह, शाल-श्रीफळ, पुष्पगुच्छ, आसनव्यवस्था, ध्वनी-प्रकाश

अनुक्रमणिका

व्यवस्था, स्वच्छता, रूपरेखा, येणाऱ्या मान्यवरांचं आदरातिथ्य, चहापाणी आवरासावर... नंतरच घराकडे प्रस्थान.

साहित्य संस्थांमध्ये काम करणाऱ्या स्त्रियांसाठी निःस्पृह, निरपेक्ष कार्यकर्त्यांचा आदर्श म्हणजे शोभाताई आणि प्रेरणा म्हणजे त्यांची संस्थेप्रतीची निष्ठा आणि समर्पण. हे सूत्र आम्ही अनुभवले.

वि. सा. संघात रोज येणारे कार्यकारिणी सदस्य, हितचिंतक, कर्मचारी एका परिवाराप्रमाणे राहतात. त्यांना ज्या स्नेहशक्तिबंधनानं एकत्र ठेवलं ती म्हणजे शोभाताई. प्रत्येकांशी वेगळा वैशिष्ट्यपूर्ण संबंध. त्यांच्या नात्याचा पोतच निराळा. दोन व्यक्तींमध्ये मतभेद असतील तर दोघांच्या मनातला उद्रेक शोभाताईंसमोर व्यक्त होई एकेकट्यात... आणि शोभाताई जणू त्याच्याच बाजूनं आहेत असा प्रेमळ भास निर्माण करी... समोरचा शांत होईस्तोवर. एक प्रकरण मिटल्याच्या समाधानात शोभाताई चहाचा आदेश देत प्रेमळपणे.

घरातली कर्ती स्त्री जी कुटुंबातल्या प्रत्येक घटकाची, चीज वस्तूंची निगुतीनं काळजी वाहते तशाच शोभाताई साहित्य संघात असत. कमलाकर, रंगारी, हिरामण या कर्मचाऱ्यांच्या मनात त्याचं स्थान उंचीवरचं. कुणापाशीही आपल्या अडचणी न सांगणारी ही मंडळी शोभाताईंना एकट्यात गाठून मोकळी होत. बाई त्यांचे स-अर्थ प्रश्न सोडवीत असत. मोहिते-मोहनसाठी त्या म्हणजे एक हक्काचं स्थान. आपल्या कमावत्या कर्त्या मुलाशी आई जशी समजुतीनं, स्नेहादरानं वागते तशाच शोभाताई मोहिते-मोहनशी वागत. दैनंदिन कार्याच्या सुविहिततेसाठी कार्यकारिणी सदस्यांना त्यांच्या त्यांच्या कामात मदत, मार्गदर्शन करीत आणि जणू काही व्यक्तिशः त्या उपकृत होतायत एवढा कृतज्ञभाव व्यक्त करीत. साहित्य संघात येणारे मान्यवर, कलावंत, पत्रकार, उदयोन्मुख साहित्यिक, रसिक श्रोता या सगळ्यांशी अगदी भावपूर्ण नातं असे त्यांचं, नुसतं नातं नाही तर बंधन. प्रत्येक नात्याची शक्ती, कोमलता, भावतंत्र सांभाळण्यासाठी विलक्षण हातोटी त्यांना आत्मसात होती. सॉरी, थँक यू, आभार याशिवाय कुठलाच संवाद पूर्ण होत नसे त्यांचा... तो त्यांचा विनयही होता आणि वातावरण प्रयत्नपूर्वक प्रसन्न ठेवण्यासाठीचा हेतुपुरस्पर विवेकही होता.

स्त्री मनाची वीण, स्त्री सर्जनाचा पोत, स्त्रीत्वाचा रेशमी गाभा, स्त्रीच्या अंतर्मनातील आभा, स्त्रीचं साकार जगणं शोभाताईंमध्ये साक्षात बघितलं.

बाई विणते जमेल तसं, जगण्याच्या जंजाळातून निसटणारा
उचलते नेमक्या क्षणांचा टाका, एकाचे दोन करते, दोनाचे चार
उलगडते कुशल बोटांनी गुंता सरासर
बाई सहज करते उलट्याला सुलटं आणि गरज पडेल तेव्हा
सुलटाही सहज उलटा होतो तिच्यासाठी
तिच्यासारखंच तिचं विणकाम ती सांभाळत नेते
धागा तुटू देत नाही की वसू देत नाही गाठी
हात घट्ट नसतो फार की नसतो फार सैलही
ती सहजपणे नेमक्या जागी कमी-जास्त करते टाक्यांचा पसारा
करते तयार लहान-मोठ्या दुखऱ्या आनंदाचे आकार
करते हौस म्हणून... आपल्या जिवाचे धागे विणून...

अशाच जगल्या शोभाताई विणत गुंफत. अशीच प्रतिमा त्यांच्या विषयीची आणि वावरण्यातही पवित्र समज. अक्षरशः आपल्या जिवाचे धागे विणून शोभाताईंनी सामाजिक कार्याला समर्पित केले आपल्या आयुष्याचे मौलिक क्षण. त्यांच्या या चारित्र्याची पाळंमुळं त्यांनी आईवडिलांविना सोसलेल्या बालपणात आहे. आजी-आजोबांविषयीची कमालीची कृतज्ञता, सासरच्याविषयींचा ओतप्रोत आदर, अरूण उबगडेंची अनमोल साथ. संसारातली सुबत्ता, वैभव. मात्र अभावग्रस्तांबाबत सौजन्यपूर्ण जाणिवा यावर आधारलेलं त्यांचं सौहार्द्रपूर्ण, संवेदनशील आणि स्नेहार्द्र व्यक्तित्व.

त्या प्रतिभावंत होत्या, व्यासंगी, ग्रंथप्रेमी होत्या. लग्नानंतर बी.ए., एम.ए., एम.फिल., साहित्याचार्य (म), आचार्य (हिं) या पदव्या प्रावीण्य श्रेणीत प्राप्त केल्या होत्या. पूर्व प्राथमिक ते पारंगतपर्यंतच्या विद्यार्थ्यांना, यूपीएससी, एमपीएससी, आयएएस आणि शासकीय कर्मचाऱ्यांना मराठी शिकविणे हा त्यांचा व्यवसाय होता. त्यांची दोन अनुवादित पुस्तकं आहेत. डॉ. सत्यनारायण सक्सेनांच्या निवडक व्यंगलेखांचा अनुवाद त्यांनी केला होता. 'काजळमाया-समीक्षा,स्वरूप' जी. ए. कुळकर्णींच्या कथांवरील समीक्षा, प्रा. राम शेवाळकरांच्या 'पत्र संवाद'चं संपादन आणि माजी राज्यपाल रजनी राय यांचे आत्मचरित्र 'सप्तपदी'चा मराठी अनुवाद हे त्याचं लेखन कर्तृत्व. किंबहुना लेखिका म्हणून कधीही त्यांनी स्वतःला पोज केलं नाही. एवढंच काय श्रीमती कमल आवटी (मुंबई) स्मृती पुरस्कारनं त्या सन्मानित झाल्याचं बातमी वाचल्यानंतरच आम्हाला कळलं... गौरवापासूनही लांब होत्या त्या.

विनोद करायला... मनसोक्त दाद देऊन खळखळ

हसायला त्यांना आवडायचं. वयाला कुठेही मधे न आणता सर्व प्रकारच्या गप्पांत रमायच्या. उदास, निराश व्यक्ती त्या मूडमधून बाहेर पडेपर्यंत जपायच्या त्याला. अभिनंदन, शाबासकी, कौतुक करणं, कुणाच्या असण्या-नसण्याची दखल घेणं... आणि बाहेर गाजावाजा नको अशा गोष्टी आणि व्यक्तींना कुशलतेनं झाकून नेणं. काय काय केलंय त्यांनी...

विदर्भ साहित्य संघाच्या सरचिटणीसपदी रुजू झाल्यानंतर त्यांच्या व्यक्तिमत्त्वात लक्षणीय परिवर्तन झाल्याचं सगळ्यांनी बघितलं. सुरुवातीला परीक्षा समितीची कार्यपद्धती बदललेली त्यांना रुचत नसे. मात्र त्यांच्या स्वभावात एवढी कमालीची ऋजुता होती की, 'मी असं करीत होते... आता तुम्हाला जे योग्य वाटतं ते आणि तसं तुम्ही करा' एवढी मृदू वॉर्निंग त्या देत पण लक्ष मात्र सदैव परीक्षा समितीकडे ठेवित. हळूहळू त्यांना माझ्यात विश्वास वाटायला लागला आणि त्या मनानी निश्चिंत होऊ लागल्या. तरीही परीक्षांच्या वेळी, सभेच्या वेळी आवर्जून पूर्ण उत्साहानी सोबत असायच्या त्या. ग्रंथालयासंदर्भात असाच अनुभव. ग्रंथ-ग्रंथालय यांच्या रचनेत बदल झालेलाही त्यांनी अस्वस्थ करीत असे आणि अधिकाधिक वाचकांना ग्रंथालयाचा लाभ मिळावा यासाठी त्या स्वतःच्या नावावरही अनेकदा अनेकांसाठी पुस्तके घेत... कुणीपरत केली नाही की भरपाई भरायची सुद्धा त्यांची तयारी असे. संस्थेचं कुठलचं काम पैशाशिवाय अडणार नाही किंवा कामाला कुणी माणूस नाही म्हणून थांबलंय हे त्यांना मान्यच नव्हत. अगदी कप-बशा, क्रॉकरी, चादरी, फ्लॉवर पॉट्स, टेबल क्लॉथ, ट्रेज, डस्ट बीन्स, हॅन्ड वॉश, मेणबत्त्या, आगपेट्या इ. शोभाताईंच पुरवठा मंत्री. त्या सार्थ सहकार्यासाठी सदैव तत्पर. संस्थेत आलेला प्रत्येक व्यक्ती समाधान घेऊन आणि इथल्या प्रतिष्ठेची खूण मनात घेऊनच इथून बाहेर पडावा यासाठी त्या मनःपूर्वक प्रयत्न करीत असत. नकळत कुटुंबातल्या वत्सल स्त्रीचा वावर त्यांच्या रूपानं या कार्यालयानं अनुभवला. हे सगळ अद्वितीय वाटतं मला.

गंभीर झाल्या की जीएंच्या कथांचा आधार घ्यायच्या आणि त्याचा संबंध जीवनाशी जोडायच्या, म्हणायच्या व्यक्तिगत जीवनातले अनुभव असेच असतात. कुठून कुठून एकत्र आलेल्या माणसांच्या गुंतवळीत राहूनही आपण एकाकी असल्याची जाणीव विसरली जात नाही. आयुष्याचा प्रवास एकाकीच. तरीही अस्तित्वाची मुद्रा मागं ठेवण्यासाठी आत्मभान सांभाळायचं. शेवटी काळाच्या, नियतीच्या हातातली आपण सामान्य माणसं.

स्वतःला सामान्य समजणाऱ्या शोभाताई विलक्षण असामान्य होत्या, हे या क्षेत्राला ज्ञात आहे.


संस्था खूप मोठी असते. त्यात विदर्भ साहित्य संघ तर फारच मोठी, महत्त्वाची प्रतिष्ठित संस्था. या संस्थेच्या भव्यदिव्य परंपरेपुढे, प्रतिमेपुढे एक कार्यकर्ता खूपच लहान असतो. त्याचं अस्तित्व त्या संस्थेमुळेच असतं. तरीही या संस्थेचं मोठेपण अबाधित राखण्यासाठी, तद्वतच दिसामाजी अधिकाधिक उंचावण्यासाठी जो निष्ठापूर्वक योगदान देतो तो सच्चा निष्ठावंत कार्यकर्ता ठरतो. शोभाताईंना हे सत्य कळलं होतं... तीच पवित्र समज घेऊन त्या जगल्या.... म्हणूनच विदर्भ साहित्य संघाच्या इतिहासात आणि भविष्यात एक सुगंधी पुष्प, चंदनी गंध बनून त्या अनेकानेक वर्ष आणि पिढ्यानुपिढ्या विदर्भ साहित्य संघाचा अविभाज्य सुगंध म्हणून उरतील... पसरतील... दरवळतील... आठवत राहतील... प्रेरित करत राहतील आमच्यासारख्यांना !

। शुभदा फडणवीस
१७, 'मैत्र', जय बद्रिनाथ ले-आऊट,
खामला, नागपूर - ४४० ०२२
भ्रमणभाष : ९८६०२८०२६८

।। वर्गणीदारांसाठी सूचना ।।

- 'युगवाणी'चे अंक मिळण्यासाठी वर्गणीदारच व्हावे हे उत्तम.
- 'युगवाणी'च्या एका वर्षातील चार अंकांची वर्गणी २०० रूपये आहे.
- वर्गणी मनीऑर्डर, धनादेश किंवा डिमांड ड्राफ्टने ('युगवाणी' या नावाचा) स्वीकाराण्यात येईल.
- पत्ता : विदर्भ साहित्य संघ, सांस्कृतिक संकुल, झाशीराणी चौक, सीतावर्डी, नागपूर - ४४० ०१२.

अनुक्रमणिका



उधळलेल्या भंडाऱ्याची कहाणी

डॉ. वीरा राठोड

■

हा अस्वस्थ मनाचा पक्षी. त्याला रोग एकांताचा. तो पुन्हा पुन्हा घेतोय आकाश घिरट्या. कुणासाठी कुरतडतोय काळीज स्वतःचे त्याच्या पंखांना हमी नाही. त्याच्या पावलांना सापडला नाही गाव, की ठाव ना ठिकाणा. तो सदोदीत रडत असतो, विव्हळत असतो मनातल्या मनात तान्ह्याबाळाप्रमाणे. हा खेळ जिवावर उठणारा आहे. माहीत असूनही हा बाळहट्ट सुटत नाही, अर्धा मुर्धा पिकून गेलोय तरी. ही मृगजळास पकडण्याची भारी तल्लफ केव्हापासून जडलीय हे माहीत नाही. जेव्हा कळता झाला तेव्हा या व्यसनाच्या इतक्या आहारी गेला होता की, सारे परतीचे दोर तुटून गेले होते, पुढे आणि फक्त पुढे जाण्याशिवाय कुठलाच रस्ता नव्हता त्याच्याकडे. म्हणूनच तो भंडारा उधळायला सिद्ध होऊ शकला.

त्या मायबाईने काय म्हणून टोचली असेल ही कवितेची अचाट वेसन या नाकपुड्यात, कानातल्या बाळ्यांसोबत. ही नाकाला दिलेली कवितेची नशा खात्रीशीरपणे पुरेल शेवटपर्यंत. हे एखाद्या नाटकातले स्वगत नाही वा नाहीत रंगमंचावरील मेकअप केलेले संवाद. हे आहेत जीवनाच्या पटावरील स्पंदने. ही आहे जगण्यातुन येणारी कवितेची शाळा. इथेच मला रोज जगण्यातल्या बाराखडीतले एक एक अक्षर परिचित होत जातात आणि मी त्यांना गिरवत असतो, घोळत-घोकत बसतो. या संपूर्ण प्रवासात दुःखाने माझ्या जगण्याला असंख्य डागण्या दिल्यात. पावला पावलांवर जसे जाळ पेरणारे, काटे पसरवणारे भेटले तसेच असंख्य जीव लावणारेही पाठीशी आधार बनून उभे राहिले. या संपूर्ण घालमेलीत कधी निराश झालो, हताश झालो, मात्र थांबलो नाही. मला सतत प्रवाही ठेवण्याचे काम कवितेने केले. ती म्हणायची 'कोशीश करनेवालो की हार नही होती' तिने कधीच हाथ टेकू दिले नाही म्हणून मी तिला पुन्हा पुन्हा विनवणी करीत असतो, 'तू अबोला घेऊ नकोस, जगण्याचा रस्ता संपेल हाताशी आलेला'

कोणताही व्यक्ती माय आणि सखी या दोन ठिकाणी संपूर्णपणे रिता होत असतो आणि जो कवी असतो त्याला तिसरी हक्काची जागा असते ती कवितेकडे. गोंधळून गेलेल्या भोवतालच्या अंधाऱ्या कोलाहलाला घाबरलेल्या, हतबल निराश झालेल्याला माय आणि सखीची कुसच शांत करीत असते, धीर देत असते. साऱ्या प्रार्थनांचे अर्थ इथेच जन्म घेत असतात. आणि इथेच कळतही असतात. अशीच कूस बहुधा कवितेलाही लाभली असावी अशी माझी भाबडी कल्पना आहे. तिने जसे मला प्रकाशमान केले, तशीच स्पष्ट विचारांची तेजस्वी वाटही दाखवली आहे. या दुनियेच्या रहदारीतील भटकणाऱ्या माझ्यासारख्या एका मुसाफीराला ओळख दिलीय.

मी जसा दुर्लक्षित जगातला तसेच माझ्या कवितांचे विषय सुद्धा याच पर्यावरणातले. अनंत काळापासून मुक्याने तोंड

शिवून जगणाऱ्या जीवांमधुन या कवितेचा आक्रोश बाहेर पडू पाहतोय. तो आपली विवंचना, यातना, वनवासी, उपेक्षित जगणे प्रश्नांकीत करू पाहतोय, तिला स्वांत सुखाय व्यक्त व्हायचे नाही, क्षणभराच्या विरंगुळ्यासाठी गायचे नाही तर हक्क आणि अधिकारासाठीचा नारा देताना दुःखी जनांची रुदाली गायची आहे. म्हणून तिने आरंभापासूनच भंडारा उधळायला सुरुवात केली आहे. या नवनिर्माणाच्या यज्ञात काय होईल याची तिला कुठलीच पर्वा नाही. कारण तिला मृत्यूची पुरती ओळख आहे आणि अंतिमतः आपली मृत्यूशीच गाठ आहे. याची पूर्ण कल्पना आहे. म्हणून ती हातात जाळ घेऊन पुढचा काळ पेटवण्याची हमी देत जाते. मानवतेचे, परिवर्तनाचे गाणे गाऊ लागलेली आहे. 'सेनं सायी वेस' (सर्वांचं कल्याण कर) हा तिचा आरंभ. जगाच्या कल्याणाचा विचार हरएकाच्या मनामनात पेरती झालीय.

माझ्या अवती भवतीच्या घडणाऱ्या घटीतांचा माझ्यावर जसा परिणाम होतो तसाच परिणाम सहाजिकच माझ्या कवितेवरही होतोच होतो. ती हे सारे पचवून सिद्ध होत जाते. मनावी जीवनातल्या सुख दुःखाच्या चक्रातून वाट शोधत असताना उज्वल भविष्याचा वेध घेत असते. तिचे मातीवर प्रेम आहे. माणसावर प्रेम आहे. माणसाची आणि मातीची नाती सांधायचा दृढ निश्चय तिने केला आहे. भोवतालच्या निबिड अशा जिवघेण्या अंधारातून वाटचाल करताना निर्भीडपणे छातीपुढे काढून ताठ मानेने चालू लागलेली आहे कारण तिला लबाडीचा कसलाच डाग लागलेला नाही आणि ती लागूही देणार नाही. कारण तिला प्रकाशयात्री म्हणून उजेडाचे दान वाटत राहायचं आहे. खरं तर मी आणि माझी कविता आरंभापासूनच पुरोगामी विचार आणि चळवळींच्या अनेक परंपरांशी जोडल्या गेल्याने तिची भूमिका ही नक्कीच मानवतावादाची राहिली आहे. आणि ती पुढेही राहणार आहेच कारण तिने बुद्ध, कबीर, तुकाराम आणि सेवालाल यांच्या हातात हात घातलाय. म्हणून तिला जळण्याची आणि जाळण्याची कसलीच भीती वाटत नाही.


लमाण बंजारा तांड्याचे तथा भटक्या विमुक्तांचे जगणे, त्यांचे प्रश्न जवळून पाहिल्याने, अनुभवल्याने, त्यांची परवड, त्यांच्या हालअपेष्टा या कवितेचा विषय बनून जातात त्यांच्या यातनांना आवाज देण्याची हमी मी कवितेच्या माध्यमाने भरत असतो. हे सारं करताना मला एक साधी सोपी गोष्ट सांगायची असते की, संघर्षाशिवाय आपणाला काहीच मिळणार नाही. हे जर सत्य असेल तर आधी आपल्याला सुरुवात करावी लागणार. आपण अनेकदा ठेचाळूत, पडू देखील पुन्हा सारं बळ एकवटून उठून चालावे लागणार. जर सामनाच अंधाराशी असेल, जर वेदनाच असतील आपल्या सख्या, सोबतीनी तर कशाचे दुःख अन् कुठची भीती. हे दिव्य कपाळी बांधून सिद्धार्थाच्या सिद्धीला जावे लागणार तेव्हा कुठे आपला स्वर्ग आपल्याला निर्मिता येईल ही जळण्या उजळण्याची कहाणी मला या सर्व कवितांमधून सांगायची असते. ही ज्यांच्यासाठी आहे त्यांना जेव्हा कळेल तेव्हा माझ्या कवितेच्या वेणा फळाला येतील. तो काळ येईल याची माझ्यातल्या कवीला आणि कवितेला पूर्ण खात्री आहे म्हणूनच अंधारातही कवितेचा दिवा जळता ठेवलाय... तो अव्याहत जळता राहो.

। डॉ. वीरा राठोड
पी. १०, अमर हाऊसिंग सोसायटी.
सिडको, एन-८, औरंगाबाद - ४३१ ००३
भ्रमणभाष : ९४२०४३१७१८

।। लेखकांसाठी सूचना ।।

- लेखकांनी आपले साहित्य कागदाच्या एका बाजूने लिहून वा मुद्रित करून पाठवावे.
- लेखनाच्या डाव्या बाजूस आवर्जून समास सोडावा.
- लेखन सुवाच्य हस्ताक्षरात आणि शुद्धलेखनाचे अधिकाधिक नियम पाळणारे असावे.
- लेखकाने आपल्या लेखनाची प्रत स्वतः जवळ ठेवावी. नापसंत लेखन परत पाठविणे शक्य होणार नाही.
- लेखन अनुवादित वा रूपांतरित असल्यास मूळ लेखकाची व प्रकाशकाची संमती लेखी स्वरूपात जोडावी.
- नव्या लेखनाचे 'युगवाणी'त स्वागत आहे.

अनुक्रमणिका



डॉ. सदानंद मोरे - एक विचक्षण संशोधक

डॉ. सुरेश र. देशपांडे

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे डॉ. प्रा. सदानंद श्रीधर मोरे अध्यक्ष झाल्याची बातमी वाचली आणि मला कै. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे स्मरण झाले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री दिल्लीच्या साहित्यसंमेलनाचे १९५४ मध्ये अध्यक्ष होते. तर्कतीर्थ जोशी हे संत वाङ्मयाचे गाढे अभ्यासक, तत्त्वज्ञ, संस्कृत पंडित आणि प्राच्यविशारद होते. त्यांनी स्वतंत्र असे इतिहासलेखन केले नाही, पण 'वैदिक संस्कृतीचा विकास' हा बृहद्ग्रंथ ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातून सिद्ध केला. त्यात वेदकालीन संस्कृती, इतिहास, पुराणे, रामायणकालीन संस्कृती, बौद्ध आणि जैन धर्मांचे कार्य आणि आधुनिक भारतातील सांस्कृतिक आंदोलन या विषयांचा सखोल आणि ऐतिहासिक दृष्टीने घेतलेला परामर्श आहे. तद्वतच तुकोबांची स्थान निश्चिती आणि तुकोबांविषयक विवेचन आहे. महाराष्ट्रात बुद्धिवादी विचारवंताची जी एक थोर परंपरा आहे. त्या परंपरेत शास्त्रीजींचे कार्य मोडते. त्यांचे लेखन मुद्देसूद, तर्कशुद्ध, विचारप्रवर्तक आणि निःस्पृह विचार प्रतिपादन करणारे असे आहे. हीच विचारधारा मला प्रा. सदानंद मोरे यांच्या लेखन संभारावर नजर टाकली असता आढळते. त्यांच्या साहित्यात आचार्य परंपरेची निःस्वार्थ लोकशिक्षणाची निष्ठा, तर्कशुद्ध, दृष्टिकोण, पूर्व-पश्चिमी ज्ञानविज्ञानांचा प्रचंड व्यासंग, मराठी भाषा व संस्कृती यांविषयीची तळमळ, त्यात सामाजिक सेवाव्रताचा एक अविभाज्य भाग असतो. तद्वतच इतिहासाचा निर्भिड अन्वयार्थ निःसंकोचपणे केलेला आढळतो. शिवाय संत साहित्य आणि महाराष्ट्राच्या लोकव्यवहाराचे ते गाढे अभ्यासक आहेत.

डॉ. सदानंद मोरे यांचा मूळ पिंड अध्यापक-प्राध्यापकाचा आहे. ते स्वतःला परंपरिक वारकरी मानतात. श्रीक्षेत्र देहू येथील परंपरिक वारकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला असून तुकारामांच्या दहाव्या पिढीतील ते वंशज होते. प्रा. मोरे यांनी अभ्यास-संशोधनाचे धडे पिताश्री श्रीधर अण्णा यांच्याकडून घेतले. त्यांचा ग्रंथसंग्रह मोठा होता. त्यातून प्रा. मोरे यांना चिपळूणकर आणि फुले यांचा परिचय झाला. गीतारहस्य हाताळता आले, असे ते म्हणतात. शिवाय घरी येणारी वर्तमानपत्रे आणि अन्य नियतकालिके यांमुळे 'अभ्यासाला एक शिस्त लागली', असे ते मानतात. त्यांनी तत्त्वज्ञान व प्राचीन भारतीय संस्कृती व इतिहास यांत अनुक्रमे दोन वेळा एम. ए. या पदव्या संपादून अहमदनगरच्या न्यू आर्टस् कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेजमध्ये व्याख्यात्याची नोकरी पत्करली. पुढे विद्यापीठात तत्त्वज्ञान विभागात अध्यापन करताना 'द गीताः अ थिअरी ऑफ ह्यूमन अॅक्शन' या प्रबंधाद्वारे पीएच्.डी. मिळविली. विद्यापीठात अध्यापन करीत असतानाच त्यांनी स्फूट तसेच विपुल ग्रंथ लेखन केले. व्याख्याने दिली, कीर्तने-प्रवचने, परिसंवाद, दूरदर्शन आदी माध्यमांद्वारे ज्ञान प्रसाराचे व

लोकजागराचे कार्य केले, 'मंथन', 'त्रयोदशी' (१९९५), 'तुकाराम दर्शन'(१९९६), 'लोकमान्य ते महात्मा' (दोन खंड २००७), 'लोकमान्य बाळ गंगाधर टिळक' (२०१०), 'गर्जा महाराष्ट्र' (२०१३), 'कर्मयोगी लोकमान्य' (२०१४) इत्यादी ग्रंथातून त्यांनी इतिहास व लोकव्यवहाराविषयक एक नवी रूपावली (पॅराडाइम) सिद्ध केली आहे. नियतकालिकातील सदराला केवढी ग्रंथयोग्यता लाभू शकते, यांचे 'मंथन', 'त्रयोदशी', 'तुकाराम दर्शन', 'लोकमान्य ते महात्मा' आणि 'गर्जा महाराष्ट्र' या पंचकाचे दर्शन म्हणजे मराठी साहित्यविश्वातील एक अभंग लेणेच म्हणावे लागेल! डॉ. सदानंद मोरे यांना 'तुकाराम दर्शन' या पुस्तकाला साहित्य ॲकॅडेमीचा पुरस्कार लाभला. याशिवाय त्यांना महाराष्ट्र राज्य शासनाचे तसेच अन्य संस्थांचे अनेक वाङ्मयीन पुरस्कार लाभले आहेत. नाशिक येथील पहिल्या संत साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. सौम्य भाषेत मतप्रदर्शन करणाऱ्या डॉ. मोरे यांनी ललित साहित्यातही चंचू प्रदेश करून 'उजळत्या दिशा' आणि 'शिवचरित्र' ही दोन सामाजिक नाटके लिहिली आहेत. शिवाय त्यांनी 'करिअर अवॉर्ड' अंतर्गत 'कृष्णः द मॅन ॲण्ड हिज मिशन' या विषयावर पोस्ट डॉक्टरल संशोधन केले आहे.

डॉ. सदानंद मोरे यांच्या समग्र वाङ्मयाचा चिकित्सक आढावा घ्यावयाचे म्हटल्यास प्रस्तुत लेख अतिव्याप्त होईल. या कारणास्तव त्यांच्या निवडक ग्रंथांचाच मुख्यत्वे 'तुकाराम दर्शन', 'लोकमान्य ते महात्मा' आणि 'गर्जा महाराष्ट्र' या बृहद् ग्रंथाचा, स्थूल परामर्श घेणे उचित ठरेल! डॉ. मोरे यांच्या अभ्यासाची बैठक पंडिती आहे. तिच्यात हरिदासी शैलीचा रसाळपणा आहे. ते शक्यतो कोणतेही विधान विश्वसनीय साधनांच्या आधारावर बारीक सारीक पुराव्यांचा धांडोळा घेऊन करतात. अभिनिवेश किंवा संकोचित चौकटीत न अडकता तो आंतरविद्याशाखीय व तौलनिक दृष्टीच्या विशाल अवकाशात वावरतात आणि इतिहासाची व इतिहासलेखनाची द्वंद्वात्मक जडणघडण चित्रित करतात.

डॉ. मोरे यांची ज्ञानदेव व तुकाराम महाराज ही आवडती दैवते असून श्रद्धास्थाने आहेत. त्यांना या दोन महात्म्यांविषयी बालपणापासून आदर आणि आस्था आहे. 'ज्ञानदेव रचला पाया... तुका झालासे कळस' ही सर्वश्रुत उक्ती आहे. संतांपैकी ज्ञानदेव हे भागवतधर्म मंदिराचा पाया, तर तुकोबा कळस होते. 'जेणे जाय कळसा। पाया उत्तम तो ऐसा।।' या तुकोक्तीप्रमाणे भविष्यकालीन उंच आणि अवाढव्य सांस्कृतिक मंदिराचा खोल आणि भक्कम पाया ज्ञानोबांनी रचला आणि तुकोबा त्याचे कळसच झाले! यास्तव मी ज्ञानदेवांविषयीचे त्यांचे विवेचन प्रथम मांडीत आहे. डॉ. सदानंद मोरे यांनी ज्ञानदेवांचा अभ्यास साहित्यशास्त्र, तत्त्वज्ञान आणि इतिहास या तीन अंगांनी केला आहे. त्या दृष्टिकोनातून त्यांनी ज्ञानदेवांचे भारतीय साहित्यक्षेत्रातील योगदान निश्चित केले आहे. तसेच तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातही, विशेषतः ज्ञानदेव हे भक्तीचे आचार्य असल्यामुळे भक्तीच्या तत्त्वज्ञानाची सांगोपांग चर्चा केली आहे आणि अखेरीस साहित्य काय किंवा तत्त्वज्ञान काय, हे मानवी जीवनाच्या भौतिक वास्तवातून उत्पन्न होतात. या वास्तवाचा विचार त्यांनी ऐतिहासिक व सांस्कृतिक परिप्रेक्ष्यातून केला आहे.

ज्ञानदेवांच्या मते गीतेत अठरा अध्याय आणि सातशे श्लोक आहेत. हे संख्यात्मक दृष्टीने खरे असले तरी -

सातशे श्लोक । अठरा अध्ययांचे लेख ।।
परी देवो बोलिले एक । जें दुर्जे नाहीं ।।

म्हणजे संपूर्ण गीतेत एकच एक प्रमेय आहे, या अर्थाने गीता ही एक जैविक एकात्मता (ऑर्गॅनिक युनिटी) आहे. इतकेच नव्हे तर ती सौंदर्यात्मक एकात्मताही आहे. म्हणूनच या संदर्भात ज्ञानदेव अर्धनारी नटेश्वराचे आणि मोत्यांच्या एकावळीचे दृष्टान्त देतात (१८.५१.५६).

''गीतेत वेगवेगळया स्थळी प्रसंगानुरूप, आवश्यकतेनुसार कार्यकारणभावाचे अनेक सिद्धान्त येऊन गेलेले आहेत आणि त्या त्या स्थळी त्या त्या सिद्धान्तांचे विवेचन ज्ञानदेवांनी तो जणू आपलाच सिद्धान्त आहे, इतक्या तन्मयतेने केलेले आहे, परंतु गीता हे काही अशा अनेक सिद्धांतांचे गाठोडे नाही किंवा ब्रह्मसूत्रांप्रमाणे पारंपरिक शास्त्रीय चर्चापद्धतीला अनुसरून केलेला सिद्धात्तसमन्वयही नाही. गीतेचा स्वतःचा असा एक महासिद्धान्त ज्ञानदेवांनी अभिज्ञात केलेला आहे आणि हा महासिद्धान्त म्हणजे ज्ञानप्राप्ती होऊन मोक्षाधिकार असतानाही कर्म आणि भक्ती खंडित होऊ न देणे हा आहे, असे त्यांचे प्रतिपादन आहे'' असे डॉ. मोरे म्हणतात. ज्ञानेश्वरी हे भगवद्गीतेवरी मानवी जीवनाच्या अंगाने केलेले भाष्य आहे. त्यात कर्म आहे, भक्ती आहे, सौंदर्यही आहे, ज्ञानदेवांची गीतासंगती ही एका अर्थाने मानवी जीवनाचीच संगती आहे. डॉ. मोरे म्हणतात, ''माझ्या दृष्टीने ज्ञानदेवांच्या अभ्यासाचा पहिला रोख ज्ञानदेवांचे काव्य, काव्यशास्त्र, तत्त्वज्ञान, सौंदर्यशास्त्र यांचे भारतीय स्तरावर नेमके स्थान कोठे निश्चित करता येईल, हा असला पाहिजे.'' त्या दृष्टिकोनातून डॉ. मोरे यांनी ज्ञानेश्वरीचे मूल्यमापन संस्कृत साहित्याच्या व साहित्यशास्त्राच्या परिप्रेक्ष्यात, विशेषतः

अनुक्रमणिका

आनंदवर्धन आणि अभिनवगुप्त या थोर विचारवंतांच्या संदर्भात केले आहे. म्हणून ते म्हणतात, ''ज्ञानदेवांना काश्मिरी शैव किंवा प्रत्यभिज्ञादर्शनाचे ज्ञान नाथपंथीय गुरुपरंपेत मिळोलेले होते. ही गोष्ट अमृतानुभावावरून सिद्ध करता येते. काश्मिरी साहित्यशास्त्र व ते ज्या आधार शिळेवर उभे होते ते प्रत्याभिज्ञादर्शन ही ज्ञानदेवकालीन महाराष्ट्रातील एक जिवंत वस्तुस्थितीत होती. ज्ञानदेवांचा आणि ज्ञानदेवीचा विचार या पार्श्वभूमीवर करावा लागतो.'' पुढे ते म्हणतात, ''ज्ञानदेवपूर्व काश्मीर हे तत्त्वज्ञान आणि साहित्यशास्त्र या दोन्ही शाखांमध्ये अतिशय विकसित आणि प्रगल्भ होते. बौद्ध, शैव आणि वैष्णव या तिन्ही संप्रदायांच्या आपापसांतील वैचारिक देवाणघेवाणीमुळे आणि परस्पर प्रभावांमुळे तेथील विचारधारा अत्यंत समृद्ध झालेले होती.''

आनंदवर्धन हे साहित्यशास्त्र व तत्त्वज्ञान यांवर प्रभुत्व असलेले पंडित असून त्यांनी बौद्ध तत्त्वज्ञानाशी संवाद साधला होता. बौद्ध व शैव परंपरांच्या मध्यावर ते उभे आहेत. उत्पलदेव किंवा अभिनवगुप्त धर्मकीर्तीला वारंवार उद्धृत करतात. या संदर्भात डॉ. मोरे म्हणतात, ''ज्ञानदेवांना बौद्ध तत्त्वज्ञानाचा परिचय शैवांच्या माध्यमातून झालेला होता. त्यांनी बौद्ध तत्त्वज्ञानाचा उल्लेख गणेश रूपकात पुढीलप्रमाणे केला आहे.:

'एके हाती दंतु। जो स्वभावता खंडितु । तो बौद्धमत संकेतु । वार्तिकाचा।।'

(ज्ञाने.१.१२) बौद्ध तत्त्वज्ञानाचा समावेश ज्ञानदेव आपल्या शब्दब्रह्मात करतात. ही बाब महत्त्वाची आहे. ती त्यांना शैव संस्कारांमुळे शक्य झाली.''

''आनंदवर्धन आणि अभिनवगुप्त यांना जे अभिप्रेत होते ते त्यांना स्वतःला करता आले नाही, ते ज्ञानेश्वरांनी केले आणि तेही साहित्यशास्त्रीय तात्त्विक परिभाषेने समृद्ध असलेल्या संस्कृत ऐवजी मराठी भाषेत केले.'' डॉ. मोरे हा परिणाम ज्ञानदेवांनी कसा साधला हे सांगताना म्हणतात, ''ज्ञानदेवांच्या मते, गीता अध्यात्मशास्त्र व काव्यही आहे. त्यात ज्ञान आहे आणि रसही आहे. ही गोष्ट त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी सांगितली आहेच. पण महत्त्वाची बाब अशी की ज्ञानेश्वरीच्या पहिल्याच नमनाच्या ओवीत म्हटले आहे -

ॐ नमो जी आद्या । वेदप्रतिपाद्या । जयजय स्वयंवेद्या । आत्मरूपा ।।

यात 'प्रतिपाद्य' व 'स्वसंवेद्य' ही दोन विशेषणे असून आत्म्यासंबंधीची म्हणजे तात्त्विक शास्त्रे आत्म्याची चर्चा करतात, प्रतिपादन करतात. त्यांतील वेद अधिक प्रमाणभूत शास्त्र म्हणून ज्ञानदेव आत्म्याला वेदप्रतिपाद्य म्हणतात. हा ज्ञानाचा, चर्चेचा, व्युत्पत्तीचा व्यवहार होय.'' थोडक्यात 'ज्ञानेश्वरी' ही भगवद्गीतेचा असा अर्थ लावणारे भाष्य आहे, हे ज्ञानदेव पहिल्याच ओवीत सांगतात. ज्ञानेश्वरीत शांत रसाचा परिपोष होणार आहे, हे सुद्धा ज्ञानदेवांनी मंगलचरणातच गणेशाच्या दातांचा शुभ्र वर्ण सांगून सुचविले आहे. कारण तो शांत रसांचा वर्ण मानण्यात आलेला आहे. अभिनवगुप्तांच्या शैव दृष्टीशी ज्ञानदेवांची जीवनदृष्टी कशी जवळ जाते हे सांगताना डॉ. मोरे म्हणतात, ''ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानात ज्ञान, कर्म आणि आस्वाद यांचा अविरोध आहे. ज्ञानदेवांची जीवनदृष्टी ही अशा प्रकारची सम्यक जीवनदृष्टी आहे. त्यांना शास्त्र आणि काव्य यांचे सामरस्य अभिप्रेत आहे.''

ज्ञानदेवांचे अभंग हे त्यांच्या स्वतःच्या भक्तीच्या, व्यवहाराची अभिव्यक्ती करतात. ही अभिव्यक्ती कृष्ण आणि अर्जुन यांमार्फत झालेली आहे. सर्व भूतमात्रांच्या हृदयात असलेला ईश्वर हे निर्गुणाचे, तर स्वतः श्रीकृष्ण हे सगुणाचे प्रतीक आहेत. ज्ञानदेवांच्या अभंगांमधून स्वतः ज्ञानदेवांच्या हृदयातील ईश्वर आणि विठ्ठल मूर्तीच्या रूपाने समोर दिसणारा सगुण ईश्वर यांचे द्वंद्व नाट्यपूर्ण रीतीने मांडले गेलेले आहे. यासंदर्भात डॉ. मोरे म्हणतात, ''ज्ञानदेव व वारकरी विचारधारा भक्ती मानणारे आहेत. ज्ञानदेवांच्या मते, ज्ञान म्हणजे भक्ती नव्हे, तर ज्ञान ही भक्तीची अट आहे. विश्व ईश्वराहून भिन्न नाही किंवा ईश्वराचेच रूप आहे असे (अभेद) ज्ञान ही भक्तीसाठी आवश्यक असलेली पात्रता आहे. ईश्वररूप होऊन ईश्वराची सेवा ज्याच्यामुळे करता येते, असे ते ज्ञान त्यांना अभिप्रेत आहे. ज्ञानदेवांच्या मताप्रमाणे भक्ती ही केवळ देव आणि भक्त यांच्यामधील संबंध नाही, तर देव, भक्त आणि विश्व यांच्यामधील संबंध आहे आणि अद्वैतज्ञानाची असण्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे भक्तिव्यवहारामध्ये विश्वाला असलेले स्थान होय.'' तुकाराम महाराज हे ज्ञानदेवांचे उत्तरकालीन संत. वारकरी परंपरेतील एक अग्रगण्य व्यक्तिमत्त्व. पंढरीच्या पांडुरंगाची सेवा हाच त्यांचा कुलधर्म आणि कुलाचार, हेच त्यांचे उत्तरदायित्व होय. 'ज्ञानबातुकाराम' या मंत्रात सारी वारकरी परंपराच साररूपात आलेली आहे. ते नुसते नामस्मरण नसून परंपरास्मरणही आहे आणि तुकाराम महाराज हे या परंपरेचे शिखर असल्याने 'तुकारामदर्शन' हे वारकरी परंपरेचेही दर्शन आहे. ज्ञानेश्वरीतील ओव्यांचा अर्थ तुकोबांच्या अभंगांनी आणि अभंगांचा अर्थ ओव्यांनी उलगडून दाखविणे, ही खास वारकरी पद्धती देहूकरांमध्ये चालत आलेली आहे. तुकारामांशिवाय वारकरी परंपरा पूर्णत्वाला पोहोचत नाही. तुकोबा हे

कालदृष्ट्या ज्ञानदेव, नामदेव आणि एकनाथ यांच्या नंतर येतात. 'त्या तिघांचेही संस्कार तुकोबांवर झालेले आहेत. म्हणजेच हे तिन्ही प्रवाह तुकोबांच्या ठायी एकवटलेले आहेत' असे डॉ. मोरे म्हणतात. त्यांच्या मते, तुकोबा एक सम्यक सांस्कृतिक परिप्रेक्ष्य आहे. म्हणून ते तुकोबांच्या व्यक्तित्वाचा वेध थेट ज्ञानेदेवांपर्यंत, खरे तर पुंडलिकापर्यंत पोहचल्याचे नोंदवितात आणि शिवकाल, पेशवाई व अव्वल इंग्रजी अमदानीतील प्रबोधन असे करीत वर्तमानकाळात शिरतात. त्यांनी संतांविषयीच्या गैरसमजांशिवाय तुकाराम महाराज यांच्याविषयी असलेल्या चुकीच्या अनेक रूढ कल्पनांचा समाचार घेऊन तुकांबांचे यथार्थ दर्शन घडविण्याचे उद्दिष्ट 'तुकाराम दर्शन' या पुस्तकात साधले आहे. तुकारामरूप महाराष्ट्र संस्कृतीचे मूल्यधिष्ठित व सर्जनशील विश्लेषण करण्याचा हा प्रकल्प आहे. म्हणून डॉ. मोरे म्हणतात, ''तुकोबांचे विचार हे वेगळे आणि स्वतंत्र दर्शन आहे. त्यांच्या मांडणीची सुरुवात ज्ञानदेवांनी केली. तुकोबाने ते पूर्णत्वाला नेले. ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम या क्रमाने ते पूर्णत्वाला पोहचले.'' 'झाले दर्पणाचे अंग, ज्याचा त्यासी दावी रंग', असे तुकोबांनी स्वतःविषयी म्हटले आहे. डॉ. मोरे ठासून सांगतात, की आपल्या समकालिनांना तुकोबा त्यांचे प्रतिबिंब दाखविणारा आरसा ठरले, पण त्यांचे हे दर्पण असणे अजूनही संपलेले नाही. 'आमुचा स्वदेश । भुवनजयामाजी वास।।' असे म्हणणाऱ्या तुकोबांच्या आत्मप्रत्ययाचा आवाका, देश, धर्म, जातींच्या सीमा ओलांडून एकूण मानवतेलाच कवेत घेणारा आहे. तुकोबांच्या या भूमिकेमुळे मराठी संस्कृतीला व माणसाला स्वतःचा अस्सलपणा राखून वैश्विकतेला जैवपणे जोडणारा एक शुद्ध जीवनरसच लाभला आहे.

तुकोबांचे व्यक्तिमत्त्व कमालीचे आत्मनिष्ठ होते. आपल्या ज्ञानाचा, वाणीचा, अभंगांचा झरा साक्षात ईश्वरी स्फूर्ती हाच आहे. अशी त्यांची धारणा होती. फार मोठी किंमत देऊन त्यांनी हा अनुभव घेतला होता. भक्तीची प्राप्ती हे कार्य आणि त्यासाठी ब्रह्मज्ञान हा मार्ग किंवा कारण हा तुकोबांचा मुद्दा मात्र पारंपरिक, कार्यकारणक्रमाची उलटापालट आहे. म्हणजेच भक्तिशिवाय ज्ञान सांगणे त्यांना मान्य नाही. त्यांच्या लेखी भक्तिशिवाय ब्रह्मज्ञान सांगणारा अद्वैत वेदान्ती हा पाखंडी ठरतो. दोघेही वेदप्रामाण्यवादी. पण एवढा मोठा फरक. त्यामुळे तुकोबा हे एक ऋषीच आहेत, असे प्रतिपादन डॉ. मोरे करतात.

तुकोबांनी समाजाची एक प्रकारची नैतिक चिकित्सा केली होती. ती सर्वसामावेशक होती. तिच्यातून विशेषतः मावळ मुलखाचे मोठे प्रबोधन झाले. तेथील पाईक आणि नाईक स्वार्थाच्या मर्यादा ओलांडून त्याग बुद्धीने शिवाजीराजांच्या मागे उभे राहिले. 'तुका म्हणे ऐसे जयाचे पाईक पाईक । बळिया तो नाईक त्रैलोकिचा ।।' पाईक पदरी असलेला नाईक सर्वांना भारी ठरतो, त्या पाईकाच्या अभंगावरून असेही दिसते की, तुकोबांनी याही पलीकडे जाऊन मावळातील मुळच्याच लढाऊ लोकांना प्रत्यक्ष युद्धाशी निगडीत असलेले काही धडेही दिले. चुकीच्या सत्ताधिशांची लोभाधिष्ठित चाकरी सोडून ध्येयनिष्ठेने त्यागावर आधारलेला पाईकपणा पत्करण्याचा सल्ला दिला. तुकोबांना आत्मनिष्ठ कवी म्हणावयाचे की सामाजिक, हा प्रश्नच उपस्थित होत नाही. याचे कारण तुकोबांसाठी त्यांची वैयक्तिकता आणि सामाजिकता, आत्मनिष्ठा आणि वस्तुनिष्ठा या दोन भिन्न बाबी नाहीतच. विठ्ठलाच्या भेटीसाठी तळमळणारे तुकोबा. समाजामधील दुष्प्रवृत्ती आणि दांभिकता पाहून कोपणारे आणि अवनती पाहून हळहळणारे तुकोबा, परदास्यात सुख मानणारे उच्चवर्णीय ब्राह्मण, क्षत्रिय पाहून अस्वस्थ होणारे तुकोबा यांच्यात काहीही द्वैत नाही, ताणतणाव नाही. तुकोबा जितक्या स्वाभाविकपणे आपल्या अभंगांतून स्वतःच्या मनाशी संवाद साधतात, तितक्याच सहजपणे जनांशीही संवाद करतात. आत्मप्रकटीकरण किंवा आत्माविष्कार करणारी त्यांची कविता जेवढी अस्सल आहे, तेवढीच इतरांना उपदेश करणारी आहे. उपदेशामुळे ती कुठे बाळबोध होत नाही. करुणेतून भिजून आलेले त्यांचे शब्द जेवढे काव्यमय असतात तेवढ्याच, क्रोधामधून पेटून आलेल्या त्यांच्या शिव्याही काव्यमय असतात. तत्संबंधी मतप्रदर्शन करताना डॉ. मोरे म्हणतात, ''एरवी नामदेव ढसाळांसारख्या विद्रोही कवीला ते भावलेच नसते. औचित्य आणि अभिरूची यांच्यात फाजील अडकून पडलेले समीक्षक तुकोबांच्या अभंगांमधील ग्राम्य शब्दप्रयोगांबद्दल नापसंती व्यक्त करताना खरे तर आपल्या व्यक्तिमत्त्वातील दुभंगलेपणच प्रतिबिंबित करतात. त्यांना तुकोबांच्या शिव्या पेलणार नाहीत, हे उघड आहे.''

'वृक्षवल्ली आम्हा सोइरी वनचरे'- इतकेच काय पण 'झाडेझुडे जीव सोइरे पाषाण' असा पाषाणापर्यंत भिडणारा तुकोबांचा आत्मप्रत्यय आहे. अशी व्यापक कल्पना असणाऱ्यांसाठी वेगळ्या पर्यावरणवादाची आवश्यकता नाही. तुकाराम महाराज कोणत्याही सामाजिक व्यवहारापासून अलिप्त नाहीत हे त्यांच्या पुढील - 'बळ बुद्धि वेचुनिया शक्ती । उदक चालवावे युक्ती ।।' या अभंगावरून सिद्ध होते. शेतकऱ्यांना दिलेला हा सल्ला आणि मावळातल्या पाईकांना लढण्याचा वर दिलेला व्यवहार यांवरून स्पष्ट होते. शिवाजी

महाराजांनाही ते 'पिकवावे धन । ज्याची आस करी जन।।' हा सूत्रमय उपदेश करतात. याशिवाय काही अनिष्ट सामजिक प्रथांविषयीही ते तेवढ्याच पोटतिडकीने म्हणतात, ''मांडवाच्या दारा । पुढे आणिला म्हातारा ।। म्हणे नवरी आणा रांड । जळो नवऱ्याचे तोंड ।। समय न कळे । काय उपयोगी ये वेळे ।। तुका म्हणे खरा । येथूनिया दूर करा ।।''

मध्ययुगात व नंतरही विधवाविवाहाच्या समस्येने गंभीर रूप धारण केले होते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे जरठकन्या विवाहाची दुष्ट रूढी वा प्रथा तत्कालीन समाजात प्रचलित होती. म्हातारा नवरा आणि कोवळ्या वयाची नवरी यांमधील तो विषमविवाहाचा व्यवहार होता. त्याचा उपहास तुकोबांनी वरील अभंगात केला आहे. तुकाराम महाराजांनी वेदप्रामाण्याची चौकट न सोडता आपल्याला अभिप्रेत असलेला भक्तिप्रधान वेदार्थ जागोजागी सांगितला आहे. त्यामुळे तुकोबा हे एक ऋषीच ठरतात. तुकोबांना कुणी ज्ञानवंत म्हणो, कुणी अडाणी म्हणो, त्यांच्यापुरते ते निःशंक आहेत आणि त्यांची वारकरी परंपराही तितकीच निःशंक आहे. डॉ. सदानंद मोरे यांनी 'तुकाराम दर्शन' या पुस्तकात तुकाराम महाराज यांचे वस्तुनिष्ठ चरित्र सांगून तुकोबांच्या विषयीच्या गैरसमजुती आणि चुकीच्या कल्पना दूर करून तुकोबांचे यथार्थ दर्शन घडविले आहे. याशिवाय ज्यांना महाराष्ट्राचा आणि मराठी संस्कृतीचा अभ्यास करावयाचा आहे. त्यांच्या अभ्यासक्षेत्रातील तुकोबा ही मोक्याची जागा आहे, हे दर्शविले आहे.

आधुनिक भारताच्या इतिहासात आणि विशेष करून स्वातंत्र्यलढ्यात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे स्थान फारच महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रातील संतांच्या मांदियाळीचे सार जसे 'ज्ञानबा-तुकाराम' या दोन नावांत सांगात येते, तसेच स्वातंत्र्याच्या सेनानींचे सार लोकमान्य व महात्मा गांधी या दोन नावांत अंतर्भूत आहे. त्याचे दिग्दर्शन डॉ. सदानंद मोरे यांनी त्यांच्या 'लोकमान्य ते महात्मा' (दोन खंड) या बृहद्ग्रंथात केले आहे. स्वातंत्र्यचळवळीतील नेमस्तांच्या अर्जविनंत्या, ठराव अशा सनदशीर मार्गांचा, टिळकांच्या जशास तशा प्रतिक्रियेचा, जहाल राजकारणाचा, सावरकरांच्या सशस्त्र क्रांतीचा अशा प्रचलित पॅरेडाइमवर आधारित इतिहास असून त्यात महात्मा गांधींचा सत्याग्रह हा राजकीय कृतीचा नवा पॅरेडाइम आढळतो. हा पॅरेडाइम डॉ. मोरे यांनी तत्कालीन राजकीय स्थितीचा इतिहास विविध सामाजिक संस्था, प्रार्थना, ब्राह्मो, सत्यशोधक-समाज, वृत्तपत्रे, व्यक्ती आणि त्यावेळचा पत्रव्यवहार यांचा धांडोळा घेऊन स्तंभलेखांद्वारे सुसूत्रपणे प्रस्तुत ग्रंथात मांडाला आहे. यात लोकमान्यांचे महात्मा गांधींच्या आगमनापूर्वीचे (१९१५) कार्य आणि नंतरची भूमिका, तसेच लोकमान्य व महात्मा गांधी यांमधील संबंध सविस्तरपणे वर्णिलेले असून त्यांची साधार चर्चा केली आहे. शिवाय लोकमान्यांच्या मृत्यूनंतर काही निष्ठावान टिळक अनुयायी गांधीवादी झाले. सर्वच टिळकानुयायांना केळकरांनी स्मृती ही टिळकांच्या श्रुतीशी सुसंगत वाटली नव्हती. त्यांनी टिळकांप्रमाणे गांधींनाही ऋषी मानून महात्मा गांधी हे टिळकांचेच राजकारण पुढे चालवीत आहेत, अशी भूमिका घेतली, तथापि काही कडव्या टिळक अनुयायांनी गांधींना कडवा विरोध केला. स्वातंत्र्य चळवळीचा अंतिम टप्पा सांगताना डॉ. मोरे म्हणतात, ''स्वातंत्र्य नावाचा जन्मसिद्ध हक्क मिळविण्याची प्रतिज्ञा टिळकांनी केली खरी, पण ती अपुरी राहिली. ती प्रतिज्ञा पूर्ण करावयाचे काम नियतीने गांधींवर सोपविले होते.'' गांधींच्या व्यक्तिमत्त्वाविषयी ते म्हणतात, ''जगातील सर्वश्रेष्ठ धार्मिक आणि तरीही धर्मनिरपेक्ष मानव म्हणजे गांधी. किंबहुना त्यामुळेच त्यांनी संतत्व व राजकीय नेतृत्व अशा दोन्ही विसंगत वाटणाऱ्या गोष्टी पेलल्या.''

पुढे डॉ. मोरे दुसऱ्या खंडाच्या अखेरच्या प्रकरणात म्हणतात, '''लोकमान्य ते महात्मा'मधील आतापर्यंतच्या विवेचनावरून हिंदु-मुस्लिम आणि ब्राह्मण-ब्राह्मणेतर या दोन समस्या किती जटिल व गुंतागुंतीच्या आहेत, त्यांना किती पदर आहेत, हे लक्षात यायला प्रत्यवाय नसावा.'' अत्यंत जटिल अशा या घटनेत ब्रिटीश सरकारच्या कुटिल नीतीचा आणि मुसलमानांच्या धर्मवेडाचा वाटा तर होताच, परंतु वर्चस्ववादी हिंदू पुढाऱ्यांनीही आपल्या परीने तिला हातभार लावला होताच. परिणामतः तो अद्यापि सुटला आहे, असे ठामपणाने म्हणवत नाही. या ग्रंथाच्या समारोपात (महाराष्ट्र काय शिकला?) डॉ. मोरे म्हणतात, ''हा ग्रंथ विस्तृत लिहिण्याचा उद्देश मुळी महाराष्ट्राच्या इतिहासावर कायमस्वरूपी परिणाम घडविणाऱ्या संक्रमणाच्या सर्व बाजू उलगडून दाखविणे हा होता. या संक्रमणाचे परिणाम घडणे अजूनही थांबले नाही. महाराष्ट्रात जेम्स लेनच्या निमित्ताने जे काही घडले, ते याच नीट न होऊ शकलेल्या संक्रमणाचे अवशेष आहेत.''

'लोकमान्य ते महात्मा' व्यतिरिक्त डॉ. सदानंद मोरे यांनी टिळकांवर दोन स्वतंत्र चरित्रात्मक पुस्तके लिहिली. त्यांपैकी 'लोकमान्य बाळ गंगाधर टिळक' (२०१०) हे श्री गंधर्व-वेद प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या सहासष्ट चरित्रात्मक ग्रंथामालेतील असून त्याला पृष्ठमर्यादा होती. म्हणून डॉ. मोरेंनी टिळकांचे विस्तृत चरित्र 'कर्मयोगी लोकमान्य' (चिकित्सक आकलन) (२०१४) या शीर्षकार्थाने सिद्ध केले आहे. या ४५०

पृष्ठाच्या सुरुवातीच्या पहिल्या प्रकरणात 'टिळकांची अनेक चरित्रे उपलब्ध असताना या नव्या चरित्राची गरज काय?' याचा खुलासा केला आहे. कोणत्याही व्यक्तीचे परिपूर्ण, सर्वांगीण आढावा घेणारे चरित्र दुर्मिळच! नवी साधने उपलब्ध झाली तर चरित्र नव्याने लिहिणे भाग पडते. इतिहासलेखनात 'डेड एन्ड' कधीच येत नाही. त्यांच्या मते, लोकमान्य हे संपूर्ण देशाचे नेतृत्व करणारा पहिला नेता होय. ज्याला मानणारे आणि ज्याचा शब्द झेलून त्यानुसार वागणारे अनुयायी सर्व धर्मांच्या, प्रदेशांच्या व जातिपातींच्या लोकांमध्ये होते. असे अखिल भारतीय पातळीवरील पहिले नेतृत्व टिळकांचे. या अर्थाने लोकमान्यांचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण म्हणावे लागेल. टिळकांनी ब्रिटीश सत्तेला आव्हान दिले. त्यांनी कोणत्याही एका विशिष्ट समाजघटकाचे प्रतिनिधित्व करण्याऐवजी आपण सर्वांचे नेते आहोत अशी भूमिका घेतली आणि आपली कृती ती सर्व ब्रिटिश कायद्याच्या चौकटीत आहे, असे निक्षून सांगितले. त्यांनी स्वातंत्र्यचळवळीला वैचारिक व तात्त्विक अधिष्ठान दिले. म्हणून डॉ. मोरे म्हणतात, ''स्वातंत्र्य ही एक सहजस्फूर्ती मानवी ऊर्मी आहे हे खरे असले, तरी ती ज्याच्या त्याच्यापुरती लोकव्यवहारात जेव्हा समर्थनाच्या पातळीवर येते, तेव्हा तिची तात्त्विक चर्चा करावी लागते. तिला जीवनदृष्टीशी जोडावे लागते. ही गोष्ट पहिल्यांदा टिळकांनी केली. त्यांनी ब्रिटीश सत्तेविरुद्ध असंतोषाची भावना निर्माण केली हे सत्य असले, तरी तेवढ्याने भागण्यासारखे नव्हते... टिळकांनी स्वातंत्र्याची गरज ही मूलभूत गरज असण्याची जाणीव करून दिली. 'स्वराज्याची सर सुराज्याला नाही', या शब्दामध्ये ही जाणीव व्यक्त झाली आणि स्वराज तर जन्मसिद्ध हक्क झाला.''

'गर्जा महाराष्ट्र' हा कलाक्रमाने वर्णिलेला महाराष्ट्राचा चाकोरीबद्ध इतिहास नाही. त्यात महाराष्ट्रेतिहासाच्या लेखनपरंपरेची समाजशास्त्रीय चिकित्सा असून डॉ. सदानंद मोरे हे इतिहासाची आणि इतिहासलेखनाची द्वंद्वात्मक जडणघडण चित्रित करतात. अखिल भारतीय दृष्टी विकसित करणाऱ्या मराठ्यांच्या राजतीतीच्या आणि ज्ञानोबा-तुकाराम-शिवछत्रपतींपासून ते यशवंतराव चव्हाणांपर्यंतच्या कर्तबगार मराठी माणसांनी केलेल्या वैचारिक व कृतिशील प्रबोधनातून प्रगल्भ होत गेलेल्या महाराष्ट्र संस्कृतीचा व राजकीय घडामोडींचा उद्घोष यात आढळतो. प्रबोधनकाळ आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळ या दोन पर्वांत महाराष्ट्राचा इतिहास, संस्कृती, भाषा, साहित्य, राजकारण, समाजरचना, अर्थकारण, महाराष्ट्राचे जातवर्गीय रूप इत्यादींची उद्बोधक चर्चा या इतिहासलेखनाच्या अनुषंगाने दृष्टोत्पत्तीस येते. त्यातूनच महाराष्ट्राच्या इतिहासाची समग्र आणि विवेचक मांडणी विशेषतः महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक दृष्टिकोनातून करण्याचा प्रयत्न डॉ. मोरे यांनी केला आहे. महाराष्ट्राच्या लोकव्यवहाराचे अभ्यासक म्हणून ते आपल्याशी संवाद साधू इच्छितात. प्रादेशिकतेचा किंवा जातींच्या बेरीज-वजाबाकीच्या आधारे केंद्रीय पातळीवर राजकारणात सौदेबाजीचे राजकारण करण्याची आपत्ती समकालीन महाराष्ट्रावर आली असा प्रा. मोरे यांचा अभिप्राय आहे. त्यांच्या मते, महाराष्ट्राचा इतिहास हा जरी उत्तरोत्तर जातिधर्मातीत होत अखिल भारतीयत्वाचे भान जागे करण्यापर्यंत उन्नत-ईहनिष्ठ होत गेला, तरी इतिहासलेखन मात्र जातिनिरपेक्षेने झाले नाही. शिवकालीन क्रांतीमुळे महाराष्ट्रातील मराठा समाजाला जे एक प्रगल्भ राजकीय भान आले, त्याचा वेध डॉ. मोरे घेतात. त्यांना 'मराठा' हा शब्द निव्वळ जातिवाचक अर्थाने अभिप्रेत नाही. किंबहुना 'मराठा' एक राजकीय एकक (पॉलिटिकल एंटिटी) म्हणून कसा विकसित झाला, हे सांगावयाचे आहे, पण 'मराठा' शब्दाचा हा व्यापक अर्थ सांप्रत आक्रसत जाऊन तो पुन्हा जातीपाशी स्थिरावत आहे, अशी प्रा. मोरे खंत व्यक्त करतात आणि या पार्श्वभूमीवर राष्ट्रकाच्या पुढे जाणारा महर्षी वि. रा. शिंदे यांनी 'मी जात न मानणारा मराठा आहे' हा अर्थ ते प्रमाण मानतात. म्हणून ते म्हणतात, ''मराठी माणसाने 'मराठा' शब्दाचा व्यापक अर्थ आत्मसात करून नवउदारमतवादी धोरण स्वीकारावे.'' प्रस्तुत ग्रंथात त्यांनी प्रतिपादिलेली जातनिरपेक्ष इतिहासलेखनपद्धती, मराठेपणाचा सकलजनवादी आशय आणि विषयाच्या विवेचनासाठी स्वीकारलेली आंतरविद्याशाखीय व तौलनिक अभ्यासपद्धती वाखाणण्यासारखी आहे.

एकूण त्यांच्या लेखन संभारावर दृष्टिक्षेप टाकला असता असे आढळते की, 'तुकाराम दर्शनात' महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाची तुकाराम केंद्रित मांडणी आहे, तर महाराष्ट्राच्या आधुनिक इतिहासाचे टिळक-गांधी केंद्रित लंबवर्तुळाकार मॉडले 'लोकमान्य ते महात्मा'यात असून त्यात महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलणाऱ्या नेतृत्व संक्रमणाचा वेध आहे आणि 'गर्जा महाराष्ट्र'मध्ये महाराष्ट्राची भाषिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय ओळख आढळते.

। डॉ. सुरेश र. देशपांडे
'अक्षर', विश्वकोश कॉलनी,
सिद्धनाथवाडी, वाई.
जि. सातारा - ४१२ ८०३
भ्रमणभाष : ९३२३१८५१४०

अनुक्रमणिका

गिरीश कार्नाड यांची मुलाखत



गिरीश कार्नाड भारतीय रंगभूमीच्या प्रवाहाला नवे वळण देणाऱ्या आधुनिक नाटककारांमधले अत्यंत महत्त्वाचे नाव. मिथक, इतिहास, दंतकथा, लोककथा ह्यांतील चिरंतन मूल्यांचा आधार घेऊन आजच्या काळावर नेमके भाष्य करणाऱ्या कार्नाडांच्या नाट्यकलाकृती प्रख्यात आहेत. 'ययाती' 'तुघलक' 'हयवदन' 'नागमंडल' 'अग्नीवर्षा' 'वेडिंग अल्बम' 'काटेसावरी' यांसारख्या त्यांच्या नाटकांमधून मानवी मनाची आणि परस्पर नातेसंबंधांची उकल अतिशय समर्थपणे समोर येते. भारतातील नव्हे तर जगभरातील अनेक भाषांमधून या नाट्यकृतींचे अनुवाद आणि प्रयोग होत आहेत आणि होत राहतील.

दिग्दर्शक, पटकथाकार, अभिनेता म्हणूनही त्यांनी चित्रपटसृष्टीत आपली वेगळी, अनोखी अशी ओळख निर्माण केली. त्यांच्या उल्लेखाशिवाय समांतर चित्रपटांची चळवळ पूर्णच होऊ शकत नाही. 'उत्सव' 'गोधुली' 'वंशवृक्ष' 'चेलुवि' यांसारख्या चित्रपटांमधून त्यांनी गाठलेली दिग्दर्शन कौशल्याची उंची रसिकांना परिचित आहे. सामाजिक प्रश्नांवर योग्य वैचारिक भूमिका घेणे आणि कोणतीही तडजोड न करता त्यावर शेवटपर्यंत ठाम राहणे यामुळे त्यांच्या प्रती असणारा आदर दुणावत जातो.

पद्मश्री, पद्मभूषण, संगीत नाटक अकादेमी, साहित्य अकादेमी यांसारख्या अनेक पुरस्कारांनी आणि ज्ञानपीठ सन्मानाने विभूषित गिरीश कार्नाड म्हणजे या शतकातील श्रेष्ठ आणि विचारवंत कलाकार!

विदर्भ साहित्य संघाच्या 'नवती'च्या निमित्ताने २२ व २३ मार्च २०१४ रोजी 'उत्सव गिरीश कार्नाड यांच्या अभिव्यक्तीचा' हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमात गिरीश कार्नाड यांच्याशी अजेय गंपावार यांनी साधलेला हा मुक्त संवाद.

गिरीश कार्नाड यांची मुलाखत

मुलाखत - अजेय गंपावार
शब्दांकन - अनिल कुळकर्णी

■

अजेय गंपावार

गिरीशजी तुमचं स्वागत करतो. गिरीशजी काल तुम्ही लिहिलेलं आणि प्रदीप वैद्यनी अनुवादित केलेलं एक अप्रतिम सुंदर नाटक आमच्या सगळ्या रसिकांनी, नागपूरकरांनी पाहिलं. आणि त्यांनी त्यात...त्याची प्रशस्तीसुद्धा केली. प्रत्येक शहराचं एक जॉनर असत. त्याला टेक्श्चर असतं, व्यक्तिमत्त्व असत. तिथल्या माणसांमधून ते व्यक्तिमत्त्व बनत जातं. तुमच्यासाठी नागपूर म्हणजे महेश एलकुंचवार या नाटककाराचं शहर एवढी ओळख आहे. पण मी थोडासा आणखीन एक तुम्हाला आवडेल असा सुंदर संदर्भ देतो एलकुंचवारांचं शहर आहेच पण तुम्हाला आवडेल यासाठी सांगतो की, आमचं हे शहर नाटककार कालीदासाचं सुद्धा शहर आहे. आणि ते इथे आले होते आणि मेघदूत हे काव्य त्यांनी इथे लिहीलं आणि त्यातली पहिली ओळ, ज्या ओळीवर तुमचे मित्र मोहन राकेश यांनी एक सुंदर नाटक लिहीलं होतं 'आषाढातला एक दिवस' सुरवात मला इथुनच करावी वाटते.

one of these thirteen people give me a guarantee that they will employ Dilip Dhawan, give him a role, not a big role, small role. Let them say to me that we will give him a role and I will admit him today. तर राजकपूर म्हणाला, "गिरीशजी, मै जो करने के लिये आया था, वो मैने किया, आपको जो करना है कर लो" And he went off to the car and I went with him to the car and जाता जाता मी राज कपूरला म्हटलं की 'राजकपूर Institute को आते है ये बहोत बडी बात हैं. you know, we cant really insult you like this. मी admit करतो याला दिलीप धवनला. you can tell him that he is admitted and thank you for coming' वगैरे वगैरे. राज कपूर went. He called Dilip Dhawan. He told Dilip Dhawan, देखो मैने गिरीशसे बात की है I have got you admitted to the institute, now don't ask for the role. This story which is a true story because later on Dilip Dhawan told me when he become a student, we became friends. He said this is what Raj Kapoor told me. And ultimately Dilip Dhawan became... Dilip not Dhawan... काय होतं... धवनच होतं... he became wel known actor in 'Nukkad' which was a television serial. 'नुक्कड'मधे तो हिरो झाला पण ह्या तेरा लोकांपैकी कुणीही त्याला admission दिल नव्हतं so this is the point. This is why I ultimately stopped the acting course in the institute. Because it was absolutely murder. Every year twenty students used to go into the industry and there were no more jobs. And they came and told me की काय होतं, आम्ही जेव्हा जातो प्रोड्यूसरांना भेटायला तर producer म्हणतात, "हां, institute के लकडे है? बिठा दो उनको वहाँ. वहाँ बैठो. लकडकीया है? अच्छा उनको यँहा... अच्छा सुनो आज रातको एक पार्टी है आ जाओ." म्हणजे this was attitude, you know, this was total contempt. Its only after I stopped the acting course at that time, that they started getting jobs. This was mind you a situation when there was no television. Now this is the benefit of television. One television came to India they all got jobs. Because television needed, you know they don't need Amitabh Bachhan and Shashi Kappor. They needed young actors and the institute provided them आणि ती सगळी that developed. So that was.

अजेय गंपावार

गिरीशजी आत्ता नासीरुद्दीन, ओम पुरी चे रेफरन्स तुम्ही दिले. त्याच संदर्भात आणखीन एक आठवण आहे. खूप मोठा अभिनेता ज्यांनी अमिताभ बच्चन इतकीच फिल्म इंडस्ट्री गाजवली, त्यांनी आपल्या आत्मचरित्रात लिहिलं आहे की मी जो काही आहे फिल्म इंडस्ट्रीत तो गिरीशजींमुळे आहे. आणि एक खूप प्रतिभावंत आणि खूप मोठा खलनायक म्हणून सगळेजण त्यांना ओळखतात. त्यांचं नावही तुम्ही सांगा आणि त्यांनी तुमचा उल्लेख असा अश्या रितीने आत्मचरित्रात का केला तेही तुम्ही सांगा.

गिरीश कार्नाड

अमरीश... अमरीश पुरी.... अमरीश पुरी.... त्याचं म्हणजे I was doing a Kannada film 'काडू' (Kaadu) मी अमरीशला त्याच्या... I had seen him 'Hayvadan'... no Hayvadan... 'ययाती'त आणि मग... मग हयवदनसुद्धा. And I wanted someone strong crude. So Amarish... now अमरीशला problem एक आहे की त्याला... हिंदीसुद्धा पंजाबी accent नी बोलतो. म्हणजे ही वीस वर्षं हिंदी इंडस्ट्रीत असून त्याला हिंदी... हिंदी म्हणजे पंजाबीच बोलतो तो. तर कन्नड बोलणं हे शक्यच नव्हतं, तर त्याकरता मी त्याचा... पात्र त्याचं character अगदी मोघम अगदी quiet... silent केलं कारण dialogue दिले तर आठवत नव्हते त्याला. तर and so the.,.. right through this film Amarish Puri is walking around silently looking and it was a very powerful role and he did well and it was seen by बापू-रमणा telagu actors who did 'हम पाच'a tamil film called 'हम पाच' He got a role and then he... of course he is a very good actor. He had a beautiful voice and presence तर तो... And he also says in his autobiography की after 'Kaadu' my whole situation changed. कारण त्याच्या आधी त्याला फक्त म्हणजे 'उस लडकी को पकड के ले आओ' तर त्या एका सीनमधे पात्र असायचं नाहीतर दुसर काही नाही. तर... but then he developed and he had the training. This is where training is so important. He had the training under Satyadev Dubey. At a time when he was completely depressed he was forties when he became a star but he had been trained by Satyadev and that he benefitted. That's why he could sustain long career even after that and this is true. This kind of training and dedication is completely necessary.

अजेय गंपावार

गिरीशजी चेलुवी नंतर गोधुली हे अप्रतिम सुंदर असे

अनुक्रमणिका

सिनिमे तुम्ही हिंदी फिल्म इंडस्ट्रीला दिले. चेलूवी पण डब झाला होता पण त्याहीपेक्षा गिरीश कार्नाड म्हणजे लोकांच्या डोळ्यासमोर ज्या चित्रपटाचं नाव येतं तो चित्रपट म्हणजे... मी सांगण्यापूर्वी त्यातला एक छोटसा सीन आपण स्क्रीनवर पाहू आणि नंतर त्या चित्रपटाबद्दल गिरीशजींशी बोलू. (Audio visual) एखाद्या अतिशय तरल अश्या कवितेसारखा अनुभव म्हणजे 'उत्सव' हा चित्रपट होता आणि तो गिरीशजींनी दिग्दर्शित केला होता. गिरीशजी म्हणजे उत्सव आणि उत्सव म्हणजे गिरीशजी हे हिंदी चित्रपटसृष्टीसाठी तरी एक समीकरण आहे. गिरीशजी मला विचारायचं आहे की समांतर चित्रपट किंवा सर्व या चित्रपटाच्या प्रवाहात तुम्ही काम करताना 'उत्सव'च्या निमित्यानी रेखा सारख्या अतिशय टॉपच्या कमर्शियल आर्टिस्टला वसंतसेनेच्या भुमिकेसाठी कास्ट करणं हीच एक थरारक घटना वाटते. तिच्यासोबत काम करताना निश्चितच तिला तुमच्यासोबत काम करताना ही काही तडजोडी कराव्या लागल्या असत्या. ती त्यावेळी टॉपची अभिनेत्री होती, हिरॉईन होती. या एकंदरीतच चित्रपटाचा अनुभव काय होता?

गिरीश कार्नाड

It was a great experience. She never gave any trouble. She was very very professional. मला उत्सव म्हणजे मृच्छकटिक करावं असं हे पुष्कळ वर्षापासून माझ्या मनात होतं. Realistic films म्हणजे पाथेर पांचाली संस्कार सारखं मिडलक्लास लाईफवर करून मी कंटाळलो होतो. and one thing about मृच्छकटिक is, its really like a hindi film-cinema. अगदी म्हणजे ती heroine ओली चिंब येते पावसात भिजत आणि तो हिरो. तो म्हणजे चांगला पण... you know he is no good at anything and she is a golden hearted prostitute आणि you know, there is a villain and it ends in a court room ते सुद्धा होतं म्हणजे अगदी हिंदी फिल्मप्रमाणे aspect. Your honour कुणीतरी उठेल असं. And then there is a last minute rescue. तर मला वाटलं की this is a sanskrit play but it is almost like a, you know, like a hindi film script तेव्हा त्याकाळचा. And I said this to Shashi Kappor and he said I will ask and the idea of casting Rekha was Shashi's. Shashi Kapoor. And originally, I must mention this is that the शकाराचं कामं was supposed to be done by Amitabh Bachhan and, you know, the whole tric of the film was Amitabh and Rekha. That affair was going on at the height of their career but here Amitabh was going to be the villain and you know and following her and running after her and Amitabh willingly agreed to the role. And the whole film would have worked, I think much better if Amitabh had done it. पण ते कुलीमधे अमिताभचा... he had an accident. He was hospitalised. After that he couldn't act. His family wouldn't let him act with Rekha and so the whole project changed and I have to put Shashi Kapoor in that role. पण शशी कपूर आहे... actor आहे खरा... but he is not of the same caliber as Amitabh Bachhan. He turned Shakara into a comic character. पण शकारा is not just a comic character. त्याला complextity आहे. He is passionate. He, ultimately till the end, he wants Vasantsena and that I wanted to capture ते झालं पण ok.

अजेय गंपावार

गिरीशजी उत्सवमध्ये अमजदखानसारखं मोठं नावं होतं. आणि शंकर नाग नी खूप छान अप्रतीम रोल त्याला दिला होता. कन्नड अभिनेता पण त्यासोबत काही मराठी नावं या सिनेमाला असोसिएट होती आणि ती म्हणजे जयू आणि नचिकेत पटवर्धन आणि पंडित वसंत देव. या सगळ्याबद्दल तुमच्याकडून ऐकायचंय.

गिरीश कार्नाड

नाही... They are just best in the trade. Its one of the sadest incidence in Hindi Film Industry that Jayu and Nachiket Patwardhan didn't become... continue as a Art Directors because they were the greatest art directors that hindi cinema has produced ह्याच्याबद्दल शंकाच नाही. They have tremendous taste and they have tremendous judgement आणि सगळं ते atmosphere त्यांनी जे recreate केलं. रविशंकर तर बनारसमधे, फिल्म पाहून त्यांनी मला फोन केला, "काय किती सुंदर आहे.I wish I had done music for this" वगैरे वगैरे आणि वसंत देव म्हणजे you know he just wrote, तेव्हा ते music director कोण होते?

अजेय गंपावार

लक्ष्मीकांत प्यारेलाल.

अनुक्रमणिका

गिरीश कार्नाड

लक्ष्मीकांत प्यारेलाल होते.

अजेय गंपावार

आणि त्यांच आयुष्यातलं अप्रतिम संगीत हे असावं कमर्शियल चित्रपटांमधलं.

गिरीश कार्नाड

त्यांच्यावेळी तेव्हासुद्धा ते काय करायचे, आधी ते tunes करायचे आणि मग ते गाणं लिहिणारा जो आहे गीतलेखक तो त्याला जमेल असे शब्द लिहिणार म्हणजे Lyric come later and the music came first पण मला वसंत देवांची (गाणी) ही हवी होती. तर मी त्यांच्याकडे गेलो आणि मी त्यांना सांगितलं पहा I want this to be set to music तुम्ही करता का? तर ते म्हणाले, "हो करू" आणि त्यांनाही आवडलं कारण मराठी माहित होतं आणि you know, both marathi speakers, particularly Lamikant. And then he did something quiet exemplary. Then I discovered about hindi film Industry की it is not easy to be at the top. When you are at the top you have to work very very hard. And what Laxmikant and Pyarelal did... Laxmikant did because he did the tunes and the orchestration was done by Pyarelal. Laxmikant did a tune, first day, I came, he played it out to me and I said, "नाही लक्ष्मीजी if you don't mind" "नाही ठीक आहे. पुढच्या गुरूवारी भेटू"and then next thursday he had another..."नाही" मी म्हटलं, "नाही जमत नाही" "ठीक आहे" असं दोन तीनदा झाल्यावर मला भीती वाटायला लागली की आता लक्ष्मीकांत रागवेल की काय you know, I have been rejecting his tunes तर ultimately we found a tune which is there "मन क्यू बहका रे बहका" सुंदर आहे ते आणि मी त्यांना लक्ष्मीकांतना म्हटल आत्ता मी सांगू शकतो की I was afraid that you would just say no, I won't work with you because you are rejecting my tunes असं.. तर लक्ष्मीकांत म्हणाला, हे असं आहे we never met people who reject our tunes. आता काय होणार आहे? आता तुम्ही जी tunes reject केलेल्या आहेत they are all in this cassette इथं in the library. आता उद्या किंवा परवा some south indian producer will come and he will say the hero has given me dates next week. I would have a dance sequence, so please give a tune... tune... तिथून काढतो देतो त्याला, तेव्हा लक्ष्मीकांत said आमच्या इंडस्ट्रीत wastage असं नाहीये. तुम्ही जे reject करता ते कुठतरी उपयोगी होईल. And the music was also so good because he kept saying that, you know, we don't get people who say, 'नको हे, give us something else' And thats why it was a great exprience, it was very hard experience, difficult experience because to create whole ambios over a year and so on took a lot of time. But ठीक आहे I enjoyed it very much and it was a great experience because recreating that kind of India, you know, that kind of taste which the patwardhans did the photography by Ashok Mehta you know, because he said to me, "If you are doing this film its no use lighting it as though it was a petromax lamps you know, you have to do it like they were candles... कॅन्डल नाही ते पणत्या so we did.

अजेय गंपावार

वीस वर्षांपूर्वी चारुदत्त-वसंतसेनेच्या काव्यात्म प्रेमकथेवर असा कमर्शियल चित्रपट काढणं ही खरोखरंच एक अतर्क्य गोष्ट होती. गिरीशजी फिल्म इंडस्ट्रीत आम्ही तुम्हाला सगळ्या रूपात स्विकारलं म्हणजे व्हिलनचा रोल असू दे किंवा 'मेरी जंग'मधला प्रेमळ पिता असू दे. पण फिल्म इंडस्ट्रीत काम करताना एक गोष्ट आवर्जून तुम्हाला विचारावी वाटते. अभिनेता, दिग्दर्शक, स्क्रिन प्ले, किंवा डायलॉगस् तुम्ही लिहिलेच आहे. या सगळ्या भूमिका बजावताना आणि सगळ्या प्रवाहात काम करताना एक प्रश्न आवर्जून विचारावा वाटतो की फिल्मसाठी सेन्सॉरशिप असावी का? फिल्मसाठी नव्हे कोणत्याही कलाकृतीसाठी सेन्सॉरशिप असावी का? आत्ताच ते हिंदू पुस्तक आहे त्याचावर बॅन आलं. तर या सेन्सॉरशिपवर तुमचं काय म्हणणं आहे?

गिरीश कार्नाड

एक तुम्ही 'मेरी जंग' mention केलं. तेव्हा एक आठवण येते ती सांगतो. when मेरी जंग came out इकबाल मसूद जिलादी,the critic wrote a criticism and said in 'मेरी जंग', Girish Karnad acts a character who is accused of a crime and is not guilty. But we can not say the same thing about the Girish Karnad. तर पुढे.... No I am against censorship. Censorship should not be there. But sometimes for law and order situation you need cesorship, you know and people use. If the police were not... were able to act as they wan't

to do and didn't have so much political interference as it happens in India. In India what happens is the law and order, the riots that happen, they don't happen naturally. They are created by politicians, you know, and politicians are out of the scenes. They don't happen. So it's sad. That's when you require some kind of censorship just to protect from.. But, you know, when you get a ridiculous thing, 'Dont somke', 'Smoking is bad for health'. when someone smoke, I think it is ridiculous, it does not go. It really kills the film, you know, and you are not looking after health. Afterall you are not banning cigarettes. Government makes money by selling cigarettes and they want film-maker to say, you know, to spoil their films by saying, "smoking is bad for health." Now ह्या तऱ्हेचं जे चालू आहे आणि India unfortunately there are one or two laws. One is 153 A & 295 A which comes long where you occasionally have to go to the police and say, it hurts my religious sentiments and the police arrest them. Now हे... no other civilised country has this. And this is becoming more and more recently and the 'Hindu' is one example. 'Hindu', the book 'Hindu' has been there for twenty years का राहिलं असतं. का? you know she has expressed her opinon. So what I mean, you know, it hurts your sentiments, don't read it. बस... झालं. पण आता ते its gone into millions copies because of the sell. पण काहिही असलं तरी, No, I am against the whole censorship of books and censorship of films, unless it goes through a court of law. Some judge decide that this is dangerous for law and order.

अजेय गंपावार

गिरीशजी तुमचा पहिलाच चित्रपट बॅन झाला होता सेन्सॉरशिपमधे, 'संस्कार'

गिरीश कार्नाड

हो मला पुष्कळ अनुभव आहे त्याचा.

अजेय गंपावार

आणि नंतर त्यालाच राष्ट्रपतींचं सुवर्णकमळ मिळालं होतं त्याच चित्रपटाला गिरीशजी मला वाटतं आता शेवटच्या पर्वाकडे जायला पाहिजे आपण. श्रोत्यांना उद्देशून, कंटाळले आहात आपण? गिरीशजींना विचारायला हवं ना कंटाळले का म्हणून ?

गिरीश कार्नाड

Why don't I get an audience like this for my play?

अजेय गंपावार

पण सर्वजण वाट बघत आहेत ते नायपॉल आणि रविंद्रनाथ टागोरबद्दल तुम्ही पुन्हा काय म्हणता याची.

गिरीश कार्नाड

नाही. Naipaul is a mischievous writer त्याच्याबद्दल प्रश्नच नाहीये. तो... he came to India and he is welcome to opinion. त्याच्याबद्दल मला काही नाहीये. काय... any man as I said I am against censorship. He came to India at the age of twenty five. त्याला कुठलीही भारतीय भाषा येत नाही He doesn't know hindi. He doesn't know Urdu. He doesn't know, you know, any (Indian language) and he writes books on India... He interviews people. तो एक interpreter घेऊन जातो interview करतो सुंदर लिहितो इंग्लिश. As a result he is treated as someone who is given your great insight into India. This I found reprehensive. I protested because he was being honoured as a great for lifetime achievement by the Tatas at the Bombay film festival. I said "Are you... are you honouring this man for this nonsense that he has written against muslims for instance. What does he know? I mean he writes at one point that muslims have destroyed Indian culture. अरे do you know anything about muslim culture? Do you know anything about music? Do you know anything about what the muslims have contributed? तर काय त्याची तीन पुस्तकं आहेत भारतावर. कुठंही संगीताचा उल्लेखच नाही तिथं. तर मी म्हटलं it clearly shows that he is tone-deaf. त्याला काहीच समजत नाही संगीत. Because if you are in India and if you don't write about music, then it means that your ears are something wrong with it. तर these kind of things. So no. I think it created a lot of fuss because you get Nobel Prize. तेच म्हणतो मी, you know you get a prize and everyone put you in a pedestal and says that you can't attack Nobel Prize winner, वगैरे वगैरे पण why not ? I think he doesn't know a damn thing

अनुक्रमणिका

about India. Sorry he doesn't know anything about India and he has a right to say it. I am not denying it. But I have also right to say that he is talking nonsense. आणि with Rabindranath Tagore. Tagore is a great poet. त्याच्याबद्दल शंकाच नाही १९१३ त त्यांना नोबेल प्राईझ मिळालं आणि तेव्हा कन्नड साहित्य आधुनिक कन्नड साहित्याची सुरुवातसुद्धा झाली नव्हती. त्यामुळे कन्नडमधे जे कवी आले ह्या आयुष्यात त्या सगळ्यांवर टागोरचा प्रभाव होता. त्याचं impression होतं. He is a great influence. He is a great poet. He is a great writer, great thinker about nationalism and so on. But as a नाटककार... नाही you know ते नाही जमत. He is a very weak playwright. त्याकाळी काय व्हायच one thing is, all these writers have too much time on their hands, I think. So they used to write plays, they used to write poetry, they used to write philosophy, they used to write novels, they used to write every thing. The same person you know. म्हणजे you know the whole idea was to enrich Literature and all poets you know even kannada everyone writes, you know. He may be a great poet but he also wrote a novel, he may also a playwright and good plays... when you see a good play you see that Tagore couldn't write...

श्रोत्यांमधून

रक्तकरोबी पण का?

गिरीश कार्नाड

हो रक्तकरोबीसुद्धा त्यांनीच लिहिल नं. कारण रक्तकरोबी is all supposed to be exploited people by the mining people, mine people. But the... all the whole description of the poor people is so poetical that you know, Tagore never knew poor people. He came from a land owning family. He lives in the... you know. All those poor people are spouting poetry... beautiful... बंगालीत छानच असेल ते त्याच्याबद्दल प्रश्न नाही पण that doesn't covince you that these are people who are working in the bowls of the earth you know, and secondly त्याच्यात म्हणा... काय ते about that dam which was built त्यांचं एक नाटक आहे I forgotten name... अचलायतन बहुतेक... तर he was in... he has no sense of economic background of what he is talking, you know. He talks about mining, and mining people who do the mining in Raktakarobi are seen as evil people you know तर राजा तो कुठेतरी बसलेला असतो अन् he does it for evil moral purpose तिथं काय ते economic ते... त्याच्यामुळं environmental काय deficiency झाली का? Was he evil man? Why he is evil man? What was economic... हे काय... मार्क्स होता तेव्हा आणि त्याचा परिणाम होता पण, these diamensions he doesn't understand because he never experinced economic deprivation and you know. Tagore writes through. He is very beutiful when he write about children and so on but all within middle class त्याला गरीबांची काही कल्पनाच नाही and when he tries that in his films and so on and in his plays he fails.

अजेय गंपावार

गिरीशजी या साहित्यातल्या बाबी झाल्या पण सामाजिक भूमिकांमधेसुद्धा तुमची काही विधानं वादग्रस्त ठरली. एक तर कन्नड लोकांमधेच कावेरी पाणीवाटप आणि गोहत्याबंदी या संदर्भात तुम्ही जी भुमिका घेतली होती ती कर्नाटकातल्या जनतेला फारशी आवडली नव्हती पण तुम्ही आपल्या भुमिकेवर...

गिरीश कार्नाड

ते खरं नाहीये... नाही कावेरी, ते खरंय. The Karnataka Government and Tamilnadu Government had discussions going on for fifteen years. पंधरा वर्षानंतर रिर्पाट आला. and this report was justified by the loyers of the Karnataka Government saying this is correct. I was present. And the day report was released, I was asked by television what do you think? I said now look we have discussed this for fifteen years I mean you know we have discussed it with Tamilnadu people. They also need water, you know. तर... why we are crating an agitation? afterall how can you reach an agreement if you don't agree to an agreement which is reached after fifteen years by your own representatives. Immediately there was a reaction against me. I was considered anti Kannada anti Karnataķ protamil you know माझे पुतळे... हे... they burnt my images. There were people infront of my house सगळं झालं काय काय व्हायचं. ते पुलिस होते तीन हप्ते बाहेर. Because all the Kannada चेळीवेळ्ळी माझ्या मागे लागले होते आणि त्यांची मागणी होती की मी माफी मागावी.

मी म्हटलं नाही मागणार. काय... तिथ that tamil people also want water. इथं माफी मागण्यासारखं काय आहे? Its a clear statement for... and I won't do that तेव्हा एकटाच कर्नाटकात... तसं पुष्कळ होते जे agreed with me but they were afraid. They were afraid to speak out. People rang me and said, "No we agree with you". पण आम्ही नाही म्हणणार कारण हे कन्नड चेळीवेळ्ळीगर्रुवाले दगडफेक सुरू झाली तर आम्ही काय करणार? तर मी म्हटलं आता म्हणायच आहे ते म्हणून झालं आता I won't take it back and that's it and that is the one thing आणि दुसरं काय गोहत्याबंदी.

नाही गोहत्या it was totally unnecessary. I am not for गोहत्या. मी नाही खात beef, its my pleasure not to eat. But there are people there are dalits who eat beef there are muslims who eat beef is the cheapest form of meat. And they can't afford lamb they can't afford other forms of meat तर because I am a... and any way ते गोहत्या... सावरकर सुद्धा म्हणतात की हे ते गोमांस खायचे ते वैदिक काळात पण आता तो वाद नको आता. पण point is आजच्या दृष्टीने पाहिलं तरी there are poor people for whom beef is an accessible thing. You don't want to eat, don't eat it. You see to it that good cows are not destroyed ते सगळं ठिक आहे पण गोहत्याच करू because आमच्या हिंदूधर्माप्रमाणे ते गोमांस हे... ते this is not acceptable आणि मी आणि अनंतमूर्ती आणि कंबार आम्ही तीघही... एकदा आम्ही ज्ञानपीठ अवॉर्ड विनर we came together and agreed on one issue, की कर्नाटकात गोहत्याबंदी नाही करायची.

अजेय गंपावार

गिरीशजी, एक सबंध करीयर तुमचं... संपूर्ण करीयर जे आहे ते पन्नास वर्षपेक्षाही जास्ती वर्ष झाले त्याला आमच्या वयापेक्षाही मोठं तुमचं कलेतलं उत्तुंग असं करीयर आहे आणि रंगशंकरा या संस्थेनी कर्नाटकामधल्या तुमच्या करीयरला पन्नास वर्ष पूर्ण झाले तेव्हा संपूर्ण भारतातल्या निरनिराळ्या दिग्दर्शकांना तुमची नाटकं पुन्हा दिग्दर्शित करायला सांगितली. या निमित्यानी गिरीश कार्नाड पुन्हा एकदा तरुणाईशी कनेक्ट झाले. कनेक्ट होतेच पण आजचा सिनेमा आजचं नाटक आजचं साहित्य या सर्वांबद्दल तुम्हाला काय वाटतं आणि तुम्ही स्वतःला या सर्वांसोबत कसं कनेक्ट करता?

गिरीश कर्नाड

नाही I am overwhelmed म्हणजे just as I am overwhelmed today की you are doing उत्सव with me because I write not because of, you know, like a film star you become a bigger film star... I write because I want to write plays तितकंच you know मी नाटकं लिहिली. का लिहिली? तर I couldn't stay without writing, its a kind of itch, you know, its an itch you don't get anything out of it म्हणजे तोच वेळ मी फिल्म, acting मधे घातला असता तर मी पैशे जास्त केले असते But I write plays because I write plays... नाटककार... आणि त्याच्या when you find that it has after so many years yeild it so much honour and so on आता तुम्ही ऑनर केला, its very touching I feel at my age its quiet... not many people get that kind of response and I am grateful for it. I am grateful now actually for you all.

अजेय गंपावार

पण गिरीशजी काल प्रदीप वैद्यनी जो अनुवाद केला त्याला तुम्ही मनापासून दाद दिली तो अधिक सरस उतरला आहे अशी तुम्ही खुल्या मनानी दाद दिली. असं सगळे जाणकार सांगातात. मग अश्यावेळी जेव्हा हे तरुण काम करतात तेव्हा तुम्हाला असं वाटतं का की पुन्हा एकदा मी काही करायला पाहिजे यांच्यासाठी? तुम्ही करत आहात पण स्पेशली या तरुण पिढीसाठी तुम्हाला काही करावं असं नव्यानी वाटतं का?

गिरीश कार्नाड

हो. हो. when people ask me which is your best play? मी म्हणतो my next one. कारण त्याकरताच तर लिहितो. नाही तर मी केव्हाच बंद केलं असतं I think I have not reached my best yet. लिहावं ते तरुण पिढीकरता नाही माझ्याच करता. Because I have to mean it. You you have to get out of it. ए. के. रामानुजम् the great anthropologist has a story which you must have heard which is about how stories have to be told in Indian traditional society before television films all came. गोष्टींना फार महत्व होतं because you have to tell stories because people had to listen to it and A. K. Ramanujam always mention, used to mention one stroy which was very beutiful which was about a woman who had four सुना, daughter in laws and

अनुक्रमणिका

they used to harass her, and she would sit and would crumble and groan and she became fat and her stomach became bigger and bigger and bigger because she wasn't speaking to any one Then one day she went for a walk and found an empty house. So she went she faced the eastern house and she cursed, complained not cursed.... gave all her complaints agaist her first daughter in law. And the wall collapse. आणि तिचं पोट जरा कमी झालं. Then she turned to the west and she again complained, and she felt better. And after the forth wall, after the whole house had collapsed she was back to normal. मग ती घरी आली. तर point Ramanujam was making, according to indian tradition its good for the health of creater to be creative, you know. If you have the ability to tell a story, you must tell a story. Because that's not only good for listeners but its good for you and it's good for your health तर त्याप्रमाणे.

अजेय गंपावार

गिरीशजी रामानुजमांनी सांगितलेल्या कथेवर तुम्ही 'नागमंडल' लिहिलं होतं. नागमंडलमध्ये कथा नावाचंही एक पात्र येतं. आणि त्यात अनेक लोकं अनेकांना गोष्टी सांगत असतात. नाटककार असतो, ज्योती असतात. या सर्व एकमेकींना कथा सांगत असतात. गिरीशजी मला वाटतं आता शेवटचा प्रश्न मी विचारतो तुम्हाला. गिरीशजी शेवटचा प्रश्न मी असा विचारतो की सबंध रसिक किंवा भारतीय जनता एकंदरीत गिरीश कार्नाड यांच्याकडे पाहतात ते रंगभूमीवरची भारतीयता म्हणून जगामध्ये तुम्ही रंगीभूमीवरची भारतीयता रिफ्लेक्ट केली किंवा जगापर्यंत भारतीयत्व जे काही आहे ते तुमच्या रंगभूमीच्या माध्यमातून तुम्ही पोहचवलं. अश्यावेळी मला तुम्हाला विचारावं वाटतं की आम्ही जेव्हा तुम्हाला भारतीयत्वाचं प्रतीक समजतो तेव्हा तुम्हाला खरोखर भारतीयत्व रंगभूमीच्या माध्यमात वापरून व्यक्त करता आलं आहे का? ते पूर्णपणे व्यक्त झालं असं तुम्हाला वाटतं का? आणि तुमच्या दृष्टीनं भारतीयत्वाची काय व्याख्या आहे?

गिरीश कार्नाड


नाही मी त्याबद्दल विचार करतच नाही. you write a play... आम्ही नाटक का लिहितो? we write for the प्रेक्षक those प्रेक्षक who are there in the auditorium. त्यावेळी त्यांना ते नाटक आवडलं की नाही हे मुख्य आहे. काल माझं नाटक झालं ते कालच्या प्रेक्षकांना आवडलं नसतं then its a failure. You know its no use talking of I have written a master piece it should go to England वगैरे वगैरे Ultimately the whole thing is about theater which makes it unique is that there is that प्रेक्षक and there is that नटवर्ग and there is this communication you know the flow between the actors and... and if प्रेक्षकांना ते आवडलं नाही, नसेल, ते नाटक तर they make it quiet clear. खोकला सुरू होतो मग you know someone... मग मोबाईल सुरू होतात. you can immediately sense that the audience hasn't liked it. In that sense unlike in a film unlike in a television the audience is also a perticipant in the play. you know, the success of the play depends also on the audience. Audience रंगले तर ते... so that is why I think ullimately the success of a play has to be decided by what happens during on particular performance त्या परफॉर्मन्सला त्याच्या पलीकडे... मग हे हॅम्लेट घ्या. हॅम्लेट is a great play in the world. But if I do Hamlet tomorrow and everyone gets boared then I have failed. Its no use saying Shakespere is a great play wright तिथं... And this is a real test. This is a performing art. It is like संगीत आणि नृत्य you know this is a performing... नाट्य ज्याला म्हणतो की it has to happen in front of the audience. It can not happen... recorded बघून काही मजा नाही येत, खरं म्हणजे ते तिथंच you have to see it and that's it is.

। मुलाखत - अजेय गंपावार
एस ०६, गोल्डन पॅलेस, सुदामा टॉकीज जवळ,
वेस्ट हायकोर्ट रोड, धरमपेठ,
नागपूर ४४० ०१०
भ्रमणभाष ९८२३९७३५९७

। शब्दांकन - अनिल कुळकर्णी
शिरे ले-आऊट,
यवतमाळ ४४५ ००१
भ्रमणभाष : ७५८८१८८४७३

(मुद्रितशोधन - अनिल कुळकर्णी)

अनुक्रमणिका



।। ललित ।।

पांडुरंगाची सांगवी

इंद्रजित भालेराव

■

जळगाव जिल्ह्यात अडावदला एका कार्यक्रमासाठी चाललो होतो. प्रकाश किनगावकर, अशोक कोतवाल, शशिकांत हिंगोणेकर ही कविमित्र मंडळी सोबत गाडीत होती. कार्यक्रमात त्यांचाही सहभाग होता. गप्पांच्या ओघात मी या मित्रांना उत्सुकतेनं विचारलं की नेमाडे सरांची सांगवी इकडेच कुठेतरी आहे ना? तर समजलं की मी ज्या गावी कार्यक्रमासाठी चाललोय तिथून अवघ्या तीस किलोमिटरवर सरांचं गाव आहे. मग मी नियोजन केलं की कार्यक्रम संपल्यावर जो अर्धा दिवस उरणार आहे तो सांगवीत घालवायचा. प्रकाशचं किनगाव तिथं जवळच असल्यामुळं त्याला त्या परिसराची सगळी माहिती होती. त्यानं सोबत यायचं कबूल केलं. अशोक कोतवाल आणि हिंगोणेकरांना घाई असल्यामुळं ते परत फिरणार होते.

आम्ही कार्यक्रम उरकून सांगवीकडं निघालो तेव्हा प्रकाशनं प्रशांत धांडे यांना फोन केला. आम्ही पोचेपर्यंत त्यांना सांगवित पोचायला सांगितलं. प्रकाश म्हणाला, हे प्रशांत धांडे चांगले कवी आहेत, इंग्रजीचे प्राध्यापक आहेत आणि नेमाडेंच्या देशीत्वाच्या संकल्पनेवर पी.एच.डी करताहेत. ते नेमाडे सरांना आणि सांगविला नीट ओळखतात. तेच आपणाला नीट माहिती देवू शकतील. मागे एकदा लोकवाङ्मयची टीम आली होती चित्रीकरणासाठी तेव्हाही प्रशांतनेच त्यांना सर्व मदत केली होती. कारण नेमाडेंच्या कुटुंबियापैकी कुणीच आता तिथं नाही माहिती द्यायला.

अडावद ते सांगवीच्या प्रवासात प्रकाश या सर्व परिसराची माहिती देत होता. यावर्षी पाऊस भरपूर झाल्यामुळं परिसर सर्वत्र हिरवा दिसत होता. रानात पिकं उधाणून आली होती. प्रकाश म्हणाला, हे तापी नदीचं खादं, जमीन समृद्ध आहे, लोकांनी पाणी व्यवस्थापन केलय, मागच्या वर्षी महाराष्ट्रात एवढा दुष्काळ होता तरी इथं विहिरी पाण्यानं डबडबलेल्या होत्या, मे महिन्यात इथलं तापमान चाळीस-बेचाळीसच्या वर जात नाही. हा सगळा शंभर किलोमीटरचा परिसर अत्यंत समृद्ध आहे. इथं प्रामुख्यानं गुजरातमधून आलेला लेवापाटीदार समाज रहातो. हा समाज अत्यंत कष्टाळू आणि मेहनती आहे. घरात आहे भरपूर म्हणून इतर शेतकरी समाजासारखा हा समाज आळशी होत नाही. आणखी-आणखी कष्ट करत राहतो. म्हणून इथली शेतं समृद्धीनं आणि गावंही समृद्धीनं भरलेली आहेत. हे सगळं दिसत होतंच. या परिसराला तापी सारखी मोठी नदी सातपुड्यासारखा डोंगर मिळालेला आहे. नेमाडे सरांच्या लेखनात हे सर्व संदर्भ सतत येतच राहतात.

आम्ही सांगवीत पोचेपर्यंत प्रशांत धांडे तिथं येवून थांबलेले होतेच. सांगवी तसं रस्त्याला लागूनच आहे. गावात शिरतानाच डाव्या हाताला आधुनिक बांधकाम झालेलं महानुभावांचं दत्त मंदिर दिसलं. तिथं आम्ही नंतर आलो. आधी

नेमाडे सरांच्या घराकडं निघालो. गाव तसा फार मोठा नाही. पाच-सहा हजार लोकवस्ती असावी. गावात प्रवेश करतानाच एका घराच्या भिंतीवर शिवसेना आणि बीजेपीच्या या गावातल्या शाखांचे बोर्ड दिसले. तसे बोर्ड राष्ट्रवादी किंवा काँग्रेस पक्षाचे दिसले नाहीत. सध्या गावागावात दिसणारा मनसेचाही बोर्ड दिसला नाही. नेमांडेच्या घरी पोचायला आम्हाला फार वेळ लागला नाही.

गावातल्या विठ्ठल मंदिराला लागून नेमाडे सरांचं घर आहे. तशी इथं नेमांडे सरांची तीन घरं आहेत. दोन आमने-सामने आएि एक थोडं पाठीमागं. हे पाठीमागचं घर नेमाडे सरांना आईकडून मिळालेलं आहे. तीनही घरांना आता कुलपं लागलेली आहेत. या सर्वांचे वारस एकटे नेमाडे आहेत. त्यांना भावू-बहिणी नाहीत. नेमाडे तर मुंबईत राहतात. वर्षातून काही दिवस येतात. राहतात. शेतीचं व्यवस्थापन, टापणटिपण लावून परत जातात.

नेमाडेंच्या आजोबांनी बांधलेला आणि जिथं त्यांचं बालपण गेलं, जिथल्या माडीत बसून त्यांनी कोसला लिहिली ती खोली आम्ही दुरूनच पहात होतो. घराला कुलूप असल्यामुळं तिथं जाणं शक्य नव्हतं. वर जाण्यासाठी बाहेरून असलेलार जिनाही आता काढून टाकण्यात आलेला आहे. हा जीना कोसला लिहिण्याच्या काळात नेमाडेंना प्रतिकात्मक वाटत असे. वर गेलं की 'कोसला'चं आवडतं जग आणि खाली आलं की गरजा भागवणारं जमिनीवर आणणारं माणसांचं भोवतीचं जग त्याविषयी नेमाडेंनी स्वतःच लिहून ठेवलंय,

''रात्री केव्हातरी शिडीवरून खाली उतरायचं जे बऱ्याचदा प्रतीकात्मक वाटत होतं. वीस पावलावर राहत्या घरी पटकन जाऊन यायचं. भूक त्या दिवसात रोज आणि फार लागतच नव्हती, लागली तर किंवा तेव्हाच चुलीजवळ दुरडीत झाकून ठेवलेलं जे असेल ते खायचं तरी शरीर तलवारीसारखं तळ्ळख असायचं. रात्री केव्हाही चहाची व्यवस्था खोलीवरच केली होती. तीव्र एकाग्रतेनं शरीराचा ताबा घेतला. आपण काय लिहितो आहोत, हे तळहातावरच्या आवळ्यासारखं स्पष्ट दिसत होतं, पण का लिहीत आहोत याचं कारण स्वतःत शिरूनच सापडण्यासारखं होतं. आतल्या आत ओसंडणाऱ्या चोवीस वर्षांच्या आशयद्रव्यात परत जाण्याची व्यवस्था''

लिहिताना लेखकाला झपाटून टाकणारी आणि गेली पन्नास वर्षं मराठी वाचकांना झपाटून टाकणारी कोसला जिथं लिहिली त्या खोली समोर उभं राहून आम्ही आश्चर्यानं न्याहळत होतो. सोबतच्या सगळ्यांचच म्हणनं पडलं की लोक आता पैसाच्या खांबासारखं ही खोली पहायलाही येतील. ही जागा आता आरक्षित व्हायला हवी.

'कोसला'तल्या मनीच्या आजाराच्यावेळी ज्या घराचं बांधकाम सुरू असल्याचा संदर्भ येतो ते नेमाडे सरांच्या वडिलांनी बांधलेलं घर या घराच्या समोरच आहे. मध्ये फक्त रस्ता आडवा आहे. मागे एकदा मी वहिणाबाईंच्या गावी आसोदयाला गेलो तेव्हा पाहिल्या तशा सुंदर लाकडी माड्या इथंही गावभर आहेत. उंच दोन-तीन मजली वाडे गावात पुष्कळच दिसली. म्हणजे गाव पुर्वीपासून समृद्ध असावं. सगळी घरं मजबूत बांधणीची आणि दोन ताळाचीच दिसली. पाठीमागं सरांच्या आईचं घर पहायला गेलो तर ते त्याही आधीपासून वहिवाट बंद झालेलं दिसलं. तिथं उग्रवास आला म्हणून पाहिलं तीन मोठ माठाले उंदीर मारून टाकलेले दिसले. मला कोसलातील उंदीर मारण्याचा प्रसंग आठवला. म्हणजे 'कोसला'त धुमाकूळ घालणारे उंदीर अजूनही संपलेले नाहीत.

नंतर आम्ही पाहिली ती नेमाडे सर ज्या प्राथमिक शाळेत शिकले ती सांगवीची शाळा. या शाळेची स्थापना जवळ जवळ शंभर वर्षापूर्वी १८ मार्च १९१५ रोजी झाल्याचे तिथे लिहिलेले आहे. जुनी मजबूत शाळा. तेव्हा ती गावाबाहेर असावी. आता तिथपर्यंत घरं आलेली आहेत. पण शाळा अजूनही गावाबाहेरच आहे. याच शाळेत नेमाडे शिकले. रविवार असल्यामुळं शाळा बंद होती. नेमाडे कुठं बसले असतील याचा अंदाज करत आम्ही सर्व वर्गात खिडक्यातून डोकावून पाहिलं. आधल्या दिवशी म्हणजे शनिवारी म्हणजे ३० नोव्हेंबर २०१३ रोजी शाळेच्या सुविचार फलकावर लिहिलेला सुविचार नेमका नेमाडेंना लागू होणारा होता. तो असा होता.

''लोक काय म्हणतील
याला जो घाबरतो
तो जीवनात कधीही
यशस्वी होत नाही''

नेमाडेंनी कोण काय म्हणतं याचा आयुष्यात कधीच फारसा विचार केलेला नाही. ते त्यांच्या शालेय जीवनापासून खरं आहे. सत्तर वर्षानंतर नेमकं तेच तिथं लिहिलेलं सापडावं याचं मला नवल वाटलं. सांगविची शैक्षणिक परंपरा पूर्वीपासून प्रगत असावी. मी प्रकाशला विचारलं होतं की इतक्या दुरून नेमाडे पुण्याला शिकायला कसे काय गेले? ते प्रकाश म्हणाला की इथल्या श्रीमंत शेतकऱ्यात तेव्हा फॅशनच होती मुलं पुण्याला पाठवायची. तिथं शिकून मुलं डॉक्टर होत. नेमाडे मात्र कला वाङ्मय शाखेकडं गेले. म्हणूनच कदाचित त्यांचं

आणि वडिलांचं पटलं नसावं. वडिलांविषयी नेमाडेंच्या मनात ते असलेल्या रागाला हेच कारण असावं. नेमाडेंनी स्वतः लिहून ठेवलं आहे, ''परदेशात जाणारा मी गावातला शेवटचा माझ्या आधी गावातली शेंबडी पोरं देखील परदेशात जाऊन नोकऱ्या करू लागली''

शाळेच्या बाजूला वाळूचा भाग दिसत होता. प्रशांत धांडे म्हणाले तिथं पूर्वी नदी होती. आता ती राहिली नाही. नेमाडेंनी लिहिलं आहे की दोन नद्यांच्या बेचकीत वसलेलं माझं गाव सांगवी. पण त्या दोनही नद्या आता गायब आहेत. तिथं रस्ते तयार झालेले आहे. महानुभावांचं दत्त मंदिर गावा बाहेर नदीकाठी होतं असा उल्लेख येतो. तेही आता गावात आलेलं आहे आणि नदी नाहीशी झालेली आहे.

शाळेकडून आम्ही दत्त मंदिराकडं आलो. नाव दत्त मंदिर असलं तरी आत मूर्ती श्रीकृष्णाची होती. कुणी महानुभाव साधू दिसले नाहीत. एक भिक्षुणी होती. त्यांनी आस्थेनं पाणी दिलं. ही आस्था महानुभाव मठात असतेच. मठ आधुनिक पद्धतीनं नीट आणि भव्य बांधलेला आहे. एका कार्यक्रमाची जाहिरात लावलेली दिसली त्यात जुन्या ओंकार वर्धनस्थ बीडकर बाबांचा फोटो दिसला हाच फोटो आमच्या घरी रिधोऱ्यातही लावलेला आहे. मला ओळखीच्या खाणाखुणा दिसू लागल्या. नेमाडेंच्या साहित्याकडं सुरूवातीला मी जो आकर्षित झालो ते त्यांच्या साहित्यातले महानुभावांचे संदर्भ पाहूनच कोसलातले सारंगधरबुवा याच मठातले असावेत. आपल्या उदास मनस्थितीत कोसलातला पांडुरंग त्यांच्याशी चर्चा करतो. हिंदू कादंबरीतलं तिरोनी आत्या हे व्यक्तिचित्र देखील नेमाडेंना याच मठात सापडलेलं असावं. त्या मठात उभं राहून मी माझा आणि नेमाडेंचा भूतकाळ जागवत होतो. नेमाडे सरांच्या आई महानुभाव परंपरेतल्या तर वडील वारकरी परंपरेतले. भाग्यवान नेमाडेंना या दोन्ही परंपरा आयत्याच मिळाल्या. त्यांच्यावर प्रभाव पाडणाऱ्या ठरल्या.

महानुभाव मठातून आम्ही परत नेमाडेंच्या घराजवळच्या विठ्ठल मंदिरात आलो. हे मंदिर जुनंच भव्य स्वरूपात आहे. नेमाडेंचे वडील वना नेमाडे रोज या मंदीरात येत असत. मंदीर परिसर प्रसन्न आणि स्वच्छ वाटला. नेमाडेंनी आपल्या वडिलाविषयी 'देखणी'त लिहिलं आहे.

गोड तुझे रूप गोड तुझे नाम
मधुमेही बाप आटोपला

भक्तीचे गुन्हाळ विठ्ठलाचा गूळ
काढता काढता जन्म गेला

जयाचिये घरी पंढरीची वारी
रात्रंदिन फेरी देवळात

बाप तुझा भक्त आळवीत तुज
जखमेचं रक्त वाहताही

हरी हरी! गेला बिचार बापुला
विठू चिकटला पारंबीला

नेमाडेंच्या घराण्याच्या पारंबीला पक्का चिकटलेला विठ्ठल त्याचे हे मंदिर पाहताना आम्ही नेमाडेंच्या वडिलांविषयी चर्चा करत होतो. शेवटची दहापंधरा वर्षे ते मधुमेहाने आजारी व परेषान होते. नेमाडेंच्या आई तशा किरकोळ देहाच्या होत्या. आम्ही विचार करत होतो नेमाडेंना हा जो धष्ट-पुष्ट, निरोगी, खणखर, मजबूत, देखणा देह मिळाला ते आधीच्या कुठल्या पिढीचं जनुक असावं!

आम्ही नेमाडेंचा जो गाव पहात होतो त्याविषयी नेमाडेंनी आपल्या वेगवेगळ्या मुलाखतीत सांगून ठेवले आहे. ''आमच्या गावात वाचन संस्कृती उत्तम होती. गांधीवादी पुढाऱ्यांचा प्रभाव होता. एक उत्तम ग्रंथालय होतं. गावगाड्यातल्या कृषिप्रधान मौखिक परंपरा सगळ्या प्रकारच्या आणि अत्यंत समृद्ध लोकसाहित्य, तमाशे अप्रतिम, गावात महानुभाव आणि वारकरी संप्रदायाची वर्षभर पोथ्या, शिवाय सुटीत मित्राबरोबर सायकलींवरून अजिंठ्याची लेणी पाहायला जायचो-एकंदरीत चांगलं लिहू म्हणणाऱ्याला यांच्यापेक्षा आणखी कोणता वैश्विकांचा वारसा असायला पाहिजे?''

सांगवी पाहून झाल्यावर नेमाडे भालोदच्या ज्या हायस्कूलमध्ये शिकले तिथं आम्ही गेलो. सांगवी पासून पाच किलोमिटरवर हे गाव आहे. रस्त्यानं जाताना प्रशांत सांगत होते हाच नेमाडेंच्या शाळेत जायचा रस्ता. आजुबाजूला केळीच्या समृद्धबागा दिसत होत्या. दोन पुरुष उंचीच्या केळी पाहताना डोळ्याचं पारणं फिटत होतं. लखाटलेली बोरीची झाडंही दिसत होती. नेमाडेंनी या वाटेविषयी लिहून ठेवलेलं आहे.

''शाळेत करमणूक म्हणूनच जात होतो. काहीही वाचा, काहीही खेळा. नवीन सगळं शोधून घ्यायला डोकं, डोळे उत्सुक असायचे. शाळेच्या वाटेवर जाता येताना पोहायचं. शेतांतून माकडमेवा खात फिरायचं. शिक्षणही 'हेल्दी' होतं. मला सर्वच विषयात रस होता. भाषांमध्ये जास्त. सगळ्यात मार्क्स चांगले. शाळाबाह्य शिक्षणही छान मिळायचं, गायी-बैल, म्हशी-रेडे, पक्षी यांचे संबंध डोळ्यावर पडायचे.''

अनुक्रमणिका

भालोदच्या ज्या हायस्कुलमध्ये नेमाडे सर शिकले ते हायस्कुल तापीराम चौधरी यांनी १९२२ साली सुरू केलेले आहे. हायस्कुलची इमारत खूप जुनी, खूप भव्य आणि खूप सुंदर आहे. काही इमारती नव्याने बांधल्या आहेत. नेमाडे सर ज्या इमारतीत बसून शिकले ती इमारतही उत्तम स्थितीत आहे. तिथे अजूनही वर्ग भरतात. त्या खोल्या डोकवून पाहिल्या. यावल तालुक्यातले हे पहिले हायस्कूल. त्याला खूप नावलौकिक होता. इथले वसतिगृह फार प्रसिद्ध होते. ते अजूनही सुरू आहे. उत्तम स्थितीत आहे. इथे १९४० साली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर येवून गेल्याचीही नोंद आहे. ज्या तापीराम चौधरी यांनी हे हायस्कुल सुरू केलं त्यांचा पुतळा आता शाळेच्या आवारात बसवलेला आहे. मधुकरराव चौधरी यांच्या हस्ते त्या पुतळ्याचं अनावरण झाल्याची नोंद आहे.

या हायस्कुलमध्ये असताना नेमाडे सर जे उद्योग करायचे त्याविषयी त्यांनी एका मुलाखतीत जे सांगून ठेवलेलं आहे ते असं,

''शाळेत हस्तलिखितं वगैरे काढण्याची त्यातून टीका वगैरे लिहिण्याची हौस होती. गावात मित्रांच्या कविता ऐकण्याचेही नियमित उद्योग आम्ही करायचो. मला बेभान करणारी पुस्तकं म्हणजे महानुभावांची लीळाचरित्र, स्मृतिस्थळ, सूत्रपाठ आणि दृष्टांतपाठ.

कोसलापूर्वी मी फक्त त्या त्या वेळच्या मित्रांनाच आवडायच्या अशा चिक्कार कविता लिहिल्या होत्या. बालकवी आणि गोदा गौरवकार चंद्रशेखर त्यावेळी माझे सर्वात आवडते कवी होते. नंतर कॉलेजमध्ये मर्ढेकर आणि पु.शि.रेगे शिवाय मी अनेक वर्षे रोजनिशी मी स्वतःसाठी म्हणून लिहायचो.''

याच काळात नेमाडे सरांनी रोजनिशित लिहिलेली एक कविता आता उपलब्ध झालेली आहे. तिच्याखाली असलेली नोंद अशी आहेः २० जून १९५४ रोजी, इयत्ता ९ वी, तुकडी 'अ' नववीच्या वर्गात याच भालोदच्या हायस्कुलमध्ये असताना सरांनी लिहिलेली कविता अशी आहे,

घराघरात शेतकऱ्यांच्या
दैन्यत्रस्त पिढी जन्मा आली
डोंगरातल्या या खेड्यावर
अज्ञानाची सतत सावली

अंधारातिल काळ धुरातुन
आकांक्षांचे लोट उसळती
सत्व हरवल्या दारिद्र्यावर
धेयनिष्ठ हे शिशु कोसळती

खळ्यामळ्यातिल नीरस कामे
व (रोज) चार मैल शाळा पायी
धूर ओकत्या चिमणीवरती
अभ्यासाच्या डूलक्या रात्री

विचार छळती अभ्यासातून
शेतकऱ्याघरी जन्म गुन्हा ?
कुठे चालले जग हे वरती
आपण मातीत पुन्हा पुन्हा

मान न किंमत आपुल्या जीण्या
शतके शतके पशुच जगा
सहू का बरे सदाही स्थिति
स्वतः मरत पोसण्या जगा

ही कविता दीर्घपत्याच्या वृत्तात नेमाडेंनी लिहिलेली आहे. प्रत्यक्षात या कवितेच्या ओळी समोरासमोर आहेत. मी माझ्या पानात मावण्याच्या सोईसाठी तोडून एकाखाली एक लिहिल्या आहेत. नेमाडे म्हणतात तसा या कवितेवर वृत्ताच्या बाबतीत चंद्रशेखर आणि मर्ढेकरांचा प्रभाव आहे. त्यांना आवडणाऱ्या देशी छंदापैकी कोणता छंद त्यांनी वापरला नाही. आशय मात्र पूर्णपणे त्यांच्या जगण्याचा आहे. कुठल्याही ग्रामीण कवितेत अव्वल ठरावी अशी ही कविता आहे. शेतकऱ्यांच्या पोरांच्या व्यथा अत्यंत समर्पकपणे नेमाडे यात मांडतात. साठ वर्षांपूर्वी नेमाडेंनी लिहिलेल्या या कवितेनंतर परिस्थितीत काहीही फरक पडलेला नाही. आजच्या कुठल्याही शेतकऱ्याच्या पोराला त्या भावना आपल्याच वाटतील अशी परिस्थिती आहे. या कवितेतला आशय एका मुलाखतीत नेमाडेंनी गद्यात असा सांगितला आहे.

''शेतकऱ्याच्या घरात जन्म घेणं म्हणजे किती क्लेश कारक होतं, याची आज आपणाला कल्पना येणार नाही. आपली लूट इतकी चालवलेली होती. आता आम्ही खानदेशातले कापूस पिकविणारे शेतकरी पण घरात लोकांना पूर्ण नेसायला कपडे नसायचे. अशी सर्वत्र परिस्थिती होती''

नेमाडे तेव्हा प्रत्यक्ष जे जगत होते तेच नेमकं तेव्हाच्या त्यांच्या या कवितेत उतरलं आहे.

मी या परिसरात यायला निघालो तेव्हा आमच्या महाविद्यालयातले गणिताचे प्राध्यापक डी. एन. शिंदे यांनी मला भरताची वांगी आणायला सांगितली होती. या परिसरात वांग्याचं भरीत हा खास पदार्थ समजला जातो. त्यासाठी

लागणारी विशेष वांगी याच परिसरात पिकतात. दुपारी अडावदला रामदास रजपुतांच्या घरी देखील मी भरीत पुरीच खाल्ली होती. इकडं भरीत पार्ट्या देखील होतात असे समजले. मी प्रशांत धांडे यांना अशी पाच किलो वांगी मला हवी आहेत असं म्हणालो तेंव्हा नेमाडेंच्या सांगवी आणि भालोदमध्ये अशी वांगी विकणारे रस्त्यावर असूनही त्यांनी मला ती घेवू दिली नाही. त्यासाठी त्यांनी मला बामनोदला नेले आणि तिथली खास वांगी मला भेट दिली. हे सर्व झाल्यावर मला पुन्हा कोसलाच आठवली कारण या भरिताचं महत्त्व तिथंही आहे. पांडुरंगला हलवायाचा मुलगा मारतो म्हणून एक दिवस पांडूरंग रोजची वेळ चुकवून उशिरा घरी जायचं ठरवतो. आपल्यासोबत उशिरापर्यंत थांबण्याची विनंती तो आपल्या मित्राला करतो. पण मित्र थांबायला तयार होत नाही. तेव्हा तो मित्र म्हणतो, माझी आई आज वांग्याचं भरीत करणार आहे. मी काही थांबणार नाही. तेव्हा मला तो तसं का म्हणतो ते कळालंच नव्हतं. आज हे सगळं भरिताचं कळल्यावर माझ्या लक्षात आलं की वांग्याचं भरीत हा इकडच्या माणसांचा वीक पॉईंट आहे. आमचे प्राध्यापक डी. एन. शिंदे याच परिसरातले. म्हणून तर त्यांनी मला ही वांगी आणायला सांगितली होती.

पांडुरंगाची सांगवी पाहून घरी परत आल्यावर एक गोष्ट माझ्या लक्षात आली की पूर्वी मी नेमाडेंचं साहित्य वाचायचो तेव्हा मला माझाच गाव दिसायचा. आता मी हा परिसर पाहून आल्यावर मला नेमाडेंचं साहित्य वाचताना पाहून आलेल्या या परिसरातल्या खाणाखुणा दिसतात.

। इंद्रजित भालेराव

एकनाथनगर, परभणी

दूरध्वनी ०२४५-२२२५५८५

।। विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक 'युगवाणी'बद्दल वार्षिक निवेदन ।।

विदर्भ साहित्य संघाच्या 'युगवाणी' या नियतकालिकाची मालकी व इतर बाबी यांच्या संबंधी वृत्तपत्रे आणि पुस्तक नोंदणी अधिनियम, कलम डी १९ (बी) आणि वृत्तपत्रे नोंदणी (केंद्रीय) नियमावली १९५६, नियम ८, नमुना ४, यांना अनुसरून केलेले निवेदन.

०१. प्रकाशन स्थळ :

नागपूर, महाराष्ट्र

०२. प्रकाशनाची कालनियतता :

त्रैमासिक (जानेवारी, एप्रिल, जुलै, आक्टोबर)

०३. प्रकाशकाचे नाव, राष्ट्रीयत्त्व व पत्ता :

डॉ. विलास चिंतामण देशपांडे, भारतीय, सरचिटणीस विदर्भ साहित्य संघ, सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक, नागपूर ४४० ०१२.

०४. मुद्रकाचे नाव, राष्ट्रीयत्त्व व पत्ता :

ॲड्. वासुदेव लक्ष्मणराव विधाते, भारतीय, ॲक्टिव्ह कॉम्प्युटर, नांदेपेरा रोड, वणी, ता. वणी, जि. यवतमाळ ४४५ ३०४.

०५. मुद्रणस्थळ :

ॲक्टिव्ह कॉम्प्युटर, नांदेपेरा रोड, वणी, ता. वणी, जि. यवतमाळ ४४५ ३०४.


०६. संपादकाचे नाव, राष्ट्रीयत्त्व व पत्ता :

अजय जनार्दन देशपांडे, भारतीय, वामनघाट मार्ग, हनुमान नगर, वणी, जि. यवतमाळ ४४५ ३०४

मी डॉ. विलास चिंतामण देशपांडे असे प्रतिज्ञापूर्वक सांगतो की वर दिलेला तपशील माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा आहे.

। डॉ. विलास चिंतामण देशपांडे

सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, नागपूर (प्रकाशक)



सर्वधर्मसमभावाचे जीवनव्रती: पद्मश्री डॉ. यू. म. पठाण

डॉ. रमाकांत कोलते

■

संतसाहित्यातील एकात्मतेची व्याप्ती, व्यक्ती, वर्ण, धर्म, राष्ट्र यापुरतीच मर्यादित राहिली नाही, तर ती विश्वाच्या अथांगतेलाही स्पर्शून गेली. अशाच सामाजिक एकात्मतेच्या दृष्टीने आयुष्यभर कार्य करीत राहणारी जी काही थोडी माणसं आहेत त्यात डॉ. यू. म. पठाण हे एक नाव अटळपणेच नोंदवावं लागेल. ते संतसाहित्याचे केवळ अभ्यासक, संशोधक पंडित नाहीत तर ते संतसाहित्य जगणारे श्रेष्ठ पुरुष आहेत. ''अलौकिका नोहावे लोकांप्रती'' हा विचार अंगी बाळगून त्यांनी लोकमानसाचे उन्नयन करण्यासाठी आयुष्यभर परिश्रम घेतलेले आहेत. अशा या व्यक्तीच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्याच्या हेतूने हा लेखनप्रपंच करीत आहे.

पद्मश्री डॉ. यू. म. पठाणांचा जन्म ९ मार्च १९३० चा म्हणजे आता त्यांनी वयाची पंच्याऐंशी वर्षे पूर्ण केली आहेत. त्यांचा जन्म सोलापूर जिल्ह्यातील करमाळा येथला. डॉ. यू. म. पठाण यांना चांगला कौटुंबिक वारसा लाभला होता. त्यांचे आजोबा आणि वडील या दोघांचाही पिंड धार्मिकतेचा असून उदार दृष्टीचा होता. त्यांचे वडील-त्या काळातले मामलेदार आणि नंतर डेप्युटी कलेक्टर झाले होते. सोलापूर-धुळे भुसावळ-रावेर इ. ठिकाणी नोकरीनिमित्ताने त्यांना जावं लागलं. यू. म. चे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण असं वेगवेगळ्या ठिकाणी झालं. महाविद्यालयीन शिक्षण मात्र सोलापूरच्या दयानंद कॉलेजमध्ये झालं. बी.ए., एम.ए. ते तिथेच झाले. एम.ए. ला ते पुणे विद्यापीठातून प्रथम श्रेणीत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. त्यानंतर त्यांनी तिथेच असताना आचार्य पदवीच्या प्रबंधासाठी अभ्यास-संशोधन केले आणि 'मराठी बखरीतील फार्सीचे स्वरूप'- हा प्रबंध सिद्ध केला. हा विषय संशोधनासाठी निवडल्याचं एक निमित्त घडलं होतं. त्यांचे वडील रावसाहेब/खानसाहेब एम.के.पठाण हे जुन्या काळातले 'फर्गसोनियन' कवी माधव जूलियन यांचे विद्यार्थी होते. माधवरावांनी (एक तप परिश्रम घेऊन) १९२५ साली फार्शी-मराठी कोशाचं काम पूर्ण केलं होतं. त्यावेळी पटवर्धन म्हणाले होते ''या क्षेत्रातलं हे शेवटचंच काम असेल. आता यापुढे फार्सी नि मराठी या दोन्ही भाषा जाणणारं नि त्याविषयी लेखन करणारं कुणी असेल की नाही कुणास ठाऊक!'' या त्यांच्या उद्‌गारांमुळेच पुढे - डॉ. पठाण यांनी निर्धारपूर्वक तोच विषय घेऊन संशोधन केलं आणि आचार्य (पीएच.डी.) ही मानाची पदवी मिळवली. याच प्रबंधाला डॉ. परांजपे पुरस्कार मिळाला आहे. त्यांनी हिंदी भाषेतही एम. ए. करून ते बी. टी. सुद्धा झाले. 'महानुभाव मराठी संतोंका हिंदी साहित्य को योगदान' या विषायातही पीच.डी. केली. रांची (बिहार) विद्यापीठाने त्यांना 'महाराष्ट्रातील धर्मसंप्रदायांचा तुलनात्मक अभ्यास' या विषयावरील प्रबंधाला डी. लिट. ही सन्मानाची पदवी दिली आहे. त्यांच्या हिंदी प्रबंधाला महाराष्ट्र राज्य हिंदी

साहित्य अकादमीचा सर्वोच्च श्री. छत्रपती शिवाजी महाराज एकता पुरस्कार २००४ मध्ये मिळाला. ते मराठीत 'साहित्य विशारद' आणि हिंदीतील 'राष्ट्रभाषा कोविद' सुद्धा आहेत. फार्सी भाषेतील त्यांच्या कार्याला राष्ट्रपतीचा 'राष्ट्रीय भाषा पंडित' असा २००४ मध्येच सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कार लाभला आहे. अशा उच्च विद्या विभूषित डॉ. यू. म. पठाणांनी आतापर्यंतही अध्यापन-लेखन-संशोधन-व्याख्यानं यासाठीच आपलं आयुष्य वेचलं. त्याचं मोल लक्षात घेऊन केवळ महाराष्ट्रानेच नव्हे तर देशपातळीवरही त्यांना पद्मश्रीसह अनेक सन्माननीय पुरस्कार मिळाले. हे पुरस्कार म्हणजे त्यांना जनतेचं लाभलेलं प्रेम म्हणता येईल. जन्माला यावं नि जगावं असं, की त्याच्या अनेक पाऊलखुणा अमीटपणे मागे राहून जातील. तसंच डॉ. पठाण यांचं आजवरचं जगणं आहे आणि असंच यानंतरचही ते असणार आहे.

१९५३ ते १९५९ या काळात सोलापूरच्या दयानंद कॉलेजमध्ये त्यांनी अध्यापन केलं. त्यानंतर १९६० पासून त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात सेवेची संधी लाभली. १९७३ ते १९९० अशी १७ वर्षे ते या विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख होते. विद्यापीठात अध्यापन करताना त्यांनी २५ विद्यार्थ्यांना, विविध धर्मपंथांच्या संतसाहित्याचं संशोधन करण्यासाठी मार्गदर्शन केलं. यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना किती वेळ दिला असेल आणि किती संदर्भ सांगितले असतील, किती प्रेरणा देऊन त्यांचं मनोबल वाढवून त्यांना तयार केलं असेल हे विचारात घेण्यासारखं आहे. त्यावेळचे बहुतांश विद्यार्थी ग्रामीण भागातले-यथातथाच स्थिती असलेले-फारसं वाचन अभ्यास नसलेले असे असत. त्यांना आयुष्यात उभं करण्यासाठी त्यांनी नेहमीच मोठा हातभार लावला. प्राध्यापकाची केवळ पगारी नोकरी केली नाही, तर विद्यापीठात ३० वर्षे काम करताना अध्यापना व्यतिरिक्त संतसाहित्याची पाच हजार हस्तलिखिते गावोगावी हिंडून मिळविली आणि त्यांचा विद्यापीठाच्या मराठी विभागात त्यांनी संग्रह जतन केला. यात महानुभाव संप्रदायाची सांकेतिक लिप्यांतील दीड हजार हस्तलिखिते आहेत. भारताच्या कोणत्याही विद्यापीठाच्या मराठी विभागात एवढा मोठा प्रचंड-हस्तलिखित संग्रह नसावा. या हस्तलिखित संग्रहांचा संशोधनाच्या दृष्टीने अभ्यास करण्यासाठी आपल्या देशातूनच नव्हे तर लंडन विद्यापीठ, लेनिनग्राड विद्यापीठ (रशिया), बॉन विद्यापीठ (प.जर्मनी), कॅथॉलिक विद्यापीठ (बेल्जेलियम), प्राग विद्यापीठ (चेकोस्लोव्हाकिया) इ. देशातून आलेल्या संशोधक प्राध्यापकांनी डॉ. पठाण यांच्याशी चर्चा करून त्यांच्या मार्गदर्शनानं महाराष्ट्रीय संताविषयीचे ग्रंथ/प्रबंध लिहिले व प्रसिद्धही केले. डॉ. पठाण यांनीही आजवर पन्नास मराठी ग्रंथ लिहिले आणि प्रसिद्ध केले. त्यातील ३५ ग्रंथ वारकरी, नाथ, समर्थ, महानुभाव, नागेश इ. पंथातील तसेच वीरशैव धर्मचे व इस्लामच्या सुफी संतसाहित्यावरचे आहेत. त्याशिवाय ४ हिंदी ग्रंथ आणि दोन इंग्लिश मोनोग्राफ्स आहेत. हे इंग्लिश ग्रंथ सिमल्याच्या Indian Institute of Advanced Studies या सर्वोच्च भारतीय संशोधन संस्थेने प्रसिद्ध केले आहेत. यातील अनेक ग्रंथांना महाराष्ट्र शासनाचे, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे, स्नेहवर्धन प्रकाशन इ. चे पुरस्कार मिळाले आहेत.

डॉ. पठाणांनी या ग्रंथांतून विविध धर्मांच्या व पंथाच्या तत्त्वज्ञानाची, त्यातील उदात्त व समान जीवनमूल्यांची, परस्पर सामंजस्याची व एकात्मतेची भावना कशी प्रगट झाली आहे हे समाजमनावर गेली साठ वर्षे ठसविलं व या विविध ग्रंथांप्रमाणेच दै. सकाळ, लोकमत, महाराष्ट्र टाईम्स, पुढारी इ. मराठी नियतकालिकांच्या संत साहित्याविषयक सदरांतून जवळपास तीस वर्षे सतत लेखन करून सद्‌भाव, बंधुभाव व राष्ट्रीय एकात्मतेचा प्रसार केला. विविध धर्मपंथांच्या व्यासपीठावर जाऊनही व्याख्यानांच्या माध्यमातून त्यांनी या विचारांचा प्रभावी प्रसार केला. या कार्यासाठी त्यांना विविध धर्मपंथांच्या संस्थांचे पुरस्कार मिळाले. वारकरी महानुभाव जैन, कौमी तंजीम, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, डॉ. वि. भि. कुलकर्णी, प्रा. अ. का प्रियोळकर, प्राचार्य राम शेवाळकर यांच्या नावाने संतसाहित्य पुरस्कारही लाभले. महाराष्ट्र शासनाचा सर्वोच्च संतसाहित्यविषयक ज्ञानोबा पुरस्कारही त्यांना मिळाला. समाजाने त्यांच्या कार्याची घेतलेली ही दखल त्यांच्या मौलिक कार्याप्रतीच्या कृतज्ञतेची पावती आहे. जीवनाची सार्थकता कशात, याचे उत्तर त्यांच्या या कार्यात आहे. असे ठामपणे म्हणता येते. म्हणूनच त्यांच्या कार्याचं मोल आणि त्यांची योग्यता लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनानं 'महाराष्ट्र भूषण' या सर्वोच्च पुरस्काराच्या निवड समितीच्या सदस्यपदी त्याची तीन वर्षांसाठी नियुक्ती केली. अशा कार्यासाठी किती निःस्पृहता आणि किती निष्पक्षता हवी ते सांगण्याची आवश्यकता नाही. ती डॉ. पठाणांजवळ असून तारतम्यपूर्ण निर्णयक्षमता ही त्यांच्या ठायी असल्याशिवाय अशी निवड होणे शक्य झाले नसते. विद्यापीठातील विभाग प्रमुखपदी कार्य करीत असताना त्यांनी दहा वर्षे बहिःशाल शिक्षण मंडळाचं सचिवपद सांभाळलं. त्यावेळी त्यांनी मराठवाड्यात २५० खेड्यांमध्ये बहिःशाल केंद्रे स्थापन केली. त्यात अनेक वक्त्यांच्या सहकार्याने विविध धर्मपंथविषयक व्याख्याने आयोजित करून आणि स्वतःही व्याख्याने देऊन

सामाजिक सद्भाव वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न केला. विविध समाजातील भेदभाव, असहिष्णुता नाहीशी करण्यासाठी हे त्यांचे प्रयत्न निश्चितच उपयुक्त ठरले असावेत. बौद्ध, जैन, इस्लाम, वीरशैव, शीख, ख्रिस्ती आणि हिंदू धर्मांच्या व्यासपीठावर त्यांनी पाच दशके महाराष्ट्रभर व्याख्याने प्रवचने दिली. त्या व्याख्यानांनी श्रोते आनंदानं न्हाऊन निघालेच पण त्यांनी स्वतःही खूप आनंद घेतला. विदर्भात तर झोपडीतून प्रशस्त चौसोपी वाड्यापर्यंतही वैदर्भी चारी ठाव भोजनांनं आणि आतिथ्यानं त्यांना मोहून टाकलं. त्यांनी 'तरुण भारता'तील 'असा विदर्भ अशी व्याख्याने' या लेखांमध्ये लिहिलं आहे ''विदर्भाच्या ह्या मृदगंधानं वर्षानुवर्षे धुंद झालो, बेधुंद झालो, हरवून गेलो... विदर्भाच्या मोठ्या मनाचे कितीतरी पैलू त्यात लकाकून गेले '' त्यांनी विदर्भ किती पिंजून काढला होता हे लक्षात येतंच. शिवाय त्यावेळच्या त्या त्या शहरातल्या-गावातल्या लोकांशी त्यांनी किती प्रेमाचं नातं निर्माण केलं होतं हेही दिसून येतं. विदर्भाविषयीचं प्रेम, इथल्या लोकांविषयीचा आदार, त्यांच्या कार्याचं कौतुक-गौरव आणि एकूणच विदर्भाप्रतीची कृतज्ञ भावना त्यांच्या शब्दाशब्दांतून व्यक्त झाल्याची या लेखांमधून स्पष्ट झाली आहे. एवढंच नव्हे तर विदर्भातील सामाजिक आणि सांस्कृतिक स्थितीचं त्यातून दर्शन घडतं. या दृष्टीनं या लेखांचं महत्त्व मानावं लागतं.

महाराष्ट्रात 'संतपीठा'ची स्थापना व्हावी यासाठी गेली चार दशके त्यांनी अव्याहत प्रयत्न केले. यामागेही धर्माधर्मातील व पंथापंथातील भेद्भाव नष्ट होऊन परस्पर सामंजस्य प्रस्थापित व्हावे व सामाजिक सद्भावना वाढीस लागावी, हाच हेतू होता. 'संतपीठ' निर्माण झाल्यावर या 'संतपीठ' समितीचे विश्वस्त आणि सदस्य म्हणून त्यांनी प्रारंभापासूनच काम केले. १९९० साली पुण्याला भरलेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनातच त्यांच्या अध्यक्षीय भाषणात संतपीठाची स्थापना का करावी, त्याची आवश्यकता काय याविषयी आग्रहाने त्यांनी पाठपुरावा केला होतो. संत-पीठाची उद्दिष्टे व कार्यप्रणाली कशी असावी या संदर्भात शासनास सादर केलेल्या अहवालात त्यांचा प्रमुख सहभाग होता. त्याची नोंदही शासनाच्या अहवालात करण्यात आली. आज काळानुरूप व परिस्थितीनरूप त्यात काय परिवर्तन करावे यासाठी सध्या शासनाने नेमलेल्या अभ्यासगटाचे ते प्रमुख आहेत. संतपीठ पैठणला स्थापन झाले असून ते कार्यान्वित करण्यात त्यांचा सक्रिय सहभाग आहे. महाराष्ट्राच्या बहुतांश दैनिकांतून त्यांनी संतसाहित्यविषयक स्तंभलेखन केलं आहे आणि आजही ते सुरूच असतं. त्यातूनच 'नामयाची अभंगवाणी' 'बहिणी म्हणे' या सारखे ग्रंथही प्रसिद्ध झाले असून त्यांना पुरस्कारही लाभले आहे. महाराष्ट्र शासनाच्या www.Mahanews.gov.in या शासकीय वेबसाईटमध्ये 'संतपरंपरा' हे विविध धर्मीय आणि विविध पंथीय संतविषयक सदर २००९ ते २०११ या तीन वर्षात त्यांनी लिहिले. लक्षणीय म्हणजे त्यास पंच्च्यानऊ लाखांपेक्षा. अधिक व्हिजीटस् होत्या. त्या विषयीचा 'महाराष्ट्राची संतपरंपरा' या ग्रंथाचा पहिला भाग पुण्याच्या दिलीपराज प्रकाशनाने प्रसिद्ध केला आहे. महाराष्ट्र शासनाने अनेक समित्यांवर त्यांची नियुक्ती केली. अल्पसंख्यांक आयोगाचे सदस्य, महराष्ट्र भूषण पुरस्कार निवड समितीचे सदस्य, 'मराठी बालभारती' पुस्तकाच्या संपादन समितीचे अध्यक्ष, संतपीठ समितीचे सदस्य, म.रा.सा.संस्कृती मंडळाचे सदस्य, विश्वकोश निर्मिती समितीचे सदस्य अशा अनेक पदांवर काम करून त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला. मराठवाडा साहित्य संमेलन, चौथे महाराष्ट्र संतसाहित्य संमेलन, अचलपूर. प्रबोधन साहित्य संमेलन, राष्ट्रीय बंधुता संमेलन, इंदूर शारदोत्सव, औदुंबर साहित्य संमेलन आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन इ. साहित्य संमेलनांचे अध्यक्षपदही त्यांना लाभले. त्यांनी निरंतर केलेला साहित्याचा व्यासंग, लेखन, व्याख्यानं यासाठी केलेले परिश्रम ह्यामुळेच ते घडलं आहे यात शंका नाही. त्यांनी केलेलं विविध प्रकारचं लेखन, 'संतपीठा'चं कार्य, मिळालेली पदे, मान, सन्मान याविषयी समाधान व्यक्त करताना, 'परमेश्वराने मला सुखी माणसाचा सदरा दिला' असे भावपूर्ण उद्गार, त्यांनी एका व्याख्यानातून काढले. यातूनही त्यांच्या प्रसन्न आणि प्राजळ मनाचे दर्शन घडते.

१९९० च्या अ. भा. म. साहित्य संमेलनाध्यक्षाच्या पदासाठी त्यावेळी श्री रमेश मंत्री, कवी नारायण सुर्वे, डॉ. गंगाधर पानतावणे आणि डॉ. यू. म. पठाण निवडणुकीला उभे होते. खरे तर यातील पहिल्या तीन उमेदवारांमध्येच विशेष चुरस होती. त्या तिघांचेही चाहते मतमोजणीच्या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. पठाणांच्या जवळचे औरंगाबादचे मराठीचे प्राध्यापक नागनाथ कोत्तापल्ले आणि डॉ. पठाणांचे स्नेही डॉ. रामचंद्र देखणे अशी चार दोन मंडळीच त्यावेळी उपस्थित होती. डॉ. पठाणांचे नाव चुरशीत सर्वात शेवटचे उमेदवार म्हणून गणले जात होते. मात्र आश्चर्य असे की डॉ. पठाणच निवडून आले. त्यावेळी ते कथाकार आणि पूर्व संमेलनाध्यक्ष शंकर पाटील यांच्या घरी निवांतपण बसले होते. निर्वाचन अधिकाऱ्यांनी निकाल कळविला त्यावेळी ते महाराष्ट्र साहित्य परिषदेत हजर झाले. हे. सारे कसे घडले असावे? मतदारांपैकी ८० प्राध्यापक होते. त्यातील अनेक त्यांचे विद्यार्थी आणि अतर अनेक स्नेहीच होते. ऋजू स्वभावाच्या डॉ.

अनुक्रमणिका

पठाणांप्रती आणि सर्वधर्मसमभवाचे कार्य करणाऱ्या एका व्यासंगी साहित्यिकाप्रती त्या सर्वांमध्ये निश्चितच आदर-प्रेम असावे म्हणूनच त्यावेळी ते मतपेटीतून व्यक्त झाले. अशा अनेक कार्यांचे, सन्मानाचे, धनी असलेले डॉ. यू. म. पठाण हे आमचे गुरुवर्य आहेत ही किती स्वाभिमानाची आणि भूषणावह गोष्ट आहे? त्यांच्या कार्याचा हा काही पूर्ण आलेख नाही. ठळक ठळक अशा कार्यांची ओळख करून देण्याचा मी प्रयत्न केला आहे. त्यांच्या ग्रंथांची, साहित्यविषयक कार्याची, धर्मपंथाविषयक प्रबोधनाची, शैक्षणिक कार्याची, महाराष्ट्रभरातील व्याख्यानांची, आकाशवाणीवरील व्याख्यानांची, संशोधन विषयक कार्य आणि मार्गदर्शनाची, हस्तलिखित पोथ्यांच्या संकलनाची केवळ यादी जरी विचारात घेतली तरी संपूर्ण आयुष्यच त्यांनी स्वतःला त्या कार्यात गुंतवून घेतलं हे लक्षात येतं. 'रिकामा जाऊ नेदी क्षण' हे त्यांच्या रोमारोमात रुजलेलं दिसतं. महत्त्वाचं म्हणजे या साऱ्या कार्यात त्यांनी प्रेमरस ओतला. ते खऱ्या अर्थानं समाजाचे शिक्षक म्हणून जगले. प्रबोधनकार म्हणून जगले. त्यांच्या एकूणच साऱ्या भूमिकेला प्रेमभावनेचं अधिष्ठान असल्याचं आम्ही नेहमीच अनुभवलं आहे. माझे मित्र आणि डॉ. पठाण सरांचेच विद्यार्थी असलेले डॉ. गोविंद देशपांडे यांनी त्यांच्या प्रती व्यक्त केलेली भावना त्यांच्या व्यक्तित्त्वावर प्रकाश टाकणारी आहे. त्यांनी लिहिलं आहे. ''डॉ. यू. म. पठाण यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विलोभनीय साक्षात्कार त्यांच्या वक्तृत्वातून घडतो. तीव्र स्मरणशक्ती, जिव्हेवर वावरणारी सरस्वती, रसाळ व परिणामकारक शैली, विषयाचे मूळातून केलेले चिंतन, काळानुरूप अन्वयार्थ शोधण्याची धडपड, 'इदं न मम' मानण्याची निर्मम वृत्ती अशा किती तरी गुणांमुळे त्यांची व्याख्याने रंगतात. रसाळ व प्रभावी वक्ते म्हणून देश त्यांना ओळखतो.''

कथालेखन हा डॉ. यू. म. चा मूळचा आवडीचा प्रांत. त्यातच त्यांना पुढे संशोधनही करायचं होतं. पण माधव जूलियनांच्या विधानामुळे त्यांचं मत आरंभीच्या काळातच मराठी बखरीतील फार्सीच्या स्वरूपाचा शोध घेण्याकडे वळलं. बखरीचं स्वरूप ऐतिहासिक कथात्मक असं असतं. म्हणूनही त्यात त्यांना गोडी वाटली असावी. नंतर नंतर मात्र प्राचीन ग्रंथांच्या अभ्यासाकडेच त्यांच्या मनाचा ओढा राहिला. त्याचे संशोधन आणि संपादन हे त्यांच्या अभ्यासाचे क्षेत्र राहिले, महानुभाव साहित्य संशोधन, जैन धर्मीयांचे मराठी साहित्याला योगदान, मध्ययुगीन ख्रिस्ती साहित्य, यावर त्यांनी प्रकाश टाकला. मराठी संत साहित्याचा त्यांचा व्यासंग तर अवघ्या महाराष्ट्राला ज्ञात आहे. धर्माधर्मांच्या नावावर वाद-विवाद आणि विघटन होत असतांना डॉ. यू. म. पठाण यांनी मात्र हे सारेच प्रवाह संस्कृतीला कसे पोषक आहेत याची समाजाला वेळोवेळी जाणीव करून दिली. मराठी साहित्याच्या व्यासंगात वाहून घेतलेली महाराष्ट्रात जी नावे आहेत त्यातील डॉ. यू. म. पठाण हे एक महत्त्वाचं नाव आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी (८३ व्या) सरांची निवड झाली, त्यावेळी विदर्भसाहित्य संघातील त्यांच्या सत्कारप्रसंगी त्यांनी म्हटलं होतं. मराठी साहित्याच्या प्रत्येक प्रांतात मी मनाला भावेल त्या त्या वेळी शिरलो आणि त्यात रंगून गेलो. कुठल्याही अर्थाने कुंपन घालून घेतले नाही. म्हणूनच त्यावेळी डॉ. वि. भि. कोलते यांनी म्हटलं होतं. ''डॉ. पठाण यांनी आपल्या चौफेर कर्तृत्वाने मराठी साहित्याचे क्षेत्र पुलकित करून टाकले आहे.''

पंचेचाळीस वर्ष कधीचीच मागे निघून गेलीत. तरी त्यावेळच्या मराठवाडा विद्यापीठातील मराठी विभाग आणि त्यात प्रसन्नतेचा सुगंध निर्माण करणारे गुरुवर्य डॉ. यू. म. पठाण आजही लख्ख मनाशीच आहेत. प्रा. वा. ल. कुळकर्णी विभागप्रमुख तर डॉ. पठाण आणि डॉ. रसाळ त्यावेळी त्यांचे सहकारी होते. वा. लं. चा जबरदस्त दरारा आणि विद्यार्थ्यांवर भरभरून प्रेमही. रसाळ हे अत्यंत गंभीर, तासभर धोधो वाहणारा वाङ्मयेतिहासाचा प्रवाह. विद्यार्थ्यांना विशेष मात्र गुरुवर्य डॉ. यू. म. पठाणच! त्यांचा वर्गातला प्रवेशच मनं प्रसन्न करून टाकणारा! 'मन करारे प्रसन्न' हे नित्य त्यांच्या मुखावरच! सर, भाषाशास्त्रांचे, प्राचीन वाङ्मयाचे तास घेत. बी. टी. असल्यामुळेच की काय, प्रथम फलकावर काही मुद्दे भराभर लिहीत आणि मग त्यांचे स्पष्टीकरण. विद्यार्थ्यांच्या मनाची त्यांची पकड मात्र, फलकावर लिहितांना पाठमोरे असूनही कधी सुटत नसे. विभागातील त्यांच्या खोलीत, एवढेच नाही तर त्यांच्या घरीही विद्यार्थ्यांचं सदैव स्वागत असे आम्ही अनेकदा जात असूं. आमच्या मराठी विभागात, मराठवाड्याच्या अनेक गावांमधल्या महानुभाव हस्तलिखित पोथ्यांचं संकलन करून एक महानुभाव संशोधन केंद्रच स्थापन केलं होतं. हे काम अत्यंत महत्त्वाचं होतंच पण तेवढंच ते परिश्रमाच होतं. साहित्याच्या प्रेमापोटी त्यांनी ते आनंदानं केलं. 'याला महाराष्ट्राच्या सांस्कृतिक साधनांचे जतन आणि संवर्धनाचे कार्य असे म्हणता येईल. या महत्त्वाच्या कार्यात त्यांना कबलेबाबा देशमुख या निष्ठावंत महानुभावांचे साह्य मिळाले.'

आमच्या दृष्टीनं ते आमच्या आयुष्यातील भारलेले दिवस होते. वा. ल. यू. म. व सु. न. यापैकी कुणाचाही एकही तास

सोडण्याची मनाची कधी तयारी झाली नाही. दोन वर्षात क्वचितच अटळ अशा कारणास्तव मी वर्गाला गेलो नसेल! तासातून भरभरून आनंद मिळायचाचं शिवाय सरांच्या शिकवण्यातून घेतलेलेया नोंदीच अभ्यासाला पुरेपूर होत. त्या नोंदींचे कागद आजही माझ्याजवळ आहेत. त्यावरील कोपऱ्यात सरांचं नाव, तारीख पाहिली म्हणजे आजही मोरपिसांवर हात फिरवताच त्यानं मोहरून जावं तसं मन उल्हासीत होतं आणि ते क्षण निघून गेल्याची हुरहूर वाटते! तो ठेवा आजही मी जपून ठेवला आहे.

साऱ्या विद्यार्थ्यांशीच सरांचे अत्यंत प्रेमाचे नाते. डॉ. गोविंद देशपांडे, डॉ. यशवंत मनोहर, डॉ. बा. दा. जोशी, प्रा. तु. ग. माने आणि मी, आम्ही वर्धा-यवतमाळ नागपूर सारख्या त्यांच्यापासून दूरच्या ठिकाणी, तरीही ते या भागात आले म्हणजे आम्हांला भेटतच राहिले. वेळ-प्रसंगी घरी मुक्कामही केला. मार्गदर्शनही करीत राहिले. लेखनाला प्रेरणा दिली. आमच्या लहानशा लेखनकार्याचे, साहित्यिक उपक्रमाचे कौतुकही केले. सुख दुःखातही सहभागी झाले. असा आपलेपणा! विद्वान व विद्यार्थी-प्रिय प्राध्यापक, चिंतनशील प्रवृत्तीचे लेखक, प्रभावी वक्ते या नात्याने ते सर्वपरिचित आहेत. ते केवळ संतवाङ्मयाचे प्रवक्ते असते तर पुस्तकी पंडित म्हणून मान्यता पावले असते पण सर्वाभूती ईश्वरी तत्त्व शोधणारा अध्यात्मिक वृत्तीचा, जाती, धर्म यांच्या पलीकडे जाऊन समत्व शोधणारा, आणि अडचणीत असलेल्यांसाठी सहकार्याचा हात पुढे करणारा संत प्रवृत्तीचा माणूस हे त्यांचे वैशिष्ट्य होय. 'देव पाहावया गेलो । देव होऊनिया ठेलो' असा संतांना अनुभव आला. 'संत बोलावेया गेलो । संत होऊनिया ठेले' असा अनुभव त्यांच्या संदर्भात येतो. संतवाङ्मयावर अधिकारवाणीने बोलणारे, मराठी संताच्या विश्वात्मकतेची महती गाणारे पठाण सर मुस्लीम समाजाला मार्गदर्शन करतानाही संकुचिततेचा संदेश देत नाहीत. हे मी औरंगाबादच्या वास्तव्यात पाहिले आहे. 'ओठी एक आणि पोटी भलतेच' हा सर्वसामान्यांचा धर्म ओठात आणि पोटातही तेच हे सरांचे अस्सल स्वरूप. १९९० मध्ये डॉ. पठाण अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलाचे अध्यक्ष झाले. त्या निमित्तानं विदर्भ साहित्य संघ नागपूर येथील सत्कारप्रसंगी डॉ. वि. भि. कोलते म्हणाले होते, ''ज्यांचे संपूर्ण कुटुंबच संस्कृतीसंपन्न आहे असे डॉ. पठाण साहित्य संमेलनाध्यक्ष व्हावे हे मराठी भाषेचे मोठेच भाग्य आहे. ...१९५९ साली मराठवाडा विद्यापीठात मराठीचे व्याख्याते म्हणून डॉ. पठाण यांची निवड करणाऱ्या समितीत मी होतो. त्या निर्णयाची आता मला धन्यता वाटते. कारण डॉ. पठाण यांनी आपल्या चौफेर कर्तृत्वाने मराठी साहित्याचे क्षेत्र पुलकित करून टाकले आहे.'' ह्याच वेळी समारंभाचे प्रमुख अतिथी आणि डॉ. पठाणांचेच विद्यार्थी डॉ. यशवंत मनोहर यांनी म्हटले- ''धर्म-पंथ निरपेक्ष अभ्यासाच्या संशोधन वृत्तीचा आदर्श डॉ. पठाण यांनी घालून दिला. ...व्यासंगाला वाहून घेण्याच्या महाराष्ट्रातील थोर परंपरेत डॉ. पठाण यांचा क्रम बराच वरचा लागतो. इतके ते व्यासंगात रंगून गेले आहेत. विद्यार्थ्यांशी अतूट नाते-प्रस्थापित करण्याच्या त्यांच्या वृत्तीमुळेच ते गरुपेक्षाही जास्त आदरास पात्र ठरले आहेत.''(तरुण भारत ३०/११/८९)

२० डिसेंबर १९९० च्या तरुण भारतात, डॉ. यू. म. पठाण यांनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या लाभलेल्या अध्यक्षपदानंतरच्या एक वर्षभराच्या कालावधीत, संमेलनाध्यक्ष म्हणून काय कामगिरी केली याचा आढावा दिला आहे. अशा प्रकारची जबाबदारी मानणारे आणि त्यानुसार कार्य करणारे विरळच म्हणावे लागतील. त्यावेळी ते म्हणाले होते, ''संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात मी संतसाहित्यातील उदात्त मूल्यांची आजच्या काळातील गरज प्रतिपादिली होती. देशात धर्माधर्माच्या नावाखाली विघटनाचे वारे वाहात असताना आपले संतसाहित्यच आपल्याला तारू शकेल, अशा आशयाचे विचार मी मांडले होते. संमेलनात तसा ठराव होऊन महामंडळामार्फत तो शासनाकडे पाठवून त्याचा पाठपुरावाही केला होता.'' डॉ. पठाणांच्या भाषणातील संतपीठाचा हेतू, त्याची उपयुक्तता आणि आवश्यकता या मांडणीमुळे महाराष्ट्रातील अनेक व्यक्तींनी/संस्थांनी त्यांना पोषक असा प्रतिसाद दिला. त्यातही काहींनी प्रत्यक्ष संतपीठाचा हेतू लक्षात घेऊन त्यांच्या त्यांच्या स्तरावर कार्यालाही आरंभ केला. डॉ. पठाण यांनी 'बोले तैसा चाले'या उक्तीप्रमाणे महाराष्ट्रभर या कार्यासाठी भ्रमंती केली अनेकांशी संपर्क केला. पू. आनंदऋषीजी महाराज यांच्या अहमदनगर येथील पाथर्डी बोर्डाने त्यांना सर्व प्रथम प्रतिसाद दिला. संतसाहित्याविषयक व्याख्यानमालेचे आयोजन, परिसंवाद, चर्चा, संतसाहित्याचे प्रकाशन, इ. साठी त्यांनी तयारी दर्शविली. कामालाही आरंभ केला. कोल्हापूरचे दक्षिण महाराष्ट्र जैन साहित्य सभा, पिंपरी चिंचवड येथील सावरकर मंडळ नि ज्ञानप्रबोधिनी गोमांतक साहित्य सेवक संघ पणजी, सांगलीच्या महात्मा गांधी स्मारक संस्था, यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस येथील मल्लिकार्जून मंदिर विश्वस्त संस्था, या ठिकाणी डॉ. पठाण यांनी प्रत्यक्ष जाऊन संतपीठ आणि संतसाहित्याविषयक व्याख्यानमाला, साहित्य प्रकाशन या बाबत व्याख्याने दिली. आणि या विषयाबाबत लोकांमध्ये प्रेरणा निर्माण केली. या सर्व ठिकाणी त्यांनी भेटी दिल्या. याशिवाय दिल्ली, कर्नाटकातील गुलबर्गा, आंध्रप्रदेश

मराठी साहित्य परिषद याही ठिकाणी जाऊन त्यांनी भाषणे दिली. मी दिलेली ही माहिती संक्षिप्त असली तरी यासाठी डॉ. पठाणांनी किती तरी परिश्रम घेतले. पत्रव्यवहार, भेटी-गाठी, प्रत्यक्ष व्याख्याने-विचारविनिमय चर्चा, संमेलनाध्यक्षाच्या वर्षभराच्या कालावधीत करून त्यांनी त्यातही, अध्यक्ष अत्यंत मोलाची साहित्य सेवा करू शकतात याचा आदर्श वस्तुपाठ समोर ठेवला. इच्छा-तळमळ महत्त्वाची. कार्य त्यासोबत येतच असते. तसे ते डॉ. पठाण यांनी केले आहे. ''संमेलनाच्या अध्यक्षाला फारसे अधिकार नाहीत असे मानले जात तरीही संमेलनाध्यक्षपद प्राप्त करण्यासाठी साहित्यिकांमध्ये जेव्हा तीव्र स्पर्धा होते तेव्हा, केवळ ती मान सन्मानासाठी असते, असेही कुणाला वाटू शकते. पण साहित्य संमेलनाचे अध्यक्ष कती उपयुक्त साहित्य सेवा करू शकतात याचे प्रत्यंतर गतवर्षी पुणे येथे झालेल्या ६३ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. यू. म. पठाण यांनी सादर केलेल्या त्यांच्या वर्षभरातील कार्याच्या आढाव्यावरून स्पष्ट होते.'' (संपादक तरुण भारत, नागपूर) मला वाटते अशा प्रकारची कळकळ फार कमी संमेलनांध्यक्षांनी दाखविली आहे.

'क्षणापाठी क्षण जोडत' त्यांनी साहित्याचं वाचन, मनन, मंथन केलं. महानुभाव साहित्याचं संशोधन करणाऱ्या डॉ. पठाणांना स्वामी चक्रधरांचं 'श्रवण, मनन, मंथन तेणे ज्ञान होए' हे सुभाषित चांगलं ज्ञात होतं. एवढंच नव्हे ते स्वतःमध्ये त्यांनी रुजविलं होतं. यातूनच त्यांचं व्यक्तिमत्त्व घडलं. जीवनव्रती होऊन त्यांनी ते निर्माण केलं असं म्हणावं लागेल. आम्ही मराठी विभागात एम. ए. करीत असतांना पाहायचो, वर्गातील तासाव्यतिरिक्तच्या वेळेत, ते त्यांच्या खोलीत बसून अखंड वाचन-लेखन करीत असत. प्रा. वा. ल. कुलकर्णी, प्रा. सु. न. रसाळ आणि डॉ. यू. म. पठाण यांना मराठी विभागात स्वतंत्र खोल्या होत्या. आमच्या या गुरुवर्यांकडे विद्यार्थ्यांना येऊन त्यांना अडचणी विचाराण्यात, त्यांच्याशी चर्चा करावी याचे नेहमीच प्रोत्साहन असे. डॉ. पठाणांच्या तर आम्ही घरीही जायचो. एम. ए. झाल्यानंतरही औरंगाबादला जाऊन त्यांना भेटण्याचा मला अनेकदा योग आला. त्या त्या वेळी ते वाचन-लेखनातच व्यस्त असल्याचे मला दिसले. एकदा अमरावतीला विद्यापीठात राष्ट्रसंत तुकडोजींवरील व्याख्याननिमित्त ते आले असता, मी त्यांना भेटण्यास गेलो. तर, ते सुफी संताचा अभ्यास करीत होते. एकदा ते यवतमाळात आले होते. त्यावेळी दिलीप कोलते उपजिल्हाअधिकारी असतांना, डॉ. वि. भि. कोलते काही दिवस या त्यांच्या मुलाकडे राहायास आले होते. डॉ. यू. म. पठाणही कोणत्या तरी कार्यक्रमानिमित्तानं यवतमाळात आले होते. भाऊसाहेब कोलते यवतमाळात असल्याचे कळताच, डॉ. पठाण यांनी भाऊसाहेबांशी 'उखाहरण' या संपादित काव्यासंदर्भात चर्चा केली होती, याचे मला स्मरण आहे. प्रवासात असतानाही संकलित साहित्याचे कागदपत्र, त्याच्या फाईल्स, काही संबंधित पुस्तकं त्यांच्या सोबत असत. प्रवासात आणि मुक्कामाच्या ठिकाणी जवळ आणलेल्या साहित्याचं वाचन दुरुस्त्या आणि लेखन ते करीत. अशा प्रकारचा निरंतर व्यासंग डॉ. पठाण यांनी केला असून ते व्रत आजही सुरू आहे. म्हणूनच 'साहित्य जीवनव्रती' हे बिरुद त्यांना शोभून दिसतं.

आज वयाच्या ८५ व्या वर्षातही डॉ. यू. म. पठाण यांचे स्तंभलेखन वृत्तपत्रांमधून वाचायला मिळते. मानवी जीवनाच्या सार्थकतेसाठीचा मार्ग या लेखनातून वाचकाला ते दाखवित असतात. मानवी संस्कृतीला समृद्ध करणारा विचाराचा वारसा ते आपल्यासमोर ठेवतात. कबीर, तुकाराम, ज्ञानेश्वर, नामदेव, तुलसी, नाथ, मोहंमद आदी कवींच्या काव्यातील, अभंगातील जीवनमूल्ये समाजासमोर डॉ. पठाण ठेवतात. ही त्यांची तळमळीची कळकळीची भावना लक्षात घेतली तर, त्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित होत होत, त्याने किती उंची गाठली हे लक्षात येते. त्यांच्या मनानं जात-धर्म-भाषा यापलीकडची झेप घेऊन-स्वच्छंद असे निर्मळ/आनंदमयी पर्यावरण माणसाच्या जीवनातही निर्माण व्हावं, हा सद्भाव लेखनातून व्यक्त केला. त्यांच्याच म्हणण्यानुसार लेखन हा त्यांचा आनंद आहे. त्यातूनच त्यांना ऊर्जा मिळते आणि त्यांना जगावसंही वाटतं. एका दृष्टीनं लेखन हा त्यांच्या आयुष्याला बळ देणारा, जगण्याचे मनोबल वाढविणारा आणि आनंद देणारा अतूट असा महत्त्वाचा विषय आहे. साहित्याशी त्यांच नातं असं घट्ट असून त्यातच ते समरसून गेले आहेत. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनात डॉ. यू. म. पठाण यांना आदराचं स्थान आहे. ''त्यांच्या पठाण या आडनावामुळे तर मराठीचे अभ्यासक व वाचक यांच्याकडे विशेष कुतुहलाने आणि आदराने पाहातात, ...त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विशेष हा की, त्यांच्या आदरापोटी, मराठी भाषा-संशोधनाचा कार्यामुळे त्यांचा धर्मही जनसामान्यांच्या मनात कधी येत नाही, त्यांचा अभ्यास-व्यासंग यामुळंच नव्हे तर त्यांच्या माणूसपणामुळे त्यांच्याप्रती कोणालाही, आदरच वाटतो'' हे डॉ. वि. भि. कोलते यांचे उद्गार (महानुभाव साहित्य संशोधन डॉ. यू. म. पठाण : प्रस्तावना पृ. ५-६) निश्चितच अत्यंत सार्थ आहेत.

। डॉ. रमांकात कोलते
०८, जिजाऊ नगर, यवतमाळ
भ्रमणभाष : ९८५०३२१२१३

अनुक्रमणिका

।। तीन कविता ।।

अजीम नवाज राही

■

खेचरांच्या कळपातला जिराफ

नदीच्या कोरड्या पात्राने
पहावी धराणाच्या ओघळभर कृपेची वाट
तशी पराधीनता
अनुभवली नाही आजवर
माझ्या पानगळींच्या खिशात होते
बहारांच्या ठावठिकाणांचे पत्रे
तहानेचे निमित्त करून
बडवली नाही छाती
म्हणून झाली वाळवंटातही
ओल शोधण्याची मोहीम फत्ते.


ढेकरांच्या मैफलीत
ठरली माझी उपासमार खास
चिडणारे चिडले,
बाटवला त्यांनी
फुटाणा खाऊन उपवास.
कैकांच्या
बॅकबॅलन्सला
छळली
माझ्या काखेतली फाटकी झोळी
गिळली पाण्याविना
त्यांनी गुपचूप बिपीची गोळी
माझी निश्‍चिंत फकीरी झोप बघून
जडला कैकांना रोग निद्रानाशाचा.

सकारात्मक दृष्टिकोनाच्या ताकदीवर
तुडवला बिनधास्त वाळवंट संघर्षाचा
अन्यथा झाले असते वाटोळे
कारण माझ्या संबंधांचा
परिघच होता दळभद्री
बड्या कलेज्याची माणसे समजून
गेलो ज्यांच्याजवळ
त्या चिरकुटचोरट्यांनी
समजून घेतली नाही
जाळाशी अबोला धरणाऱ्या चुलीची व्यथा
जाळला नमनाला घडाभर तेल
पंचपक्वान्नांवर ताव मारत
ऐकवली एकतिळ सातजणांनी खालल्याची कथा.

सातबाऱ्यातली झाडे बहरू नये कधी
घेतली याची दक्षता त्यांनी
वावरले सुतकी चेहरा घेऊन आयुष्यभर
पानगळी डोळ्यांना त्यांच्या
झाला नाही सहन बहर इतरांचा.

जावू द्या,
नाही मिळाली तर नाही मिळाली
वागणूक सलोख्याची
आज ना उद्या
भेटतील माणसे बड्या कलेज्याची
विहिरींनी झिडकारले म्हणून
कशाला डोहातले पाणी प्यावे
खेचरांच्या कळपात
जिराफाने बुटकेपणाचे सोंग घ्यावे.

◆◆◆



अनुक्रमणिका

जमाखर्च मोहल्ल्याचा

भोगणाऱ्यांनी भोगले
सोसणाऱ्यांनी सोसले मोहल्ल्यात
मी केली फक्त अनुभवांची उसनवारी
वेचले कवितेच्या सजावटीसाठी
दिवसागणिक प्रसंग डझनवारी
भाषेच्या बुक्कीने
कथनाचा कांदा फाकवला
हव्यास ढेरपोट्या आकृतीबंधाचा भागवला
घडवली गडगंज शब्दशिल्पे
तडीस नेली सृजनाची आधाशी विकल्पे.

वाळक्या पानांचा ढीग
वावटळीने दुरवर पांगावा
कवितेतून करतो तसा मी
निखारे मोहल्ल्यातले वेचल्याचा कांगावा.

कावळे, चिमण्या, साळुंक्या
मशिदीवरीची कबुतरे मायाळू
थवा बदकांचा
रांगेत तलावाकडे जाणारा
डोळे सूर्याचे थिजण्याआधी
शिस्तीत घराकडे परतणारा.

मी अनुभवतो दररोज
उधळण जीवनरंगांची मोहल्लाभर
अभिव्यक्तीच्या पदरात पडली
सृजनाची संधी नामी
राहिली नाही कधीही
झोळी कवितेची रिकामी.

माझ्या दरिद्री अभिव्यक्तीच्या पदरी कुठे ?
मनोहारी दृश्यांची मालिका रम्य
रांगा बोगनवेलीच्या
बारमाही गुलाल उधळणाऱ्या.
कवितेच्या चष्म्यापुढे माणसं
उघडीनागडी, बेहाल, कष्टी
विदारकतेच्या तडाख्यात घामेजलेली प्रतिमासृष्टी
सगळीकडे घोंघावणारा उदास, भकास वारा
रंजनमूल्यांना मिळेल कसा
भेगाळलेल्या मुलखात थारा.

अस्ताव्यस्त दैनंदिनीच्या तळाशी
बिजे कवितेची संगतवार
वास्तवाच्या टरफलाचा
बिजांना भक्कम आधार.
तिक्ष्णतेचा अभाव नजरेला नडतो
भाषेचा पदर वेळप्रसंगी तोकडा पडतो
वाचू शकत नाही मी
वंचितांच्या संचितांच्या खतावण्या
लांबलचक दुर्दैवाच्या दावण्या
आयुष्याची हिस्सेवाटणी बैलबजारी.

मोहल्ला जीवनजाणीवांचा पोळा
रंग, रेषा, आकारांचा मेळा
अपेक्षाभंगाचा भलामोठा खड्डा
समस्यांचा आवडता अड्डा
भाषेपलीकडची चित्रे रेखाटणाऱ्यांना
माहोल सदानकदा उत्साहवर्धक
दिवस आकारविहीन, संध्याकाळ, प्रश्नार्थक

मोहल्ला पडझडीची दीर्घ कादंबरी
प्रत्येक पानावर
मजकूर काळीज पोळणारा
झरा आसवांचा,
ओळीओळीत शोक धून वाजवणारा
तांडा प्रश्नचिन्हांचा
उगवती-मावळतीवर हुकूमत गाजवणारा.
वेलांटीच्या शिंकावर धास्तीची मडकी
विरामांच्या सांधीबोळात दबा धरून
पावलापावलावर छळणारी कडकी.
सोडत नाही पळभरही पिच्छा
पूर्वग्रहांनी जन्माला घातलेला धोका
मोहल्ल्याच्या नशिबी कायम
समास अपेक्षाभंगांचा ओकाबोका.

अनुक्रमणिका

तडजोडीच्या भट्टीत भाजल्या मोहल्ल्याने
प्रापंचिक गणितांच्या विटा
प्राणपणाने जपला संघर्षाचा आवा
मोहल्ल्याबाहेर घुमला ग्लोबली पावा
पाव्याच्या सुरावटींची झाली
परिसंवादातून चर्चा धुंवाधार
दुर्लक्षीतपणाच्या वाकळीखाली
रडली गरिबी मोहल्ल्यातली ढसाढसा.

युगभानाची दुर्बोध बाराखडी
गिरविली नाही मोहल्ल्याने अद्याप
म्हणून उतरली नाही टाळक्यात;
जीवनशैली उजळवणारी
नव्या व्यवस्थेची बाजारकेंद्री भाषा
अवाक्याबाहेर राहिला
चिमटीत आलेला जगाचा नकाशा
जगण्याच्या झाडाला लदबदले प्रश्नांचे घड
हातातच आली नाही,
तर पडणार कशी सैल कालस्वरावरची पकड.

नवरदेवाचे ओझे पाठीवर पेलत
वरातीत नाचणाऱ्या घोड्यासारखे
जगला मोहल्ला जिणे
पौर्णीमेच्या शेतात अमावस्या पेरणाऱ्यांचे
चुकून काढले नाही उणेदुणे
फाटक्या जिंदगीला मारत राहिली आशावादाच्या गाठी
आज ना उद्या पडेल
उपेक्षेच्या उंटाच्या पाठीवर शेवटची काठी.

डोळे वटारत राहिले मौलवीमुल्ला
धार्मीक संवेदनशीलतेत
अडकला विकासाचा पल्ला
मोहल्ल्याच्या निद्राशून्य डोळ्यांत
स्वप्ने विवस्त्र अथांग
रेल्वेच्या फाटकावर जशी
खोळंबलेली वाहनांची रांग
रात्र पॅसेन्जरगाडीसारखी
कासवाच्या गतीने पुढे सरकणारी.

आशावादाच्या सामसूम स्टेशनवर
स्वप्ने एखाददोन फटीचर
पायात मुंडके खुपसून पेंगुळणारी
उशाशी भिक्षापात्र घेऊन
फ्लाटावर घोरणाऱ्या फकीरासारखी.


मोहल्ल्याची स्वप्ने तरी काय?
नासलेल्या दुधावरची साय
पंगत उठण्याची वाट बघत
मंगलकार्यालयाबाहेर घुटमळणाऱ्या
उपाशी वाजंत्र्यांसारखी
झोपभर भटकून, भटकून
साकारतेच्या उन्हाला पारखी.

रात्र दिन कवितेत फोडली मी
विदारक घटनांची खडी
तरी भेदता आला नाही
पिढीजात संघर्षाचा डोंगर कभिन्न
सुतक्या ओळी स्वतःच्या असण्यावर कावल्या
पापण्या भाषेच्या दारिद्र्याच्या वर्णनानंतर ओलावल्या.
गड जिंकल्याच्या अविर्भावात
मी देतो कवितेला पूर्णविराम
वास्तवाचा तळ ढवळल्याची
कागदभर फुशारकी मारतो
अन् काही घटना नोंदविरहीत
मांडतात शब्दांविरुद्ध ठराव निषेधाचा.

मोहल्ला निमूटपणे सहन करतो
चंगळवादी प्रवृत्तींचे समर्थन
नव्या जमान्याची चकाचौंद प्रभावळ
हसत, हसत टाळतो
पांगळ्या गरिबीचे पंख कुरवाळतो
काळवंडू देतो
चेहरा मनात बांधलेल्या गृहितकांचा
उघड्या डोळ्यांनी बघतो
अल्पायुष्यी स्वप्नांची धींड
एक बूजवली तर पडते उघडी दुसरी खिंड
मोहल्ल्याच्या दैनंदिन जमाखर्चाने
पोसला पिंड माझ्या कवितेचा.

◆◆◆

अनुक्रमणिका



आढा

काही प्रश्नांची उत्तरे मिळत नसतील
तर त्यांना काळाचे सुपूर्द करावे
सदानकदा मिरवू नये
नकारात्मक कारणांचा झेंडा
आपली वाढ खुंटली म्हणून
ओरवाडू नये दुसऱ्याचा झेंडा.

काळाला काही सांगावं लागत नाही
काळ पदे नसलेल्या समिकरणांनाही
वठणीवर आणतो पद्धतशीरपणे
काळ करतो सगळे उघडेनागडे
चुकीचे काहीच खपवत नाही
जे करायचे ते करतो नाकावर टिच्चून
ताकाला जाताना गाडगं लपवत नाही.

काळ स्वतः विणतो प्रवासाचे ताणेबाणे
अन् स्वतः निवडतो वाट
सगळं काही असतं नियंतत्रणात त्याच्या
काळ नसतो,
टोलनाका चुकवणाऱ्या वाहनासारखा सुसाट.

काळाच्या नियमावलीवर कुरघोडी करणारे
कालच्या पराभवाने खचले जरूर
पण बदलली नाही भाषा त्यांची उर्मट
आजही ठासून बोलतात ते
आम्ही ठरवू ते धोरण
आम्ही बांधू तेच तोरण
ते प्रामाणिक एवढे की,
करावी त्यांच्या खेटराची पुजा
अन् मग्रूर एवढे की
खेटराजवळही करू नये उभे.
काही काळ मीही होतो
अनुयायी त्यांच्या सांप्रदायाचा
अबदागीर अपेक्षांची घेऊन
चाललो पायी मैलोन मैल
भोपळे हिसकावणाऱ्यांनी
कधी पदरात टाकला नाही आवळा
प्रलोभने देताना केला मात्र
कात्याचा नायटा, पराचा कावळा.

किती लपवा, कितीही दडवा
बिंग फुटते आपोआप
आढ्यावर जाऊन बोंबलते
वर्षोगणती दडवलेलं पाप.


। अजीम नवाज राही
साहिल हाऊस
जाफ्राबाद मोहल्ला,
मु.पो. साखरखेर्डा,
ता. सिंदखेडराजा -४४३ २०२
जि. बुलडाणा
भ्रमणभाष ९४२१३९६६६९

अनुक्रमणिका

।। चार कविता ।।

मनीषा साधू

■



जानवर

दिसू नये बैठकीतून म्हणून
सरकवलं कितीही खाटलं
तरी पडल्या-पडल्या
अर्ध अंग उचलून
नानी डोकावतच राही
बाहेरही अन आतही !

फराळाच्या बश्या
बाहेर जातांना ओरडे
करुण आवाज काढीत
मला दे नं वं...!

खोल गेलेल्या अधाशी डोळ्यातून
वासना मागत राही
चरमरीत, चरचरीत जेवण

लुचाड झालेल्या
सोरपटासारख्या,
पांढऱ्या जिभेला
तीव्र चवीच देऊ शकत
अस्तित्वाची जाणिव

नानी गिळत राही
वरणात गोळा-भात कुस्करून

आतड्यांचे सुतडे बेजार होत
तिच्या हौशिनं
रात्री-बेरात्री करकरा
खाजवत राही म्हातारी
जुलाबाची खाजवण
सफाईवाल्या मावशी
चवताळून फेकत
भरले लुगडेच मोरीत
म्हातारीच्या जागी

अत्ता-अत्तापर्यंत जायच्या सरपटत
मोरीपर्यंत नानी,
दिवसाला दहा-दहांदा!
तरी चुकूनही कधी
'नको'यायचं नाही तोंडात
खायचं समोर पाहून

मरणाऱ्याची वासना
दाबू नये म्हणून
खाऊ घालायचे तात्या
जातीनं तिला

वेळीअवेळी ओकाऱ्यांचे
झंपरही धुवायचे मग
रांजणाशेजारी गुपचूप!

काकी, पाहून न पाहिल्यासारखं करीत
चार माळा जास्तच ओढायची
म्हातारीला ने म्हणून!

आयुष्यभर जगाची लाज बाळगत
डोक्यावरचा पदर
ढळू न देणाऱ्या नानी
स्पंजिंगला खुशाल
दोन्ही पाय वर धरून
कंबर उचलायच्या
कुणाच्याही समोर
दाखवायच्या सुजलेली जागा

सारखी याला-त्याला
हात धरून ओढून-ओढून
मुतानं भरलेल्या अंथरूणात
शेजारी बसवायला बघायच्या कुणालाही
तेव्हा दर्शन व्हायचं काकींना
मनुष्य प्राण्यातल्या आदिम जाणिवेचं
समाजाचे पाश, बंध
प्रथा, परंपरा, संस्कार
शिकवण अथवा दडपण
या साऱ्या पलीकडे उभ्या असलेल्या
आतल्या वखवखत्या जानवराचं!
आणि आयुष्याच्या या टप्प्यावर
माणसाला हरवणाऱ्या
भयाण अगतिक, केविलवाणेपणाचं

शहारून काकी जास्तच ओढायच्या
दहा माळा, पुटपुटत,
'मला तरी ने रे बाबा!...

विचारलं एकदा त्यांनी
हिम्मत करून तात्यांना
'मरू का देत नाही म्हातारी?'

एवढंच बोलले तात्या
मला भेववतंय
जनावर तिच्यातलं!
तिला सोडलं
का तुला धरीन म्हणतंय!
म्हणून मी त्याला
तिच्यातच पोसतोय!

तुंबडून तुंबडून
शांत करायला बघतोय
वखवख त्याच्यातली
माझ्यापर्यंत पोचेस्तवर!

◆◆◆

आभाळाच्या आत गुंतले

आभाळाच्या आत गुंतले कण मातीचे
आभाळाने तोलून धरले कण मातीचे!

तिच्या गुंतण्याचाही त्याने उत्सव केला
किती साहले हलके हलके कण मातीचे!

मुग्ध राहणे, मुग्ध वाहणे, उत्सव झाला...
तिचे राहिले अता कुठे हे कण मातीचे?

तुफान सरता जलधारांनी उतरून आले
आभाळाने कुठले? कुठले कण मातीचे?

गरज

'मॅडम, हे बघा याच्या मिऱ्या
अश्या सुरेख येतात!'

'मॅडम, याचं डिझाईन असं
पदरभर येतं!'

'मॅडम, तुमच्या उंचीवर
छान ड्रेप होईल!'

बायकी लचकत, कमरेभोवतालून
चपट्या छातीभर पदर ओढीत
तो एक...

बाहेर, उघड्या स्तनांनी
पदराशिवायची, मिऱ्यांशिवायची
ती एक...

आत, उलगडणाऱ्या नकोश्या घड्या
अख्ख्या ठाणभर लपेटून गुदमरलेली
ती एक...

◆◆◆

अनुक्रमणिका



मी काय नाय केलं आई

आई, बघ ना
कसं बखोटं धरून आणलंय यांनी मला इथं
चोर-दरोडेखोर असल्यासारखं
मी काई नाई केलं आई...शप्पथ!

मला खूप भिती वाटतेय गं...
खूप भिती!
किती घाण आहे इथे आजूबाजूला बघना
वास येतोय कुबट नुसता!
कशीतरीच माणसं बसलियेत सगळीकडे

हे... हे इथे आणून डांबलंय मला... जेल मध्ये
चक्क सळाखींच्या मागे?
असं कसं होऊ शकतं आई?
मी आणि जेलमध्ये?

माझ्या मनगटावर काचे पडलेत बघ
करकचून दाबलं त्यांनी
बाबांनी बर्थडेला दिलेलं 'फास्टट्रॅक'चं घड्याळ
तिथंच पडलं कुठंतरी
शोधू पण नाही दिलं...

बाबा तर म्हणतीतही आतस,
'तुला किंमतच नाही वस्तूंची!'

आई, बाबांना काहीसुद्धा सांगू नकोस प्लीज...
मारतील ते मला
मी खरंच काही नाही केलं गं... तुझी शप्पथ!
सच्या बोल्ला, चल!
मी गेलो त्याच्या बरबर...
म्हणला, 'काई लोच्या नाई,
मस्त पार्टी आहे, कोंबडी-बिंबडी...
अरविंदा पण होता... तो गं, बाजुच्या बिल्डींगमधला,
तुझ्या मैत्रिणीचा मुलगा
आन तो हेमंत पण, जो पयला आल्यावर
घरी पेढे घेऊन आला होता
आणि तुला इंप्रेस करायला पायापण पडला तुझ्या!

आई आम्ही सगळेच होतो
कुणालाच ठाऊक नव्हतं की तिथे ड्रिंकपण ठेवणारेय
मक्या म्हणाला, 'घे ना लेका, बिअर तरए नुस्ती!'
मी म्हटलं, 'छे! आपण नस्तो घेत
लेका मार पडंल ना घरी गेल्यावर, ठेव ते!'
तर तो म्हणतो कसा, 'कोण सांगणारेय?
तो सच्या बघ, विस्की घेऊ लागला, मर्दए तो
तू नुस्ता कोक पीत बैस! रिंग्या!'

मला अस्सा राग आला ना आई!
आई, तरी मी नाही प्यायलो गं, खरं सांगतो!
पोरी पण घेत होत्या महितेय?
अन नाचत होत्या फ्लोरवर झक्कपैकी!
ती रुचीए ना, ती तं आरव्याच्या गळ्यातच पडली
भानच नव्हतं कुणाला,
आस्सा डीजे वाजत होता ना, सॉलीड!
बास, नाचतच होतो हां आम्ही नुस्ते
आणि तेवढ्यात काय कळलंच नाय,
पोलीस कसे का आले ते...
आम्हीतर दुसरं काही केलंच नाही!

आई गार्डनमध्ये आमची सिनीअर पोरं होती ना
त्यानला पकडलं आधी, मग आम्हालाई
आम्ही म्हटलं पण तेनला, आम्ही काय नाय केलं,
तं म्हणे, 'श्रीमंतांची धेंडं आहेत लेकाची,

अनुक्रमणिका

ड्रग घेता लमच्यांनो ?'
आम्ही तं शॉक!
मी म्हटलं पक्याला, ड्रग कोणी रे घेतले ?
तं म्हणे ते सिनीअर बघना... झींगलेत लेकाचे,
त्यांनीच घेतले असणार

आई मी आसं करेल का कधी ?
या लोकांना सांग नं, मी असं नाई करत कधी
तू ऑफिसल जातांना देतीस ना
तेवढ्या पैशातच भागवतो मी रोज
पिज्झा, बर्गर आन पेस्ट्री...
मी कधी दुसरं काही खातो का ?

बाबांना नको सांगूस,
ते म्हणतील, 'हा काहीही करेल एखादवेळेस!
मागे नाही का याला सिगरेट पितांना पकडला ?'
ते त्या दिवशीचं तुला माहीत आहे आई,
मक्या बोल्ला, की फक्त एकच कश मारून बघ
तेवढाच... पयला अन शेवटला...
अन नेमका बाबांनी पायऱ्या उतरतांना पाह्यला!
मल तर खोकला पण होता ना तेव्हा
मग कसा घेईन, सांग ना!
ते तर काय, विश्वासच करत नाही माझ्यावर
आता तूही नेहमीसारखं म्हणू नकोस,
'बिघडलेल्या पोरांच्या संगती राहातोस,
तर भोग आता फळं!
हातकड्या पडल्या की येईल अक्कल ठिकाणावर!'
झालं ना तुझ्या मनासारखं ?

ती मुलं बिघडलेली नाहीत आई
तू आणि बाबा ऑफिसला गेलात की एकटा पडतो मी
तेच सोबत करतात माझी
तुम्ही दिलेले पैसे वेळ घालवायला मदत करतात,
पण मन नाही रमत घरात
मक्या-पक्या रोज नव्या आयडिया काढतात
मग धम्माल करतो आम्ही
पण आसं काई नाई करत गं
तू ये ना लवकर इथे,
सगळ्यांचे आई-बाबा आलेत
ते तर पोलीसशीच भांडताहेत,
कुणीसुद्धा आपल्या पोरांना मारलं नाही
तुम्ही मात्र आधी मलाच बदडाल

अरे यार आई!
चालेल मारा मला वाट्टेल तितकं,
पण... प्लीज या आधी इथे, मला बाहेर काढा
दोघेही या... हो, बाबांना सांग तू... प्लीज या...


मी पुन्हा कुठेच नाही जायचा
घरातच राहीन, अभ्यास करेन
नवी बाईकपण नाही घेऊन मागणार
नवा फोन पण नाई...

आयपॅडवर पिक्चरपण नाई बघणार दिवसभर
गाणी नाई ऐकणार सारखी

आणि हो, कानाला पिअर्सींग पण नाही करवून घेणार,
तू म्हणतेस तसं, मुलींसारखं!
माझी चोटीपण सोडून टाकली मी
यापुढे नवा एवढास्सा टॅटू...
छे! नाव काढायचा नाही!

आई प्लीज ये... प्लीज...

। मनीषा साधू
२०१, महर्षी विनायक अपार्टमेंट
प्लॉट नं. ०६, स्केटिंग ग्राऊंडजवळ
स्वावलंबी नगर, नागपूर - ४४० ०२२
भ्रमणभाष ९८२३२६२९६६



।। चार कविता ।।

अशोक रा. इंगळे

■

मी चाललोय पुढे...

तुझे हत्तीचे बळ घेऊन
मी चाललोय पुढे... पुढेच... पुढे
किती अडथळे मात केली सांगू तुला
ग्लोबलयुगी अजूनही जात छळते मला.
म्हणून मी शोषून घेतोय टिपकागदागत
गुदमरलेल्या श्वासांच्या इंद्रियजन्य संवेदना
नि साकारतोय
विषमतेची हिंस्र नखे नसलेल्या माणसांचे शिल्प
ग्लोबल युगातील नवा पाथरवट बनून.
मी मोहरून आलो की बहरून आणतोय
'कॉमन मॅनची' हिरवी मने
विश्वास नावाच्या शब्दाचे क्रेडिट कार्ड देऊन
तथागताच्या महामायेची स्वप्ने
पृथ्वीवर सजविण्यासाठी
अशावेळी जिथे चुकत असेल तिथे
मी माझ्याचसाठी झरेझर होतो
नि महाचिंतक बनून समजून घेतो
ऋतूंच्या जगण्याची विराट स्पीड.
हे नागवंशीय मित्रा!
मी चाललोय पुढे...पुढेच...पुढे
विश्वाची समग्र हालचाल मेमरीत साठवून
पर्यावरणातील जहरी विषाणूंना गोठवून
मी चाललोय पुढे...पुढेच...पुढे
तुझ्या महास्वप्नांना फिनिक्स बनविण्यासाठी
ग्लोबल युगाची पावलं
युगप्रवर्तक कर्तृत्वाच्या दिशेनं रूजविण्यासाठी
मी चाललोय पुढे...पुढेच...पुढे.

◆◆◆

मी दुःखाचं जनरल स्टोअर्स

मी दुःखाचं जनरल स्टोअर्स
जिथं मिळतात साऱ्या संवेदना
महागाईच्या अग्नीत
तावून सुलाखून
एक वर एक फ्री
वाजवी रेटमध्ये

तरीही...

आपल्याला एन्जॉय करता यावा
जगण्याचा म्हणून
आपण पाहतो सानिया मिर्झाला
टेनिसमध्ये.

आपल्याला एन्जॉय करता यावा
म्हणून
आपण सारखे चॅनल बदलत राहतो
तेव्हा सचिन खेळत असतो
ESPN वर
त्याच्या नावे नोंदला जातो
धावांचा पंधरा हजारी रेकॉर्ड
अन् आपली सरकार दरबारी
नोंदही नसते.

आपल्याला एन्जॉय करता यावा
म्हणून
आपण बनतो विश्वनाथ आनंदच्या
खेळातील प्यादं
कुणालाही आपला बळी घेता यावा
म्हणून.

खरं तर, फॉरेनरसारखा
आपल्याला एन्जॉय करता येत नाही
जगण्याचा
हे समजल्यापासून
खूपच आनंद वाटू लागलाय
या अन्हॅपी जगण्याचा.

◆◆◆

आयडेंटिटीचे ब्रँडेड युद्ध

हे धमन्या धमन्यातील रक्त
सळसळवणाऱ्या
माझ्या बाप्पा!
तुझ्या मेंदूतली समष्टी
मी अजून समजून घेऊ शकलो नाही.
तू दिलेले ज्ञानकण, अन्नकण, द्रव्यकण
सारे सारे प्राषण करून
मी लढतोय रंगागणावर
आयडेंटिटीचे ब्रँडेड युद्ध

हे माझ्या बाप्पा !
तुझ्या टच स्क्रीनवरील सुवर्ण परिवेणात
मला चिंब भिजू दे
भिजू देत माझी दीक्षांत हाडं
होवू दे त्याचा सम्यक स्तूप
उद्याच्या र्निजंतूक उदिष्टांसाठी.

हे कचऱ्याला ईसिप्त स्थळी पोहचवणाऱ्या
जीवनदायी प्राणजळा!
आता, अवती भोवतीचे सायबर टायफून
तुझ्या पिढ्यांना निश्चल बसू देणार नाही
कुठल्याही ग्रहावर माझा नॅनो माऊस
क्लिक केल्याशिवाय
जीवसृष्टी बोलू शकणार नाही
इतके मल्टीडायमंड हत्तीचे बळे
तू मला दिले आहे
माझ्या प्रिय बाप्पा.

हे लक्ष लक्ष दीप उजळून
क्रांतीचे सुत्त रचणाऱ्या माझ्या बाप्पा!
तुझ्या प्रज्ञा प्रतिभेसमोर,
अंधार थरथर कापतो,
अन्यायाला पॅरालिसिस होतो
आणि अधिकारांची कबुत्तरे
सर्वदूर उडू लागतात
तुझ्या कव्हरेज क्षेत्रामध्ये...

◆◆◆

शहरी संवेदनेशी जुळवून घेताना...

या शहरी संवेदनेशी जुळवून घेताना
मी फुटतो पाण्याच्या पाईप लाईन्ससारखा
नि पसरत जातो शहरभर.

मी गावखेड्यातून कामानिमित्त
शहरात येतो तेव्हा;
शहर हसऱ्या मुखाने माझे स्वागत करते,
थोडावेळ आपल्या कुशीत सामावून घेते;
पण जेव्हा मी शहरात वास्तव्याला येतो
तेव्हा हे शहर मला विचारते
तुम्ही कोण?

ई-चौकश्या करणाऱ्या या शहराला
मी कुठली आयडेन्टेटी देऊ?
फेसबुकवरील मित्रांची की,
संपर्क न ठेवणाऱ्या नातलगांची की,
'ये भागदौड भरी जिंदगी' म्हणत
थ्री जी वर संवाद साधणाऱ्या मित्रांची
नेमकी कुठली आयडेन्टेटी देऊ?

ओळखीशिवाय न बोलणारे हे शहर
नि या शहराची नपुंसक फायबर संवेदना
आपल्याशी कसं जुळवून घेईल?


आता या शहरी संवेदनेशी रूळवून घेताना
माझ्या चष्म्याचा नंबर बदलतो
पण हे शहर नजरेच्या टप्प्यात येत नाही.


◆◆◆

। अशोक रा. इंगळे
कपिल वस्तुनगर
नोएल कॉन्व्हेंट जवळ,
आझाद कॉलनी,
अकोला ४४४ ००४
भ्रमणभाष : ९४२१७४७४१७

माती

माती कोंबाचं गर्भाशय
पाण्याचा शांत तळ
ग्रीष्मात भेगाळते
पावसाच्या धारा झेलते
बीजाचं दान स्वीकारते
अंकुराला प्रसवते...माती
माती चिखल होते
माती गुलाल होते
माती जपून ठेवते
पाऊलखुणा
वारा येईपर्यंत
माती कधीच नाही उडत
उडते फक्त बंडखोर धूळ
माती पराक्रमाचा गौरव टिळा होते
पळपुट्यांच्या पाठीशी लागते
माती होते भाद्रपदात गणपती





आश्विनात शारदा, दुर्गा
उंदीर अन् राक्षसही
विसर्जनात ती सोडून देते
अंगी आलेलं देवपण
अन् तळाशी जाऊन बसते
धीर गंभीर डोहाच्या
दिवाळीच्या दिव्यासाठी
स्वतःला भाजून घेते माती
माती काठ होऊन
नदीला सावरते
अन् माठ होऊन तृष्णेला
कधी तळाशी
कधी कळसाशी
नाते सांगते माती
माती पोट फोडून
जीवन देते माणसाला
जीव गेला की
पोटात घेते माणसाला
मातीच जपते
दगडाचं कठोरपण,
पाण्याची ममता
नदीचे, वादळाचे, भूकंपाचे पिसाळलेपण
मातीच घेते पदरात
सगळ्यांना... सगळ्यांची माय होऊन !

◆◆◆

। शोभा रोकडे
'सांजभूल',
सोनल कॉलनी, शेगाव रोड,
अमरावती - ४४४ ६०४
भ्रमणभाष : ९९६०९३७७६९

अनुक्रमणिका

।। पुस्तक परीक्षण ।।

बॉम्बेस्कूलच्या कलापरंपरेचे आंशिक दर्शन

डॉ. प्रभा गणोरकर

■

'बॉम्बे स्कूल'म्हणजे मुंबईतील 'सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्स' या संस्थेतून निर्माण झालेली कलापरंपरा. जे. जे. स्कूल ही संस्था सर जमशेटजी जिजीभाई या पारशी कलाप्रेमी व्यक्तीने 'कंपनी सरकार'ला दिलेल्या एक लाख रूपयांच्या देगणीतून उभी झालेली संस्था. २ मार्च, १८५७ रोजी तिची स्थापना झाली. तिच्या स्थापनेपासून पुढची अनेक वर्षं या संस्थेने महाराष्ट्रातल्या कलाक्षेत्रावर अधिराज्य केलं आणि स्वतःची अशी एक कलापरंपरा निर्माण केली. या काळातले जे. जे. तले अधीक्षक, शिक्षक, कलावंत, विद्यार्थी यासंबंधीची अनेक संस्मरणे प्रकाशित आहेत. 'बॉम्बे स्कूल आठवणीतले, अनुभवलेले' हे सुहास बहुळकर यांच्या लेखांचं पुस्तक ही त्यातलीच एक साखळी म्हणता येईल. बहुळकर हे १९७० ते १९७५ या काळातले जे. जे. चे विद्यार्थी. पुढे १९७५ ते१९९५ या काळात त्यांनी जे. जे. त अध्यापनही केलं. या अनुभवांतून व जे.जे.शी संलग्न अशा आठवणींतून या संग्रहातील १२ लेख निर्माण झाले आहेत. सुमारे २८० पानांच्या या पुस्तकात चित्रकार सा. ल. हळदणकर, त्यांचे पुत्र ग. सा. हळदणकर, ज. द. गोंधळेकर, प्रा. सुखडवाला, प्रा. शंकर पळशीकर, ग. ना. जाधव, नागेश सबण्णवार, बाबूराव सडवेलकर, भय्यासाहेब ओंकार, संभाजी कदम, प्रफुल्ला डहाणूकर, मुकुंद केळकर याच्यावर लिहिलेले लेख आहेत. या संग्रहाचं संपादन कलासमीक्षक दीपक घारे यांनी केलं आहे.

या पुस्तकातल्या 'चित्रकलेतील हळदणकर पर्व' आणि 'कलेतले भारतीयत्व आणि बॉम्बे रिव्हायव्हलिस्ट चळवळ' या दोन लेखांतून प्रारंभीचा इतिहास, जे.जे.तील ब्रिटिशकालीन कलाप्रवाह, त्याची वैशिष्ट्यं, त्यात निर्माण झालेली नवी वळणं यावर प्रकाश पडतो. १९०३ साली जे. जे.त प्रविष्ट झालेले सावळाराम हळदणकर, त्यानंतरच्या पुनरुज्जीवनवादी चळवळीचे अध्वर्यू गु. ह. नगरकर व जगन्नाथ मुरलीधर अहिवासी, बेंगाल स्कूलची वैशिष्ट्ये, १८९१ मध्ये जे. जे.त नियुक्त झालेले प्रिन्सिपल ग्लेंडस्टन सोलोमन व त्यांनी १९१९ मध्ये सुरू केलेला 'न्यूड क्लास' 'म्युरल डेकोरेशन्स' १९२३ सालच्या वेम्बले येथील प्रदर्शनासाठी तयार करण्यात आलेली 'इंडियन रूम' अशा अनेक गोष्टींचा उल्लेख त्यांनी या आरंभीच्या लेखांत केलेला आहे.

'हळदणकर पर्व' बहुळकरांनी स्वतः अनुभवलेले नव्हतेच, परंतु ज. द. गोंधळेकर त्यांच्या 'आठवणी'तले. त्यांचे खास दर्शन बहुळकरांना त्यांच्या घरी शाळकरी वयातच झालं नि तो ठसा त्यांच्या मनावर कायमचा उमटला. गोंधळेकर सॉलोमनसाहेबांच्या कारकिर्दीतले विद्यार्थी. पुढे १९५३ मध्ये ते जे. जे.चे 'डीन' झाले. त्यांच्या व्यक्तिमत्वाची आणि कलेची वैशिष्ट्ये स्पष्ट करताना बहुळकरांनी जे. जे.चे एके काळचे डीन. प्र. अ. धोंड यांच्या 'रापण' या पुस्तकाचा आधार

घेतलेला आहे. गोंधळेकरांचं ज्ञान, व्यासंग, बहुश्रुतता यांच्याकडे लक्ष वेधत असताना, कलावंत आणि त्याच्यात असणारा माणूस यासंबंधीचं गूढ वाचकाला अंतर्मुख करणारं ठरावं, असं चित्रण बहुळकरांनी केलेलं आहे. सा. ल. हळदीकरांचे पुत्र गजानन यांचं मोजक्या शब्दांतील व्यक्तिचित्रही असंच वेधक वाटतं. तेही 'जलरंगातील किमयागार' असणाऱ्या सा. ल. हळदणकरांप्रमाणे जलरंग व तैलरंग या दोन्ही माध्यमांवर प्रभुत्व असणारे. एका प्रात्यक्षिकाच्या वेळी जलरंगात जवळजवळ पूर्ण करत आणलेले चित्र त्यांनी पाण्याने पूर्ण भिजवले व त्यातून रंगांची अद्भुत परिमाणे आपल्या चित्राला कशी दिली, याचं वर्णन बहुळकरांनी अगदी हुबेहूब जाणवेल, अशा पद्धतीने केलं आहे. या पुस्तकाला त्यांनी अनेक कलावंतांची छायाचित्रं, त्यांच्या गाजलेल्या कृतींची छायाचित्रं रेखाटने यांची जोडही दिलेली आहे. त्यामुळे पुस्तकात वर्णिलेल्या अनेक कृतींची कल्पना वाचकाला येते. 'महाराष्ट्रातील कलापरंपरेचा इतिहास' असं या पुस्तकाचं स्वरूप नाही. परंतु त्या कलापरंपरेची समृद्धी कळून येण्यासाठी हे पुस्तक साहाय्य करतं. सुहास बहुळकर हे स्वतः 'व्यक्तिचित्र' कलेतील मर्मज्ञ. व्यक्तीचं चित्रात अवतरणारे साम्य, छायाप्रकाशाचं तंत्र, रंगलेपनातील फटकाऱ्यांमधून त्वचा, कांती, वस्त्रप्रावरणं यांना येणारे पोत, हायलाइट इ. विशेष त्यांच्या या शब्द माध्यमांतील व्यक्तिचित्रांमध्येही उमटलेले आहेत. व्यक्तींच्या हालचाली, बोलण्याची तऱ्हा, वागण्यातले मार्दव वा कठोरता, या सर्वांच्या वर्णनांतून ते ही व्यक्तिचित्रे जिवंत करतात. पळशीकर, सडवेलकर, कदम, प्रफुल्ला या सर्वांच्या व्यक्तिमत्वातले गुण त्यांनी टिपलेले आहेतच, पण त्यांच्या मर्यादाही ते दाखवून देतात. शंकर पळशीकर यांच्यावरील बहुळकरांचा लेख त्यांच्या लेखनातल्या सर्व वैशिष्ट्यांसह साक्षात झालेला आहे. पळशीकर जे. जे. चे विद्यार्थी. कलेचं शिक्षण घेण्याच्या काळात पळशीकरांच्या भोवती, वास्तववादी शैलीचा पुरस्कार करणारे, भारतीयत्वाचा पुरस्कार करणारे आणि आधुनिकतेचा आग्रह धरणारे अशा तीनही प्रवाहांचे संस्कार करणारे वातावरण होते. त्यातून पळशीकरांनी स्वतःच्या वृत्तीनुसार वेगळा आशय, वेगळा अवकाश शोधत स्वतःचं तंत्र विकसित केलं. पळशीकरांनी भारतीयत्व आणि आधुनिकता यांचा संगम कसा साधला, त्यांच्या कलेत दिसून येणारं भारतीय तत्त्वज्ञानाचं आकर्षण, पुढच्या काळातील तंत्रविषयक प्रयोग, व्यक्तिचित्रणकलेत त्यांनी सिद्ध केलेलं वेगळेपण अशा सर्व दिशांनी बहुळकरांनी या लेखात चर्चा केलेली आहे.

भय्यासाहेब ओंकार, ग. ना. जाधव, प्रफुल्ला डहाणूकर, मुकुंद केळकर यांच्या व्यक्तिमत्त्वांवर आणि त्यांच्या कलाक्षेत्रांसंबंधी प्रकाश टाकणाऱ्या लेखांमधून कलाक्षेत्रातल्या विविधतेसंबंधी आणि या सर्व कलावंतांच्या कलेकडे पाहणाऱ्या दृष्टिकोनांसंबंधी वाचकाला पुष्कळ माहिती तर मिळतेच, पण कलाक्षेत्रातले वेगवेगळ्या स्तरांवरचे वातावरणही अनुभवता येते. बहुळकर कलावंतांचं चरित्र, त्यांची घडण, त्यांच्यावरील संस्कार, त्यांची कलाक्षेत्रातली आरंभीची धडपड असे सर्वांगीण व्यक्तिचित्रण करतात; परंतु निवेदनाच्या ओघात इतर कलावंतांच्या केलेचे विशेष, चित्रकलेतील परंपरा, वळणे, बदल, विकास यासंबंधातले इतर तपशीलही ते भरतात. यामुळे त्यांच्या लेखनाला एक निराळे टेक्श्चर-पोत लाभतो. ते स्वतः चित्रकलेचे विद्यार्थी, प्राध्यापक, पोर्ट्रेट, रेखाटने, भित्तिचित्रे इ. कलाप्रकारांत नामवंत असल्यामुळे, त्यांच्या जाणकारीमुळे या लेखनाला एक प्रकारची भरीवता आणि वजन आले आहे. चित्रकारांच्या कलेची वैशिष्ट दाखवून देताना, तसंच बहुळकरांनी विद्यार्थीदशेत असताना चित्रकारांची प्रात्यक्षिकं अनुभवतानाचे क्षण रंगवताना बहुळकरांची वर्णनशैली बहरलेली दिसते. ग. ना. जाधव, भय्यासाहेब ओंकार, मुकुंद केळकर यांच्यावरील लेखांमध्ये एक विशेष आत्मीयता आणि जिव्हाळा ओथंबून आलेला आहे. कारण त्यांच्याशी बहुळकरांचं बालपण निगडित आहे. ग. ना. जाधव हे ४० वर्षे किर्लोस्कर समूहात पगारी नोकर म्हणून काम करत. किर्लोस्कर समूहातल्या मासिकांची मुखपृष्ठे, कथाचित्रे व इतर सजावट ते करत असत. त्यांनी साहित्यक्षेत्रातल्या अनेक दिग्गजांची पोर्ट्रेट्सही केलेली आहेत. परंतु मुख्यतः त्यांनी 'किर्लोस्कर' 'स्त्री' व 'मनोहर' या मासिकांसाठी, त्यांच्या पुरोगामी धोरणानुसार समाजजीवनात होणाऱ्या आधुनिक स्थित्यंतरांचे प्रतिबिंब दाखवणारी जी चित्रं व कथाचित्रं काढली, त्यामुळे त्यांची चित्रं घराघरांत पोहोचली. याच क्षेत्रात नावाजलेली आणखी एक आदरणीय व्यक्ती म्हणजे भय्यासाहेब ओंकार. 'स्वराज्य'वरील मुखपृष्ठे, 'केसरी' व 'सकाळ'मधील चित्रकथा काढणारे चित्रकार ओंकार हे एस. एन. डी. टी.त प्राध्यापक होते. ग. ना. जाधव हे बहुळकरांचे स्नेही श्रीकांत जाधव यांचे वडील, तर भय्यासाहेबांकडे बहुळकरांचे वडीलच त्यांना लहानपणी त्यांची चित्रे दाखवायला घेऊन गेले होते. बहुळकरांनी उपयोजित कलेकडे जाण्याऐवजी पेंटिंगकडे जावे, हा सल्ला भय्यासाहेबांनीच त्यांना दिला. उपयोजित कलेचे विविध आविष्कार 'केळकर चित्रशाळे'च्या दादा केळकरांकडून आणि त्यांचा मुलगा मुकुंद केळकर यांच्याकडून कसे होत, हे सांगणारा लेखही आवश्यकच वाटतो. उपयोजित कलेतल्या जातिवंत प्रतिभेचा आविष्कार

म्हणजे जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्सच्या धातुकला विभागाचे प्रमुख नागेश सबण्णवार यांचे कलापूर्ण धातुकाम. कारगिरीसाठी अतिशय कठीण आणि चिवट परिश्रमाची अविश्रांत मागणी करणाऱ्या माध्यमाला सबण्णवारांनी आपल्या प्रतिभेने आणि हुन्नराने एक अत्युत्तम कलात्मक दर्जा व प्रतिष्ठा मिळवून दिली. प्रफुल्ला डहाणूकर, पूर्वाश्रमीच्या-जोशी, या १९५५ साली जे. जे. तून सुवर्णपदक घेऊन उत्तीर्ण झाल्या. त्यांच्यावरील लेखाच्या निमित्ताने अंबिका धुरंधर, अँजेला त्रिंदाद, सुमती पंडित, रतन वडके या जे. जे. च्या इतर स्त्री चित्रकारांची आठवण करत, पुढच्या काळातल्या भारतातल्या बी. प्रभा, अंजली इला मेनन, अमृता शेरगील, महाराष्ट्रातल्या पद्मा सहस्रबुद्धे यांचाही उल्लेख बहुळकरांनी निवेदनाच्या ओघात केलेला आहे. प्रफुल्लाचा खळाळता उत्साह, चित्रकलेतील तिची उंची, म्युरल्सच्या क्षेत्रात, तसंच मुंबईतल्या चित्रकलाविषयक भरीव काम करणाऱ्या अनेक संस्थांशी तिचा असणारा संबंध, या सर्व गोष्टींचे मनःपूर्वक चित्रण करताना तिच्याशी होणाऱ्या मतभेदांचीही नोंद त्यांनी केली आहे.

या सर्व व्यक्तिचित्रणांमध्ये सर्वांत प्रदीर्घ असं व्यक्तिचित्र आहे, ते बाबूराव सडवेलकर यांचं. सडवेलकर हे जे. जे. चेच विद्यार्थी. अहिवासी, भोसले, शंकर पळशीकर यांचे विद्यार्थी, परंतु त्यांचा आधुनिक युरोपीय कलेकडे ओढा होता. १९५३ साली ते जे. जे. मध्ये प्राध्यापक म्हणून रुजू झाले. भित्तिचित्रकलेवर त्यांचं प्रभुत्व होतं आणि एकूण चित्रकलेचं शास्त्रशुद्ध, तंत्रशुद्ध शिक्षण विद्यार्थ्यांना मिळावं, यासाठी ते प्रयत्नशील असत. त्यांच्या प्रात्याक्षिकाचे तपशीलवार वर्णन बहुळकरांनी केलं आहे. फुलब्राइट स्कॉलरशिप मिळवून त्यांनी काही काळ अमेरिकेत घालवला, याचा अभिमान त्यांना होता आणि तो त्यांच्या वागण्या-बोलण्यात दिसून येई. १९७० सालच्या सुमाराला जे.जे.मध्ये दोन गट पडले आणि सडवेलकरांच्या विरोधात वातावरण तापलं. या राजकारणाचा परिणाम म्हणून त्यांची नागपूरला बदली करण्यात आली. त्यामुळे वैतागलेल्या सडवेलकरांनी राजीनामा दिला. पुढे १९७६ सालामध्ये त्यांची कलासंचालक म्हणून नेमणूक झाली आणि विरोधाला न जुमानता सडवेलकर संचालक या नात्याने तडफेने कामाला लागले. सडवेलकर जे.जे.तून गेल्यामुळे विद्यार्थी या नात्याने बहुळकरांचा त्यांच्याशी फार संबंध आला नाही, परंतु पुढे ते जे.जे.मध्ये प्राध्यापक आणि सडवेलकर संचालक असताना, सडवेलकरांनी त्यांना विश्वासात घेतलं. संचालक म्हणून नेमणूक झाल्यानंतरही सडवेलकरांविषयी जे.जे.तच नव्हे, तर इतरत्रही प्रतिकूल वातावरण बराच काळ राहिलं. या सर्व काळातील विरोधाची कारणं कोणती होती, हे बहुळकरांच्या लेखनात आलेलं नाही. जे.जे.तील वातावरण इतकं का बिघडलं होतं, वृत्तपत्रांचाही प्रचार प्रतिकूलच का होता, प्राध्यापक संप करत होते, गजानन भागवत, दत्तात्रय पाडेकर, रंजन जोशी यांसारखे प्राध्यापक जे.जे.सोडून निघून गेले... हे वातावरण बहुळकरांनी टिपलं आहे; परंतु त्यामागची कारणं व विरोधाचे मुद्दे याबाबत त्यांनी हेतुपुरस्सर संदिग्धता बाळगली आहे, असं वाटतं. किंबहुना, सडवेलकरांनी आखलेल्या काही योजना विरोधकांमुळे प्रत्यक्षात येऊ शकल्या नाहीत, असं त्यांनी दाखवलं आहे. सडवेलकर संचालक असतानाच्या काळात दिल्लीला पाठवण्यात आलेल्या चित्ररथाचं यश, पुण्यातल्या राजा केळकर संग्रहालयातल्या भित्तिचित्रांच्या पुनर्निर्माणाचं काम याबद्दल, तसंच सडवेलकरांची कल्पकता, धडाडी, त्यांच्या काळात त्यांच्या प्रोत्साहनाने मिळालेली राष्ट्रीय आणि शासकीय पातळीवरील कामं याबद्दल लिहिताना बहुळकरांच्या मनात कृतज्ञता दाटून आलेली आहे. सडवेलकरांनी महाराष्ट्राच्या कला इतिहासाचं जतन आणि संवर्धन केलं, त्यांनी मांडलं आहे. सडवेलकर यांच्या संचालक म्हणून झालेल्या १३ वर्षांच्या कारकीर्दीचा सविस्तर आढावा या लेखात आढळतो.

बहुळकरांनी बाबूराव सडवेलकरांसंबंधी निष्ठेने लिहिलेला हा लेख वाचल्यानंतर त्यांनी संभाजी कदम या त्यांच्या प्रत्यक्ष गुरूविषयी लिहिलेला लेख वाचला की, काहीसं चकित व्हायला होतं. मधून-मधून काही आदरार्थी वाक्यं लिहिण्याची कसरत बहुळकरांनी केली असली, तरी या लेखातला त्यांचा सूर थट्टेचा आहे किंवा असंही म्हणता येईल की, 'शिक्षक'कदमांवर लिहिताना बहुळकरांमधला जे.जे.मधल्या पहिल्या-दुसऱ्या वर्षाचा विद्यार्थीच डोकं वर काढत होता. कदमांचं बोलणं, त्यांची व्याख्यानं, पेटीवादक एवढंच नाही, तर त्यांच्याकडे वर्षाच्या शेवटी विद्यार्थ्यांसाठी जेवणाचा कार्यक्रम असे, त्याविषयीही बोलताना या विद्यार्थ्यांचा थट्टेखोर, काहीसा टवाळकीचा सूर आहे.

संभाजी कदम हे व्यक्तिचित्रकलेवर प्रभुत्व मिळवलेले चित्रकार तर होतेच; परंतु सौंदर्यशास्त्र, मानसशास्त्र, साहित्य, संगीत, तत्त्वज्ञान यांचे अभ्यासक आणि जाणकारही होते. याशिवाय, जवळजवळ २०-२५ वर्षांत महाराष्ट्रातील कलाजगतातील घडामोडींची जाणकारीने दखल घेत, सातत्याने त्याविषयी लेखन करणारे कलासमीक्षक होते. मराठीतील कला समीक्षेची परिभाषा घडवणारं त्यांचं लेखन सातत्याने 'सत्यकथा'-'मौज'मधून प्रकाशित होत असे. हेन्री मूर, पॉल क्ली यांच्याविषयीचे त्यांचे लेख आजही त्यांची

कलेविषयीची मर्मदृष्टी प्रकट करणारे वाटतात. जे.जे.तील अहिवासी, चिमुलकर, आबालाल रहिमान, रतन वडके यांच्याविषयी त्यांनी उत्कटपणे आणि भरभरून लिहिलं आहे. कदमांमधील वृत्तिगांभीर्य, विद्यार्थ्यांविषयीची त्यांची कळकळ, त्यांनी सांभाळलेली जीवनमूल्यं, त्यांच्या स्वभावातील झोकून देण्याची वृत्ती-इन्टेन्सिटी हे सारं समजू न शकलेल्यांपैकी स्वतः बहुळकर हेही एक असावेत. कदमांमध्ये अस्सल कला अणि कलावंत यांच्यासंबंधी कमालीचा आदर असे, तसा तो असल्यामुळेच पु. अ. धोंड यांच्या 'रापण' या पुस्तकाच्या लेखनात ते मनःपूर्वक सहभागी झाले. त्यांच्या विश्वकोशातील नोंदी आणि त्यांचे सौंदर्यशास्त्रावरील लेख, त्यांची अभ्यासविषयाचं अवगाहन करणारी वृत्ती प्रकट करतात. हा लेख वाचताना वाटत राहिलं की, बहुळकरांनी कदमांना चुकीच्या ठिकाणी बसवलं. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर पुरेसा प्रकाश पडू शकला नाही आणि त्यांचं व्यक्तिचित्र रंगवताना बहुळकरांच्या पॅलेटवर पुरेसं रंगही नव्हते.

या पुस्तकाचे संपादक दीपक घारे यांनी प्रस्तावनेत, ''कलाशिक्षण आणि कलाप्रसाराच्या बाबतीत बॉम्बे स्कूलने नेमकं काय केलं? यथार्थवादी चित्रणाचा पुरस्कार करणारं बॉम्बे स्कूल आधुनिकतेच्या कायम विरोधातच राहिलं का? दृश्यकलेची जी उपांगं आहेत, त्याबद्दल बॉम्बे स्कूलचा दृष्टिकोन काय होता?'' असे तीन प्रश्न उपस्थित करून त्यासंबंधी काही निष्कर्ष काढले आहेत. बहुळकरांचं हे पुस्तक 'आठवणी, अनुभव' या प्रकारातलं असल्यामुळे दीपक घारे यांनी विचारलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने यायला हवं होतं ते विवेचन या पुस्तकात फारसं आढळत नाही. दीपक घारे यांनीही या पुस्तकाच्या स्मरण-रंजनात्मक वृत्तींचा ओझरता उल्लेख केला आहे. आजच्या, कलाक्षेत्रातील विद्यार्थ्यांना जे.जे.चं आकर्षण आहे, त्या जे.जे.तले एकेकाळचे कलावंत, शिक्षक, त्यांची शिकवण्याची पद्धती आणि तिची वैशिष्ट्यं तिथलं कलासक्त वातावरण, जुन्या काळातलं कलेचं ऐश्वर्य या साऱ्यांविषयी भरभरून माहिती देणारं हे पुस्तक 'बॉम्बे स्कूल'च्या कलापरंपरेचं आंशिक दर्शन घडवणारं आहे. या कलापरंपरेची माहिती, 'कलामंदिरातील एकेचाळीस वर्षे' (रावबहादूर म. वि. धुरंधर), 'रापण' (प्र. अ. धोंड १८७९), तसंच भाई माधवराव बागल यांचं वरदा बुक्सने प्रकाशित केलेलं महाराष्ट्रातील कलावंतांचा परिचय देणारं पुस्तक. जे.जे.ची कलापरंपरा व बेंगाल स्कूल ऑफ आर्टची परंपरा यांचा तौलनिक विचार करणारी दिनकर कौशिक यांची 'विश्रब्ध शारदा' (खंड-३) मधली प्रस्तावना आणि सडवेलकरांनी लिहिलेल्या नोंदी या प्रकारच्या पुष्कळ लेखनातून पूर्वी आलेली आहे. या सर्व लेखनाच्या आणि संशोधनाच्या आधारे या कलापरंपरेचा सलग व सांगोपांग इतिहास लिहिणारा अभ्यासक उद्याच्या काळात महाराष्ट्राला लाभेल की, नाही? हा प्रश्नच आहे आणि तसा तो पडावा, असं आजच्या महाराष्ट्रातील कलाशिक्षणाच्या क्षेत्रातलं अवकळेचं आणि निरुत्साहाचं मळकं वातावरण आहे. त्यामुळे कलावंतांच्या जीवनावर, कलेतील एकेकाळच्या प्रोत्साहन देणाऱ्या वातावरणावर समरसून प्रकाश टाकणाऱ्या या पुस्तकाचं स्वागत व्हायला हवं.

(मी-मराठी लाईव्ह वरून साभार)

'बॉम्बे स्कूल आठवणीतले अनुभवलेले' - सुहास बहुळकर
ग्रंथाली, मुंबई, पाने ३१२, मूल्य ६०० रुपये

। डॉ. प्रभा गणोरकर
'कॅक्टस'
परिगणित कॉलनी,
दक्षिण मालटेकडी,
अमरावती
दूरध्वनी ०७२१-२६६२७०३
भ्रमणभाष ९५४५४६१७३७

।। पुस्तक परीक्षण ।।

माणसाच्या ढोंगी जगण्याचा भावगर्भ उपहास 'भावलीचं लगीन'

लोकनाथ यशवंत

■

कुठल्याही बोल भाषेत उपहास खूप चांगल्या पद्धतीने व्यक्त होत असतो. कारण त्यात सहजता असते आणि जगण्याचा पीळही असतो. त्यातही वऱ्हाडी बोलीत तर उपहास खूपच कडक आणि धारदार व्यक्त होतो. वऱ्हाडातील माणसांची व्यक्त होण्याची तऱ्हाच अशी तऱ्हेवाईक आहे. म्हणजे वऱ्हाडी माणूस त्याच्या मुलाला अभ्यास कर, असे सरळ न सांगता, ''बाबू, किती अभ्यास करसीन बाप्पा! थकला अससीन अभ्यास करू करू तं आता टिव्ही पाह्यना उलीसाक पाच-सहा तास... असे म्हणेल. अर्थात हे भाषिक बारकावेदेखील श्याम पेठकरांशी बोलताना सहज कळत गेलेले आहेत. त्यांचे भावलीचे लगीन वाचताना याचा वारंवार प्रत्यय येत गेला. वऱ्हाडी भाषेतली कादंबरी आहे. कुठल्यातरी लग्नाबद्दल सांगणार आहे कादंबरीकार याचा अर्थ ती खूप सहजतेने घ्यावी अशी हलकीफुलकी आहे असे समजून कुणी ही कादंबरी वाचायला घेत असेल तर पाण्यात उतरल्यावर अचानक आपल्या पायाला कुणी दगड बांधले आहेत, असे कळत खोल तळाशी गटांगळत जावे, अशीच गत ही कादंबरी वाचताना होण्याची शक्यता आहे. कादंबरीत धारधार उपहास आहे, व्यंग आहे पण हसता हसता 'दिल ही मे खिंचती है' अशी स्थिती होते. खूप साधेपणाने या कादंबरीच्या आषयाशी भिडण्याचा प्रयत्न कुणी करू नये.

तसं वर वर पाहता कथानक अगदीच साधं आहे. ते सुरूही अगदी साधेपणानंच होतं. एखाद्या सालस बोधकथेनं संपता संपता अंतर्मुख करून टाकावं तसंच काहिसं होतं. 'भगवानपूर मालूम हाय का तुमाले?' असं निवेदक सुरूवातीला विचारतो आणि मग भगवानपूरचा पत्ता सांगण्याच्या निमित्ताने तो त्या भूप्रदेशाचा, तिथल्या माणसांच्या जगण्या-वागण्याच्या तऱ्हांपासून आयुष्याला लागलेल्या ताण्याबाण्यांसकट सगळेच अगदी रीतसर अन् तपशीलवार सांगून जातो. भगवानपूर हे पुनर्वसनात अन् शासन-प्रशासनाच्या निब्बर दिरंगाईत कसं कुरूप झालेलं गाव आहे, हे अगदी सहजपणे व्यक्त होऊन जातं. पेठकरांच्या प्रतिपादनाची शैली 'सशाला बीळ दाखवा' या लहान मुलांच्या कोड्यासारखी आहे. सहज वाटते मात्र मग पुढे निघून गेल्यावर पुन्हा मागे येऊन तिथल्या संदर्भाचा धागा पकडीत पुढे जावे लागते. त्यांच्या 'ऋतुस्पर्श' या निखालस देखण्या ललितबंधाचे पुस्तक वाचतानाही ही अनुभव येतोच. मात्र त्यातली भाषा, शैली आणि या कादंबरीचे त्यांचे सांगत जाणे यात फरक आहे. या कादंबरीची तुलना 'निशाणी डावा अंगठा'शी करण्याचा मोह समीक्षकांना होऊ शकतो मात्र दोन्ही सटायरच असलीत तरीही विषयामुळे असावे किंवा आणखी काही कारण असावे पण श्याम पेठकरांची ही कादंबरी वेगळी आहे. विशेष म्हणजे पेठकर हे निखालस 'लेखक' आहेत. आजचा वैशिष्टीकरणाचा काळ आहे. म्हणजे लिहिणारा कवी, गीतकार, कादंबरीकार, कथाकार,

नाटककार... असे वेगवेगळे काहीही असतो मात्र पेठकर यांनी नाटके लिहिलीत, चित्रपटांचे लेखन केले, ललितबंध लिहिलेत, गावझुला सारखी एक वेगळ्याच धाटणीची अन् चिंतनशील अशी काळाच्या पुढची लेखनकृती त्यांच्या लेखणीतून प्रसवली, थोडेफार काव्य लेखनही त्यांनी केलेय्... आता कादंबरीही आली. पुढेही काही कादंबऱ्यांचे विषय त्यांच्या डोक्यात आहेत. ते एकाच लेखन प्रकारात अडकून पडलेले नाहीत. तरीही त्यांच्या कुठल्याही लेखन प्रकारात विसविशितपणा नसतो. या कादंबरीतही नाही. विवाह संस्थेवरचे ते सटायर आहे आणि बाहुलीच्या लग्नावरून ते माणसांच्या अंतरगात उतरतात. बाहुला- बाहुलीच्या लग्नापासून सुरू झालेला उपहास विविध पात्रांच्या रूपात व्यक्त होत जातो. गावखेड्यात कास्तकारीच करत राहिल्याने लग्नच न होऊ शकलेला कौतिक आहे. त्याच्याही अंगाने विवाहसंस्थेवर भाष्य होत राहतं. शिवरामभाऊ हे प्रमुख पात्र. त्यांच्याच सदानंद नावाच्या बाहुल्याशी शांताक्काच्या 'छकुली' नावाच्या बाहुलीचे लग्न लावायला गाव उभा होतो. शिवरामभाऊंच्या लग्नाचीही एक वेगळी बात आहे. ते ज्या सईशी लग्न करतात ती त्यांच्या घरी काम करायला येणारी. एक साधीभोळी कास्तकाराची लेक. शिवरामभाऊंच्या आईवर म्हणजे अम्माईवर तिची गाढ श्रद्धाच. त्यांच्या परिसरात हुंड्याचे नुतनीकरण, हा प्रकार. म्हणजे लग्न करायचे. तेव्हा हुंडा घ्यायचा आणि एखादे मुल झाले की मग पुन्हा मुलीला टाकून द्यायचे. सोडचिठ्ठी हवी असेल तरीही पैसा द्या, नांदवायचे असेल तरीही पैसा द्या... हा प्रकार सईच्या बाबतही होतो. त्यात तिचा नवरा डोक्याने थोडा मंदच. अम्माई तिला सावरते. कॉलेजला शिकणारा शिवराम गावात येत-जात असतो. त्याला सई आवडते आणि मग तो तिच्याशी लग्न करतो. बापाला ते आवडत नाही म्हणून तो त्याला इस्टेटीतून बेदखल करतो. अम्माई त्याला सईला घेऊन भगवानपूरकडे जायला सांगते... शिवरामच्या निमित्तानेही विवाहसंस्था आपण कुठे नेऊन ठेवली आहे, हे दिसते. दुलिराम आणि तुळसाक्का हे जोडपे आहे. वांझ आहे ते. त्यांचे वैवाहिक आयुष्य आणि कामजीवन लेखक उजागर करत नेतो. अगदी आमदार हाडोळेही मुंबईतच असणारा अन् सतरा लफडी करणारा पण एका नाजूक क्षणी त्याला जाणवते की आपण जिला 'दाल बराबर' समजत होतो ती आपली बायको किती 'मस्त' आहे ते... अमिनाबी आणि तिचा लष्करातून परतलेला निकम्मा नवरा पण त्याच्याही साठी अमिनाबीच्या मनात असलेला अतिव आदरही विवाह या विषयाचा एक वेगळ्या कोनातून विचार करायला लावणाराच... एका गावात सुरू झालेला हा बाहुला-बाहुलीचा खेळ आपल्याही नकळत आपल्याला विवाह या विषयावर व्यापक विचार करायला बाध्य करतो. अगदी शांताक्का ही प्रौढ कुमारिका आहे. जमीनदार असलेल्या बापाचचे अचानक निधन झाल्यावर घरात सर्वात थोरली असलेली शांताक्का पुण्यातले शिक्षण सोडून परत येते अन् सगळ्यांचे सगळे करताना तिचेच लग्न राहून जाते... शांताक्का तिच्या बाहुलीच्या निमित्ताने लग्न या विषयाकडे बघते. अगदी गावातला ढोरकी असलेला भूमादेखील लग्नासाठी आसुसलेला. एकटाच असलेल्या भूमाच्या लग्नाचे कोण बघणार? पण मंडपाच्या कामात शिलाई मशीनवरचे मंडपाचे कापड धरण्याचे काम करणारी एक शेलाट्या अंगाची भूमासारखीच एकटी असलेली तरुणी त्यालाही भेटतेच... रंगरावच्या दोन बायका पळून गेलेल्या अन् तो मात्र स्वतःला संसार आणि विवाह यातला तज्ज्ञ समजतो, शांताक्कावर एकतर्फी प्रेम करतो. तिच्याशी लग्न करण्याचे स्वप्न पाहतो. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे बाहुलीला सांभाळण्याची जबाबदारी असलेली कुहू आणि भावल्याची जबाबदारी असलेला राघव यांचे प्रेम आहे. मात्र, एका जातीचे नसल्याने त्यांच्या लग्नाला विरोध आहे. पाहण्यापासून सगळ्याच विधीत ते भावला- भावलीला धरून असतात मात्र त्यांच्या लग्नाचा विचार कुणाच्या मनातच येत नाही! सरपंच प्रभाकरच्या येतो कारण तो खरा नेता आहे. त्याचेही लग्न झालेले नाही पण त्याने भगवानपूर या गावाशीच लग्न लावले आहे... सर्वच पात्रांचा संबंध लग्न या विषयाशी आहे आणि त्यांच्या माध्यमातून, त्यांची गोष्ट सांगता सांगता सहजच विवाह संस्थेवर अस्फूट असे भाष्य लेखक करून जातो. एका अडचणीने अवघडलेल्या गावात असलेली त्या गावकन्यांमध्ये असलेली एकी खूप विलोभनिय वाटते आणि मग खरेच असे असू शकते का इतके कुटुंबातही दिसत नाही असे सख्य गावात, असा सवाल पडतो मात्र जगापासून तुटलेल्या या गावातली माणसे एकमेकांना धरून राहतात. जगण्याची ऊर्जा निर्माण करतात सहवासातून, हे नंतर पटत जाते. गावात लग्नच जुळत नाहीत अन् सोयरीकीही येत नाहीत. गेल्या काही वर्षांपासून गावात मुला- मुलीचा बघण्याचाही कार्यक्रम झालेला नाही. त्यातून गावातल्या शाळेच्या मास्तरच्या लेकीला बघायला पाव्हणे येतात आणि गावात मोबाईलची रेंज नाही, या कारणाने तो मुलगा मास्तरांची सई पसंत असूनही नकार देऊन जातो. गावाला हे जिव्हारी लागते मात्र हा गावाला लागलेला नाट आहे अन् तो काढायचा असेल तर गावात हिरवा मंडप पडायला हवा अन् त्यासाठी मग

कुणाचेती लग्न व्हायला हवे. कुणाचे? तर मग भावला-भावलीचे! लग्न हा त्या दोन जीवांच्या रेशीम बंधनाचा सोहळा असतो मात्र त्याचा समारंभ, उत्सव करण्याच्या नादात रीती-रीवाज अन् त्यातून आलेल्या 'इगो' मध्ये एका चांगल्या नात्याचा आपण विचका करत असतो. ते जीवंत नवरा-नवरीही आपल्यासाठी भावला-भावलीच होऊन जातात. त्यांच्या नाजूक भावविश्वाचा आपण विचारच करत नाही. अगदी आपल्या पाहण्याचा कार्यक्रमही 'पपेट शो' असतो. भावला- भावलीचा पाहण्याचा कार्यक्रम पार पडताना वाचत असताना हेच सारे जाणवत राहते. नंतर मात्र घटना वऱ्हाडी सहजतेने घडत आहेत असे वाटत असताना आत आत ओढत नेतात. पृष्ठभागी वाटणाऱ्या अर्थापेक्षा खूप गहिरा असा अर्थ साध्या अन् गमतीदार वाटणाऱ्या या घटनाप्रसंगात आहे, असे जाणवत राहते. पाहण्याचा कार्यक्रम झाल्यावर होकार द्यायचा तर भावलीची कुंडली मागितली जाते. भावली पांढऱ्या पायाची असेल तर? अशी शंका घेतली जाते. मग साक्षगंध, मानपान ते प्रत्यक्ष लग्नापर्यंतचा प्रवास आपल्या विवाहपद्धती आणि विवाहसंस्था यावरचे सटायरच आहे. उपरोधाच्या भाषेत ग्रामीण जीवनही या कादंबरीत प्रवाही झालेले आहे. तिथले राजकारणही आहे. माध्यमांचा प्रभावही आहे. लग्न हा दोन जीवांना जोडणारा एक साधा विधी आहे. तो एक स्नेहाचा, प्रगाढ प्रेमाचा आणि बंधनाचा करार आहे. मात्र त्याचे इतके अवडंबर आपण करून टाकले आहे की आठाण्यात होणारे लग्न कोटींच्या घरात जाते. त्याचा विस्तार कितीही होऊ शकतो. लग्न कसे नि कुठे केले यावरून प्रतिष्ठा नक्की होत असते. साध्या भावलीच्या लग्नाचा विस्तार राज्याच्या पातळीवर होतो. वर्तमानपत्रात येणाऱ्या बातम्या कशा बात का बतंगड बनवून टाकतात, यावर उपहासात्मक भाष्य या कादंबरीत आहे. या लग्नाची बातमी वर्तमानपत्रात येते. त्यातले टिआरपी मूल्य ओळखून एक वृत्त वाहिनीवाला ती बातमी त्याच्या चॅनलवर चालवितो आणि मग हे लग्न एकदम राज्य स्तरावरचे होते. त्यात गाव आणि परिसरातले राजकारण शिरते. भावला- भावलीची जात आणि धर्महीं मग तपासला जातो...! टिआरपीच्या नादात सर्वच वाहिन्यांवर 'गांव मे हो रही है, गुडा-गुड्डी की शादी' ही बातमी चालते. मुख्यमंत्र्यांपासून अनेक बडे नेते आणि कलावंत या लग्नाला येतात...

वऱ्हाडी भाषेतून अत्यंत मिश्कीलपणे कोपरखळ्या मारत कथानक चित्रदर्शीपणे डोळ्यासमोर साकार करण्यात पेठकर यशस्वी ठरले आहेत. लग्नावर भाष्य करणारी ही कादंबरी राजकारण आणि समाजकारणातले व्यंगही नेमकेपणाने पकडते. वास्तवही हेच आहे की लग्नापासूनच समाज घडत जातो आणि विवाह हा समाज मान्यतेचाच विधी आहे. लग्न मंडपात ज्या पद्ध तीचे राजकारण रंगत असते तितके अगदी देशाच्या राजधानीतही रंगत नसावे. अगदी मानपान आणि खुर्ची, सत्ता, पैसा, बळ सारेच एका विवाहाचे अविभाज्य अंग झाली आहेत. पेठकरांची कादंबरी वाचत असताना हे सारे अगदी प्रबळपणे मनावर ठसत जाते. पेठकरांची भाषा खूप वेगळ्या धाटणीची आहे. समकालीन राजकारण आणि समाजकारणातून उभी झालेली माणसांची मानसिकता ते नेमकेपणे पकडतात. माणसं वाचण्याची अन् त्यांच्यावर कुठलाही अन्याय न करता, पूर्वग्रह न ठेवता त्यांना अत्यंत स्नेहाने जवळ करण्याचे निसर्गदत्त कसब लेखकाकडे आहे. त्यामुळे ते कादंबरीत्या पात्रांना त्यांच्या सर्व गुण-दोषांसकट कवेत घेतात. त्याच्या स्वभाव घडण्यामागची कारणमिमांसा अमदी चपखलपणे सांगतात 'मेरा मरद रावन है' असे सांगता सांगता कधी ती त्याला राम करून टाकेल याचा अंदाजही ने येणारी हमीदाबी, तिची सून चाँदबी, बाप मेल्यावर शेतीचा अन् इस्टेटीचा सारा पसारा सांभाळण्यासाठी शिक्षण सोडून आलेली अन् सगळ्यांचे सगळे करता करता अविवाहित राहिलेली शांताक्का, परक्या गावातून येऊन याच गावचा झालेला शिवशंकरभाऊ, रंगराव, भूमा, कौतिक, वांझ असलेली तुळसाक्का, तिचा नवरा दुलिराम, वामन, रेखी, राघव आणि सुशी, या लग्नाचा विरोधक आमदार हाडोळे आणि सूत्रधार असलेलला सरपंच प्रभाकर, मंत्री देशमुख... ही सगळी पात्रे आपल्याला भेटली आहेत. भेटत राहिलेली आहेत, असे वाटून जाते. काही काळानंतर तर या पात्रांशी सलगी होऊन जाते. राजकारण आणि पत्रकारिता यातले बारकावेही खूप चांगले टिपले आहेत. या कादंबरीच्या निमित्ताने मराठी साहित्यात एका चांगल्या कलाकृतीची भर पडली आहे अन् एक वेगळा प्रवाह गतिमान करणारी, वेगळी वाट चोखाळणारी ही कादंबरी समकालीन वाङ्मयात दखल घ्यावी अशीच आहे. 'गोष्ट छोटी डोंगराएवढी' हा पेठकरांनी लिहिलेला चित्रपट बघताना त्यात एका सशक्त कादंबरीची बिजे दिसली होती, आता ही कादंबरी वाचत असताना वाचकांना दमदार चित्रपट बघत असल्याची अनुभूती होते.

भावलीचं लगीन, लेखक श्याम पेठकर, पृष्ठे ३३५, किंमत ३००रु., विजय प्रकाशन, नागपूर

। लोकनाथ यशवंत
सत्यम-३, विश्वकर्मा नगर,नागपूर.
भ्रमणभाष ९७३०२७५१५२

अनुक्रमणिका

।। पुस्तक परीक्षण ।।

बोलावे ते आम्ही...
नव्वदोत्तर कविता आणि ग्रामीण संवेदनशीलता

दा. गो. काळे

■

श्रीकांत देशमुख यांची कविता नव्वदोत्तर जाणिवेला प्रत्यक्ष अनुभूतीतून आपले शेतीनिष्ठ वास्तवासह पुढे जाते. लोकघाटी जीवन शैलीतील आदिम दुःखाचं उत्तर आधुनिक संवेदन शीलतेशी नातं लावतांना होणारी तगमग व्यक्त करणारी ही कविता आहे. भारत हा कृषिप्रधान देश आहे. त्यामुळे येथील लोकांचं शेती परंपरेशी असलेलं नातं मूलभूत स्वरूपाचं आहे. लोकभावनांच्या विविध पदरांनी तीची समृद्धता जीवन परंपरेशी अतूट अशी जोडल्या गेली आहे. जागतिकीकरणोत्तर विविध असंभाव्य घटितांनी आलेलं विस्कटलेपणं अगतिकपणे वारंवार गतस्मृतीला उजाळा देत, भविष्यातील अंधकारमय भयावह स्वप्न ती पाहते. मानवी मूल्यांचं एका हृदयशून्य बाजारपेठेत झालेलं परिवर्तन भविष्यवेधी अर्थमूल्य संस्कृतीकडे झेप घेण्यास प्रवृत्त होत नाही. ही खऱ्या दृष्टीने आड येणारी शोकांतिका आहे. ही सगळी स्थिती नव्वोदोत्तर कृषिजन्य कवितेमध्ये प्रकर्षाने व्यक्त झाली आहे. याशिवाय श्रीकांत देशमुख यांची कविता आधीभौतिक मूल्यरचनेला प्रमाण मानीत आजची वृत्ती आणि मानवी प्रवृत्तीचा वेध घेतांना आपलं वेगळं स्थान प्रस्थापित करते.

श्रीकांत देशमुख यांची कविता नव्वदोत्तर कालखंडातील महत्त्वाची जाणीव व्यक्त करीत असून या कवितेला चिंतनगर्भ असा अवकाश प्राप्त झाला आहे. त्यांचे आतापर्यंत दोन कविता संग्रह 'बळिवंत' 'आषाढमाती' आणि आज ज्यावर विशेषत्वाने बोलल्या जाणार आहे. तो संग्रह 'बोलावें ते आम्ही...' हा आहे. ह्या संग्रहाचा विशेष भाव सांगतांना असं म्हणता येईल, की ही परिस्थिती विषयीचे ग्राऱ्हाणे मांडणारी विवेकशून्य कविता नाही. कर्तव्यभावानेतून समंतपणे केलेलं हे निवेदन आहे. देश काळ परिस्थितीची योग्य जाणीव या कवितेला आहे. आम्ही.. या प्रातिनिधिक अवकाशातून आपले स्वातंत्र्य आणि सत्व अबाधीत ठेवण्याची किमया कवितेत आहे.

'बोलावें ते आम्ही... या तुकारामाच्या अभंगवाणीचा, त्यातील अपेक्षीत भावतत्त्वाचा विस्तार साधण्याचा प्रामाणिक प्रयत्न या कवितेतून दिसतो. तुकारामाने पाहिलेल्या, साहिलेल्या दुःखाचं चिरंतत्व तुमच्या आमच्या सामान्यांच्या परंपरामूधन अजूनही झिरपते आहे. त्यांच्या अक्षरत्वाची नाळ शेतकऱ्यांच्या (कुणब्यांच्या) दुःखाशी सततची जोडल्या गेली आहे. अभंगातून व्यक्त झालेलं आत्मचरित्र एकाच वेळी समष्टीचं चिंतन करते. आम्ही ह्या प्रातिनिधिक वलयातून संवादी होते. त्यातून आलेली संवेदनशीलता आजच्या कृषिनिष्ठ कवितेचे पोषण-सत्व ठरते. या धारणेतून 'बोलावे ते आम्ही... या कवितांमधून कवी सतत बोलतो आहे. भोगलेल्या, कोसळणाऱ्या दुःखाची जाणीव करून देत पराभूत मानसिकतेकडे वळतांना दिसते त्यातूनही पुन्हा पुन्हा रुजनू

अनुक्रमणिका

येणं आणि विश्वाला समृद्धी देण्याची स्वप्न तो पाहतो.

काय असतं पुन्हापुन्हा संपून पुन्हापुन्हा रुजून येणं
काय असतं देहाचा उकिरडा करून विश्वाला समृद्धी देणं
आपलं कोणीही नाही असं वाटण्याच्या निरंतर काळात
पुन्हापुन्हा रोज नव्यानं कवटाळतो आम्ही
जगण्याचे निरंतर श्वास समष्टीसह सदासर्वदा

ही तुकारामाच्या जीवन-जाणिवेतून येथपर्यंत ग्रामीण जीवनापर्यंत पोहचलेली संवेदनशीलता आहे. ग्राम्यजीवनाची घडणंच संत साहित्याच्या संस्कारातूनच आकार घेत आपल्या जगण्यासह समष्टीचा अवघा विचार ही कविता विस्तारित करतांना दिसते. एकटं वाटण्याच्या निरंतर काळातही रोज रोज मरणाच्या अवस्थेत विश्वाची चिंता वाहण्याची परंपरा मराठी कवितेत अजूनही टिकून आहे. श्रीकांत देशमुख आपल्या कवितेतून गत-स्मृतीत डोकावण्याचा हव्यास या भूमिकेतून करतात. बदललेल्या व्यवस्थेचे समर्थन करण्याची, अनुकरणाची ताकत त्यांची भावूक मनोवस्था टिकू देत नाही.

'बोलावें ते आम्ही...'तील कविता वैशिष्टपूर्ण मांडणीसह आपल्या भोवतालचे प्रारूप विविध संवेदनांनी जिवंत करीत जाते. एका सर्गातून पुढे सरकतांना संहितेतून प्रकटणारी अवस्था एक कालव्याप्त मीमांसा ठरते.

भूमी सावरण्याची गोष्ट । एका गावाची गोष्ट ।
उजळ माथ्यांन भूमिपुत्र । उजेडाचे मोर आणि नेणतं झाड

न संपणाऱ्या गोष्टीतील नायकाची ही गाथा आहे. ह्या सगळ्या संकल्पना मातीच्या आदिबंधातून पुढे सरकतांना दिसतात. भूमिपुत्राच्या आस्था, व्यथा आणि तृष्णा मातीच्या अवकाशात फुलतात, फळतात विलयाचा उत्सवही ह्या बंधातून निसटतांना दिसत नाही. ही सेंद्रिय एकात्मता ह्या कवितेची एक बाजू आहे. मातीसोबत माती होण्याची अवस्था सुख आणि दुःखाने सळसळणाऱ्या नेणत्या झाडांत निर्माण करण्याची, जिवंत करण्याची क्षमताही काही अंशी या कवितेत आहे.

एकेक पाथ निंदून व्हावी तशी संपून जातात वर्षे
मातीखालची लव्हाळी हरळीकुंधा कधीच मरत नाही
हाडामासांची होते माती तरी निंदण सरत नाही

ही निरंतरता ह्या कवितेतून आलेली सार्वकालीक अवस्था आहे. त्याचबरोबर 'स्त्री' ह्या घटिताशी कोणत्यातरी आंतरिक नात्याने भूमी-तत्त्वाशी जोडून घेणे, ही कवितेतून आलेली सहजप्रक्रिया आहे. आदिबंधात्मक सर्जनतत्व ह्या दोन्ही घटकांमध्ये सामावलेले आहे. ही ओढ कवीच्या आणि कवितेवरच्या संस्कार सूत्रातून प्रवाहित झाली आहे.

कविता म्हणजे प्रतिमांचे केवळ संकलन नसते. कवितेतील प्रतिमा काव्यात्म व्हावयाच्या असतील तर अर्थपूर्णता यावयाची असेल तर कोणत्यातरी अंतर्गत नात्याने बांधलेल्या असल्या पाहिजेत. यातून कवितेचा सेंद्रिय रूपबंध आकार घेत असतो. अत्यंत हळुवार असे संवेदन सूत्र तेथे काम करीत असते.

'अवघी माती फळते फुलते
निरंतर तळमळणाऱ्या
तिच्या श्वासातून'

'भूमि आणि स्त्री'च अद्वैत कवितेतून अशा प्रकारे आले आहे.

जगण्याविषयीची अपरंपार ओढ, आपल्या भोवताला विषयी व्यक्ततेच्या पलीकडे गेलेली आस्था ही ग्रामीण संस्कृतीची उपजत ठेवण आहे. ह्या संपूर्ण भाववृत्ती महाराष्ट्राच्या संतपरंपरेतून 'विठ्ठल' या आदिप्रतिमेतून सामूहिक नेणिवेच्या स्तरावरून ग्रामीण भावजीवनामध्ये मूर्त झाल्या आहेत. हा सोहळा 'आषाढमाती' या काव्यसंग्रहामध्ये 'विठ्ठल' या आदिबंधात लोकरूपाचा त्यांच्या आदिम नात्यांचा घेतलेल्या शोधात वाचण्यासारखा आहे. शेतकऱ्यांच्या भावविश्वातील विठ्ठल हा आदिम व सर्वस्पर्शी असा आविष्कार आहे. ग्रामीण जीवनामध्ये झिरपत आलेल्या संवेदनशीलतेचे अजोड असे नाते या वृत्तीशी जोडता येते.

''त्यांचा जीव आहे साऱ्यांच्याच गावावर
परक्याच्या शेतालाही कुरवाळतात ते मायेनं
कोणताही बैल वाटतो त्यांना जगन्नियंता
वाटेतल्या गायीलाही टाकतात ते कडब्याची पेंढी

आपल्या भोवतालाविषयी ते कधीच बोलणार नाहीत
त्यांच्यातच सामावलंय इथलं पीकपाणी, ओढेनाले
डोंगरदऱ्या, मायलेकी, बापलेक, गुरंवासरं

आपणच आपल्याविषयी बोलण्याचं पाप
ते कधीही करणार नाहीत
जे झोपतात उशाला घेऊन मातीचा ढीग
उगवतात आणि वाढतात मातीत ''

जागतिकीकरणानंतर, कोसळलेल्या बदलांच्या पार्श्वभूमीवर गतस्मृतींना आलेली अनावरत ऊब ह्या शतकातील वेगळ्या प्रारंभाची सूचक खूण आहे. ग्रामीण जीवनातून वेगाने हद्दपार होणारी ही कोवळी जाणीव नव्वोदत्तरी कवितेमध्ये अंतर्बाह्य

वाताहतीचे चित्र निर्माण करते. ही खोल आणि चिरंतन दुःख देणारी घटना आहे. ह्या दृष्टीने ही कविता महत्त्वाची वाटते. तीचे असणे प्रासंगिक नाही. ती तळातून अवस्थेचा शोध घेत पृष्ठभागावर सत्य ठेवते आपली सत्त्वाची जाण ही ठेवते.

आई-बाप आणि एकमेकांच्या सतत वास्तव्याला असणारा माणसांचा तुडुंब भोवताल ह्या पार्श्वभूमीवर आज पसरत चाललेलं एकटेपण, गावगाड्याचं निसटतेपण देशमुख कवितेतून अधोरेखित करतात. 'गर्भ काढला तर बाई माणसात काय उरतं' या प्रकारची स्थिति गावगाड्यातील संबधाची झाली आहे. ग्लोबल व्हीलेजची संकल्पना आणि त्या संबधाने माणसांपर्यंत (सर्व्हे Serve) होत गेलेली भौत्तीक साधनं खोलवर रुजतं चाललेलं मुकेपण रोखू न शकणारी आहेत. या अपरंपार उपलब्धतेमध्ये माणसा-माणसांतून काय हरवले आहे. ही गुंतागुंत न समजण्यासारखी स्थिति पुरेसं विश्लेषण करून देत नाही. सतत आणि वेगाने बदललेलं वास्तव निटशी चिकित्सा करायला वाव देत नाही. ही बहुकेंद्री विमनस्कता आहे. वेगाने हद्दपार होत चाललेली जुनी-जाणती पिढी काळाच्या पार्श्वभूमीवर प्रभावहीन ठरल्याची संक्रमणवस्था आहे. ही नुसतीच जनरेशन गॅप नाही. कमालीचा अनादर ह्या टेक्नोसेव्ही व्यवस्थेने निर्माण केला आहे. ही गोष्ट आतिथ्यपूर्ण नाही.

ह्या दृष्टिकोणातून या कवितेतून आलेली आजी संक्रमण अवस्थेतील शेवटची आजी ठरावी, एवढं तीचं असणं मनाला हेलावून सोडते.

''ती जगत होती गर्भाशिवाय
शेतीभाती, कीकामुंगी, गुराढोरांसारखी
फिरत होती भिरभिरत, डोईवरलं आभाळ सावरत

जायची आजी कुंभारवाड्यात
महारवाड्यात, इंदिरानगरात
शोधत राहायची ती तिच्यासारखी बोलणारी आईबाई

तिला तिच्यासारखं बोलणारं कोणी उरलं नाही''

ही शोकांतिका ग्रामीण संवदेनशीलतेच्या पार्श्वभूमीवर भयंकर कोडगेपणं दाखवणारी आहे.

'माय-बाप' आणि वडिलधाऱ्या माणसांच अस्तित्व परंपरेने अगदी आदिमतेतून आपल्यात उतरलं आहे, ह्या नात्यासाठी पुढची वहिवाट आपल्यातूनच निरंतर सुरू राहावी, ही ओढ ग्रामीण जीवनासक्तीची आहे. ही नाती आता येथून पुढे परांगदा होण्याची स्थिति या वर्तमानातून पुढे सरकते आहे. ही भयंकर गोष्ट सूचकपणे या कवितेतून व्यक्त होते.

आपण कसे उभे करावेत
काल्पनिक पणजोबा खापर पणजोवा
किंवा
अशाच समकालीन ऐतिहासिक
आयाबाया
माझ्या गुणसूत्रांना जोडणाऱ्या
पूर्णतः बिनऐतिहासिक वर्तमानासाठी

मुळात आई-बाप ही सरळ नात्यामध्ये गुंडाळणारी अवस्था नाही. संबध जोडता-येण्याइतकी सहज तकलादू वस्तूही ती नाही. एकमेकांसमोर उभं राहण्याचं बळ निर्माण करणाऱ्या गुणसूत्रांचा अविरत असा प्रवास आहे. ह्यात बाळपण आणि म्हातारपणातील एकमेकाधार्जिन्या अवस्था आहेत. ही पूरक अशी समतोल संज्ञा आहे. पुन्हा-पुन्हा आठवत जाणाऱ्या काळात आई-वडिलांच्या सहवासाचा हिस्सा अधिक असतो. ह्या मानसिक संवेदनातून होणारी घडण गत-स्मृतीच्या डोहाकडे झुकलेली असते. त्यामुळे भविष्याबद्दल वाटणारी अनिश्चित जाणीव त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक भाग बनतो. म्हणून ही कविता वाहाता झरा आणि रांगता वारा होऊन. आजच्या ग्रामीण वास्तवाच्या पातळीवर आई-बापाच्या भोवतीचं उत्तुंगपण प्रभावीपणे मांडतांना दिसते. त्यांच्या आठवणीने भारलेल्या अनेक गोष्टी, त्यांचा सभोवताल जिवंत करतांना एक स्वच्छ, नितळ असे हळवेपण कवितेतून व्यक्त होते. वास्तव भविष्यदेयी विपरीत असा काळ कविता ठेवत नाही. वाचतानांच तीच्या अनुभूतीतून विपरित पावलांच्या खुणा आपोआप उमटत जातात. ती व्यक्ततेच्या पातळीवर सरकत असते.

आईचं आईपण कसं होतं थेट सरळ
पाऊस पडल्यानंतर खूप दाटीवाटीनं उगवलेल्या
ओढे काठावरच्या गवतासारखं
बापाचं बापपण शोधतांना
घ्यावा लागायचा आधार डोंगरकपारीचा
दिसायचा दगडी भेगातून चिवटपणानं
वाढणारा, मातीवर सावली पांधरणारा
एखादाच पिंपळ, उंबर...

नात्याचा सार्थ अभिमान या कवितेतून विविध प्रतिमांमधून साकारल्या जातो. बापाची उंची ह्यातभर सोबत करणारा मुलगा, आम्ही...नी सोसलेल्या सामूहिक अशा दुखद जाणीवेतून... संवेदनशील नात्याचा तळ गाठतो. आज

अनुक्रमणिका

बदललेल्या वास्तवाच्या पातळीवर हे चित्र नेमके कसे आहे? आज ह्या नात्याची उंची कोणत्या निकषावर उभी आहे. त्यामध्ये संस्कारक्षम असणाऱ्या पिढीची भव्यता आहे का? ही गॅप... आज पडत गेलेलं अंतर मोजणारी कविता आहे. उत्तर-आधुनिक वसाहतीसाठी सक्षम असं प्रॉडक्ट देण्याच्या प्रक्रीयेमधील बापाचे आगमन ही महत्त्वपूर्ण अशी घटना म्हणता येईल. बाप ह्या संस्थेचं स्वरूप बदलाच्या वळणावर उभे आहे. श्रीकांत देशमुखांच्या कवितेतून आलेल्या आई-बाबांना त्यातून प्रगटणाऱ्या संवेदनशीलतेला हा शह आहे. नुसती ही संस्था विसर्जित होत नाही, तर त्यांनी अपेक्षीलेला सगळा भोवताल त्यांच्या परिघाची व्याप्ती क्रमाक्रमाने वास्तव केंद्राकडे उलट्या क्रमाने आक्रसू लागते. एका मानदंडामध्ये काळ त्यांचं सक्षम असे रूपांतर करीत असतो. ही अवस्था ग्रामीण जीवनातील लोकसंचित हरवत चालल्याची खूण आहे.

अशा अनेक अनुभवांनी श्रीकांतची कविता ग्रामीण भावजीवन समृद्ध करीत.. उलट्या क्रमाने ध्वस्त होत चालल्याची खंत अनावर होतानाचे चित्र भयावह स्वप्नाकडे घेऊन जाते. ही परिणामकारक घडण गांभीर्य घेऊन प्रकटते.

जागतिकीकरणाच्या परिणामातून बदललेलं वास्तव कोणत्याही परंपरागत सांप्रदायीक जाणीवेतून रोखू शकत नाही विश्वात्मक पसायदानातून खेड्यातील पोसलेलं भावजीवन बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या विश्वात्मक वाऱ्याने नष्ट होत आहे. जाणवत असलेल्या मुक्ततेला कुठेतरी जखडत जात असल्याची बेमालूमपणे घेरल्याची चिन्हे ही कविता निर्देशीत करीत जाते. ह्या वाऱ्यावर स्वार झाल्याशिवाय नाकारता येणं कठीण आहे. ह्या बदलांच्या दिशांना अधिकाधिक प्रकाशाची दारे उघडली जात आहेत. त्यांनी आपल्या अस्तित्वावर असतेपणावर मिळवलेल्या प्रचंड विजयाचं हे शतक आहे. खेड्याचं झालेलं विश्वात्मक रूपांतर आपलं वेगळेपण जागच्या जागी गोठवून... जगाच्या सार्वभौम दिंडीमध्ये सामील होण्यासाठी रिघ लागण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

या वाऱ्याला वेसण लावणं मुश्किल झालंय
कुठलाही अभंग, आरती, भजन, कीर्तन
अडवू थोपवू आवरू थोपटू शकत नाही
की थांब जराभर, बांधतो न पडणारे घर
असंही म्हणू शकत नाही.

कवीचा, कवितेचा संबध प्रत्यक्ष जीवन धारणेशी असतो. कवितेचा आविष्कारच हा जीवनातील सुख दुःखाच्या, अंतःस्वराजवळ निश्चित अशा चिकित्सेसाठी असतो. कविता एका दृष्टिक्षेपातून पुढे जात असतांना, आपल्या अनुभवजन्य घटकांतून निवेदन संश्लेषण, तपशीलातून आशयाचं संक्षेपीकरण करीत निश्चिततेकडे सरकत असते. दृष्टेपणा, सूचकता हे तिचे भविष्यदेई संचित असते. त्यादृष्टीने काळाचे तिन्ही पट तिच्या अस्तित्वात सामावलेले असतात ही गोष्ट नाकारता येत नाही. तीचे असतेपण या घटकांमध्ये अंतर्भूत असते. म्हणून सत्यार्थ दर्शन हा तिचा एकंदर अवकाश आहे.

श्रीकांत देशमुख यांची कविता आपल्या स्वयंपूर्ण, स्वतंत्र अभिव्यक्तीतून ग्रामीण जीवनाचा भव्य असा पट मांडते. सांप्रत काळाचे परिमाण ती मराठी कवितेला प्रदान करते.

'बोलावें ते आम्ही...'या कवितेतून उसवत गेलेले बहुस्तरीय परिवर्तन नव्वदोत्तर काव्य-जाणिवेला व्यापक असे परिमाण देऊन जाते. कारण त्याचा संबध प्रत्येकाच्या मनात स्वप्नावत रूजलेल्या शेतिनिष्ठ भावावस्थेशी नकळत जोडल्या जातो. त्यामुळे कविता वाचतांना येणारी अंतर्मुखता, कुंठीत आणि बधिर करणारी पोकळी निर्माण करीत जाते. परंपरागत भावविश्वाकडे ती आपणास घेऊन जाते. संवेदनशील होण्याला प्रवृत्त करते.

ही कविता वाचतांना आपण दोन वेगवेगळ्या मूल्य व्यवस्थांशी संवादी होत जातो. कारण जगत असतांना होणाऱ्या बदलाची व्यवस्था अपरिहार्यपणे स्वीकारलेली असतेच... त्यात होणारी घुसमट कुठेतरी आपल्याला भिडणारी दुःखद, संवेदना निर्माण करणारी असते. विशेषतः नव्वदोत्तर कवितेचा महापट जागतिकीकरणोत्तर बदलांना समोर जातांना होणाऱ्या परिणामाचा परिपाक आहे. हा मानवी जीवनाच्या त्याच्या सभोवतालच्या जीवन-जाणीवेवर सार्वत्रीक असा आघात आहे. अनुभवाचे विविध स्तर या स्थितीला असले तरी दुःखाची एकरेषीयता समान सूत्रातून दृग्गोचर होत जाते-त्यामुळे विशिष्ट आणि शेतिनिष्ठ दुःख असे लेबल या किंवा कोणत्याही अभिव्यक्तीला लावता येत नाही. शेवटी कविता ही फक्त कविताच असते. असे म्हणता येते.

ही कविता सतत दोन स्तरावरील अनुभवांना समोरी जातांना दिसते. एक म्हणजे गतस्मृतीची नजरे समोरून सरकणारी चित्रफीत आणि त्याच पार्श्वभूमीवर वास्तव जगण्यातील भयावह चित्र ती पाहते. जगण्यात बदल करण्याचा किंवा स्वीकार करण्याचा कोणताही मार्ग ह्या कवितेतून धिरोदात्तपणे पुढे येत नाही. जगण्यातील नव्या-नव्या वाटा शोधण्यापेक्षा चक्रव्यूहात अडकून अगतिकपणे पराभवाचे सूक्त ती मांडते. कृषी वैभवातील जन्ममृत्यूचा सृजनशील सोहळा

अनुक्रमणिका

पाहणारा नायक आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतो, हे ह्या कवितेचे वास्तव आहे. ह्या दुःखाचे निराकरण न होणे, ही या कृषिजन्य कवितेची मर्यादा आहे.

आता तर कुठंच काही पेरू नये, आकाशाला तोलू नये
थेंबाथेंबात मायेचं आभाळ भरू नये
फिरवू नये थरथरता राबता हात या मातीच्या
निर्वाण पाठीवरून
दाळदाण्याच्या गर्भातल्या बोलत्या अंकुरांना
देऊ नये रुजण्याची हाक मन भरून
खूपदा असेच काहीबाही ठरवतो आम्ही...

अर्थात आमच्याविषयी आताशा कोणीही बोलत नसतांना हा मनस्वी असा भूमिपुत्रांचा त्रागा या कवितेमधून सतत, संथ आणि संयतपणे व्यक्त झाला आहे. खरे तर ह्या मंडलाकार अवकाशाला घातलेली ही साद आहे. इथला निसर्ग आणि पर्यावरणाला नासवणाऱ्या दुष्ट शक्तींना विनाश वाचविण्यासाठीचे निवेदन करुणेचा स्वर कवितेमधून येतो. या समग्र कवितेला संज्ञाप्रवाही मूल्य भान आहे. तिच्या कठोरतेला संवेदनशीलतेची सूक्ष्म जाणीव समग्रतेला कवेत घेण्याची विश्वात्मक दृष्टी आहे. कारण तिचा ओघ संत-साहित्यातून लोक चिंतनातून पुढे आला आहे. म्हणून ही कविता युगांतराबद्दल बोलून भविष्यवेधी होत नाही. तिला आपले असतेपण भूमी सावरण्याच्या गोष्टी इतके पुरेसे आहे. शाश्वतमूल्य टिकविण्यासाठी वर्तमानाबद्दलची सजगता या कवितेला महत्त्वाची वाटते.

ही कविता कृषी संस्कृती व तिच्या संर्वधनातून उभी राहिलेली ग्राम-व्यवस्था प्रमाण मानते. बदलांच्या पार्श्वभूमीवरील तिचे-बोलणे विनाशकारी अशा स्थितीकडे निर्देश करते. ग्रामीण संवेदनशीलतेशी आपले नाते कायम ठेऊन नव्वदोत्तर बदलांना समोर जातांना गतस्मृतींना उजाळा देत.. शतकानुशतकांपासून चालत असलेले बोलणे... पुढल्यांसाठी पुन्हा बोलावे लागावे - ही तिची व्यथा आहे.


बोलावे ते आम्ही .-श्रीकांत देशमुख, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती २०१३, मूल्य १८० रु.

। दा. गो. काळे
रोकडिया नगर,
शेगांव - ४४४ २०३
जि. बुलडाणा.
भ्रमणभाष ९४२१४६७६४०



चंद्रगुप्त भालेराव

- १२ वी विज्ञान शाखेत उत्तीर्ण.
- चित्रकला फाऊंडेशन अभ्यासक्रमात राज्य गुणवत्ता यादीमध्ये क्रमांक.
- २०१२-१३ मध्ये महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शनात सहभाग.
- सध्या रेखा व रंगकला विभागात चित्रकलेचे उच्च शिक्षण सुरू.
- प्रतीके (symbols) या विषयावर संशोधन सुरू.
- अमूर्त (ॲब्स्टॅक्ट) चित्र आणि त्यामागील विचार यांचा अभ्यास सुरू.



अनुक्रमणिका

।। पुस्तक परीक्षण ।।

विभागीय नाट्यसंस्कृतीचा दस्तऐवज

अनिल चनाखेकर

■

नाटकाच्या कलेत शिक्षित होण्याच्या दोन पद्धती आहेत. एक म्हणजे एखाद्या शिक्षण संस्थेत औपचारिकपणे प्रवेश घेऊन किंवा नाट्यप्रशिक्षणाचे शिबिरात धडे घेऊन; दुसरी म्हणजे स्वतःत उत्पन्न झालेल्या जिज्ञासेपोटी किंवा आवडीतून जे शिक्षण मिळते ते. यात फरक असा आहे की, शिक्षण संस्थेतून घेतलेले शिक्षण आपल्याला सैद्धांतिक आणि प्रायोगिक अशा दोन्ही दिशांनी प्रशिक्षित करते; परंतु देश-विदेशातील लेखकांचे अनुभव वाचून त्यांचे अनुभव जिज्ञासूंनी व्यवस्थितरित्या आचरणात आणल्याने स्वतः या क्षेत्रात प्रयोग करून स्वतःला प्रशिक्षित करवून घेता येते. या प्रकारच्या प्रशिक्षणात अशा रंगकर्मीची आजूबाजूच्या नाट्यपर्यावरणावर बारीक नजर असते. डॉ. विलास चिंतामण देशपांडे या दुसऱ्या प्रकारात मोडतात. या पार्श्वभूमीवर डॉ. देशपांडे यांचे 'नाट्यसंस्कृती' हे पुस्तक नाटक आणि रंगभूमी संबंधातील मंडळींसाठी अनुभावक आणि प्रेरणास्त्रोत ठरू पाहणार आहे.

डॉ. विलास चिंतामण देशपांडे हे महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनीतून वित्त व लेखा व्यवस्थापक म्हणून निवृत्त झाले. 'मराठीचे आधुनिकीकरण' हा त्यांचा ग्रंथ त्यांच्या व्यवसायाशी संबंधित नाही. डॉ. देशपांडे हे शैली व भाषाशास्त्रासोबतच संवादशास्त्राचेही अभ्यासक आहेत. त्यामुळे त्यांनी नाट्यभाषेचा विचार संप्रेक्षणाच्या अंगाने मांडणे अपेक्षित आहे. मात्र केवळ संप्रेक्षणच नव्हे, तर त्यांनी त्याला संवादशैलीचाही जोडलेला आयाम ही त्यांची स्वतःची नाट्यभाषेकडे बघण्याची स्वतंत्र दृष्टी आहे. इथे हे नमूद केले पाहिजे की नाटक-रंगभूमी विषयात त्यांनी कुठलीही पदवी धारण केलेली नाही वा प्रशिक्षणही घेतलेले नाही. मात्र त्यांना असलेली रंगभूमी विषयीची आस्था व आवड त्यामुळे त्यांनी हा ग्रंथ संपन्न केला आहे. आपल्या मनोगतातूनही ते हेच सुचवितात.

नाट्यसंस्कृती संबंधातील लेखन याचा अर्थ नाटक-रंगभूमी, नाट्यपर्यावरण आणि हे पर्यावरण आकारीत होण्यासाठी करावे लागणारे प्रयत्न ह्याविषयीची चर्चा होय. डॉ. देशपांडे यांनी या सगळ्यांचा वेगवेगळ्या काळात लिहिलेल्या लेखांचा पाच भागातून समाचार घेतला आहे.

पहिल्या प्रकरणात डॉ. देशपांडे यांनी रंगभूमीच्या महत्त्वाच्या घटकांवर आपले चिंतन मांडले आहे. यात मांडलेले नाट्यभाषा, संप्रेक्षण, संवादशैली, नेपथ्य, प्रकाश योजना, दिग्दर्शन, अभिनय या विषयांवरील त्यांचे विचार एकूणच नाटक उभे कसे राहते या विषयीचे मार्गदर्शन ठरावे. दुसऱ्या भागातून त्यांनी मराठी रंगभूमीचा आढावा थोडक्यात घेतला आहे. या भागातील 'लोकरंगभूमीविषयक विकासात्मक कार्याक्रमा'बाबत त्यांनी सुचविलेले उपाय व 'पाश्चात्य

रंगभूमीने आपल्याला सूत्रबद्ध आत्मभान दिले' या दोन प्रकरणात त्यांनी केलेले सूचन एकूणच मराठी नाट्यविषयक लेखनातून अभावानेच आढळावे या दोन्ही प्रकरणाचा आवाका आणि कस मराठी रंगभूमीविषयक आपल्या दृष्टीला खडाडून जाग आणते. या ग्रंथातील भाग तीन, चार व पाच प्रामुख्याने वैदर्भीय रंगभूमीची अवस्था, तिच्यावर झालेल्या घडामोडी, उलथापालथी याचा मागोवा घेणाऱ्या आहेत. सुप्रसिद्ध अभिनेत्री, 'आविष्कार' संस्थेच्या सर्वेसर्वा सुलभा देशपांडे यांच्या मुलाखतीतून, एकूण विदर्भातील नाट्यक्षेत्रावर मुंबई-पुण्याकडील नाट्यक्षेत्रातील नाट्यमन्वतराचा कसा प्रभाव झाला, याचे दिग्दर्शन होते. या पाचव्या भागात सुलभा देशपांडे यांचा अपवाद सोडून विदर्भातील चार ज्येष्ठ रंगकर्मींच्या मुलाखती आहेत. विदर्भाच्या रंगभूमीला त्यांनी काय योगदान दिले याचा मागमूस आपल्याला यातूनच घेता येतो.

मराठी साहित्य समीक्षेच्या प्रांतात विदर्भाने नेहमीच आपला ठसा उमटवला आहे. या दृष्टीने डॉ. देशपांडे यांनी विदर्भातील नाट्यसमीक्षेचा थोडक्यात आढावा घेतला असून 'नागमंडल' या नाटकाचा संहिताविचार व 'एक दिवस मठाकडे' या नाटकाचा प्रयोगविचार स्वतंत्रपणे उलगडला आहे.

१९६० नंतरचा वैदर्भीय रंगभूमीच्या स्थितीगतीचा उलगडा चौथ्या भागात आपल्याला होतो. या भागातील परीक्षक-नाट्यकलावंत यांच्या नातेसंबंधातून (विसंबंध) परीक्षकाच्या निर्णयाने एकूणच नाट्यस्पर्धांचे व रंगभूमी पर्यावरणाचे कसे नुकसान होते यासंबंधीचे विचार डॉ. देशपांडे यांचे विचार, स्पर्धानिकालांना एक नवी दिशा देणारे ठरावे. रंगभूमीविषयक कार्य करणाऱ्या विदर्भातील महत्त्वाच्या संस्थांच्या कार्याचा उहापोहही याच भागात केला आहे.

या ग्रंथाच्या मलपृष्ठावरील त्यांचाच ब्लर्ब आपल्याला प्रेक्षकांची बाजूही समजावून सांगतो. ते म्हणतात, 'नाट्यप्रयोगाला खेळ म्हटले जाते. खेळात ईर्ष्येने सामील झाल्याशिवाय खेळ रंगणार कसा? खेळातील आनंद मिळविण्यासाठी आपले स्वतंत्र अस्तित्व क्षणापुरते विसरले पाहिजे' अजेय गंपावार यांचे नाट्यविषयक पुस्तकावरील चित्रांची वारंवारिता टाळून वेगळ्या प्रकारचे असलेले मुखपृष्ठ 'नाट्यसंस्कृती' ला एक वेगळीच उंची प्राप्त करून देते. थोडक्यात न्गुगी वा झ्योंगो यांच्या शब्दात सांगावयाचे झाल्यास नाट्यसंस्कृती आपल्या मौखिक आणि लिखित साहित्य व प्रतिसादात्मक माध्यमातून मूल्यसमूहाची अभिव्यक्ती करते. या मूल्यामुळे आपलीच आपल्याला ओळख होते. डॉ. देशपांडे यांच्या ग्रंथाने विदर्भातील रंगभूमी संस्कृतीचे स्थान व भान निश्चित केले आहे. या अर्थाने तो विभागीय नाट्यसंस्कृतीचा एक दस्तावेजच ठरावा. श्री. चंद्रकांत लाखे यांनी हे पुस्तक प्रसिद्ध करून विदर्भातील नाट्यसंस्कृतीला एक संदर्भ ग्रंथ दिल्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

नाट्यसंस्कृती, डॉ. विलास चिंतामण देशपांडे, लाखे प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती २०१४, मूल्य २४० रुपये

। अनिल चनाखेकर
७१, राजीवनगर
वर्धा रोड, नागपूर
४४० ०२५
भ्रमणभाष : ९४२२२९६६५९





माझी चित्रं

चंद्रगुप्त भालेराव

■

मी चित्र काढतो. का काढतो नाही माहिती! शोधायचंही नाही की हे मी का करतो. करण्यात आनंद आहे म्हणून कदाचित मी ती करतो. शेतकऱ्याला जसं, नित्यनियमानं आपल्या शेताकडे लक्ष द्यावं लागतं तसं मी माझ्या भाव-भावना यांच्याकडे लक्ष ठेवून त्यांना चित्र माध्यमातून व्यक्त करण्याचा प्रयत्न करतो. मी फक्त प्रयत्न करतो चित्र मला अजूनही जमत नाही. तसाही मी विद्यार्थी अवस्थेत असल्यामुळे मला तर त्यातला शून्यही अजून गवसला नाही. जहांगीर साबावाला म्हणतात त्या प्रमाणे, ''सौंदर्यांचा तन्मयतेने भोग घेताना सौंदर्याची साधना करावी लागते. सौंदर्य हे वाळूच्या कणात सूर्य रूपाने लपलेले का असेना त्यात अनंताचा, एकाग्रतेचा शोध घ्यावा लागतो. बाकी सारं विसरण्याची शक्ती असावी लागते'' त्याप्रमाणे मी चित्र काढताना तन्मयतेने, एकाग्रतेने फक्त चित्राचाच विचार करतो. चित्र पूर्ण झाल्यावर मी त्याकडे पाहतो, शक्यतो मी पूर्ण चित्रात कधीच बदल करत नाही तो बदल भरून काढण्यासाठी मी आणखी एक चित्र काढायला सुरुवात करतो मग मागच्या चित्राचा विचार करत पुढच्या नवीन चित्राची आधारबांधणी करून हवे ते बदल करून चित्राची निर्मिती करतो. पावसाळ्यात आपण इंद्रधनुष्य हमखास पाहतो. शास्त्रीय दृष्ट्या तो कसा तयार होतो त्यात काय घटक असतात ही माहिती सर्वत्र उपलब्ध आहे. पण त्याचा उगम शोधूनही कधी सापडत नाही. बऱ्याच वेळा मी त्यामागे धावलो पण अजून तरी मला तो गवसला नाही तसाच माझा आणि माझ्या चित्रांचा प्रवास आहे. मला माझी चित्र दिसताहेत त्यातले रंगही दिसाताहेत पण उगम मला अजून गवसला नाही. जेव्हा केव्हा मला तो गवसेल कदाचित त्यासाठी मला हे आयुष्य पुरणारही नाही तेव्हा त्याची उंची आणि त्याचे या जगातील स्थान माझ्यादृष्टीने फार महत्त्वाचे असेल. अनेक चित्रकार चित्र काढतात, त्यातून त्यांचे विचार मांडतात पण मला उत्स्फुर्त चित्रण आवडतं. त्यातून अव्यक्त रित्या आपल्या भावना अविद्ध रुपात समोर येतात आणि त्या अविद्ध (अमूर्त) रूपातच शोभतात. रंगातला प्रवाहीपणा त्यातील एकजीवपणा, रंगातील एकमेकांचा संवाद यांवर माझी चित्र स्थिरावली आहेत. सौंदर्यशास्त्रातील सौंदर्याचा अभ्यास करत करत मी त्याचा उपयोग माझ्या चित्र निर्मितीक्रियेत करून घेतो. मुख्यत्वे लाल, पिवळा, सोनेरी, (Chrimson, Magenta, Vintage, Gambage) हे रंग नेहमी डोकावत असतात असे नाही तर माझा चित्र विचारच या रंगात रंगून जातो आणि उत्स्फुर्तपणे पुढे असलेल्या माध्यमावर प्रकट होतो असे मी म्हणेन. सायंकाळच्या वेळी दिवसभर फिरून मस्ती करून आल्यावर एक कप चहा घेऊन तासंतास आकाशाकडे बघत असताना, आकाशाचेच आकार उस्फुर्तपणे लाल रंगात माझ्या कागदांवर अवतरतात. त्यांच्या सोबतीला त्याच रंगातील सत्य त्यांना साथ करतात तसे की ढगांमागून येणारा सूर्य, त्यांच्या सोबत असणारा सूर्य आणि दुसऱ्या बाजूला बघणारा मी अशी साधी चित्र आहेत. चित्रात फार काही विशेष असावं असा माझा आग्रह कधीच नसतो. माझी चित्र साधी असावीत त्यातून अर्थ बोध नाही झाला तरी रंगबोध व्हावा. एकदा असच कुठतरी वाचलं की गायतोंडे म्हणायचे, सकाळी उगवत्या सूर्याकडे बघावे म्हणून एकदिवस सकाळी साडे चारला उठून गच्चीत गेलो अन् पहतो तर पुढे चंद्राची हलकी बारीक कोर होती आणि तिच्या बाजूला तीन तारे त्रिकोण करून उभे होते तेच माझ्या चित्रात उतरले. चित्र म्हणजे फार सोपेही नसते पण चित्र म्हणजे फार अवघड ही नसते. प्रत्येक चित्र त्याचा विचार घेऊन चालतं असतं पण प्रेक्षकाप्रमाणे ते स्वतः मध्ये बदलही करून घेतं म्हणून मी फक्त चित्र मांडण्याचा प्रयत्न करतो त्याचा विचार त्याच्या प्रेक्षकाप्रमाणे बदलत राहीन. काही दिवसांपूर्वी मी केरळला जाऊन आलो, तिथे माझं सारं लक्ष त्या केरळी माणसांच्या कपाळी असलेल्या गंधावर होतं. परत आल्यावर त्याच्याशी निगडीत मी काही चित्र केली पण ती सुद्धा लाल-सोनेरी रंगातच. एकूणच माझी आत्तापर्यंतची चित्रे लाल-सोनेरी-पिवळा या रंगावर आधारली आहेत. काही चित्र मी दुसऱ्या रंगातही केली पण ती फार काही विशेष नव्हती. हा लाल रंग कुठवर मला साथ देतोय, बघू या!

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ

कार्यवृत्त १ जुलै २०१४ ते ३१ मार्च २०१५

■

दि. १६ जुलै, २०१४ प्रवाही निवदेन शैली आणि कथावस्तूच्या दमदारपणामुळे नवकथापूर्व काळात कथा वाङ्मयाला नवे वळण देणारे कथाकार वा.कृ.चोरघडे यांच्या जन्मशताब्दीचे हे वर्ष, विदर्भ साहित्य संघाचे व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे पूर्वाध्यक्ष असलेल्या वा.कृ.चोरघडे ह्यांच्या निवडक कथांच्या संग्रहाचा प्रकाशन समारंभ विदर्भ साहित्य संघ आणि चोरघडे कुटुंबीय ह्यांच्या संयुक्त विद्यमाने १६ जुलै २०१४ रोजी आयोजित करण्यात आला होता. ज्येष्ठ कथाकार आशा बगे व डॉ.श्रीकांत चोरघडे संपादित, साकेत प्रकाशनने प्रसिद्ध केलेल्या कथासंग्रहाचे प्रकाशन आघाडीचे कथाकार भारत सासणे ह्यांच्या हस्ते झाले. श्री.अजित दिवाडकर आणि मीना सासणे ह्यांनी वा.कृ.चोरघडे ह्यांच्या दोन कथांचे वाचन केले.

दि. २९ जुलै, २०१४ 'पाऊस मनातला, कवितेतला' ह्या कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. सुप्रसिद्ध कवयित्री विजया मारोतकर ह्यांच्या अध्यक्षतेत संपन्न झालेल्या कविसंमेलनाचे सूत्र पत्रकार नितीन नायगावकर यांनी सांभाळले. कवी कवयित्रींनी स्वरचित कवितांनी संमेलन गाजवले.

दि. १६ ऑगस्ट, २०१४ विदर्भ साहित्य संघातर्फे ॲड.अंजली ठाकूर ह्यांच्या 'गंध हे नवे' ह्या कथासंग्रहाचे प्रकाशन सुप्रसिद्ध अनुवादकर्त्या डॉ.उमा कुलकर्णी आणि ज्येष्ठ कथाकार आशा बगे ह्यांच्या हस्ते झाले. समीक्षक अरुणा देशमुख आणि लेखिका मृणालिनी चितळे ह्यांनी कथासंग्रहावर भाष्य केले. अध्यक्षस्थानी मनोहर म्हैसाळकर होते. दैनिक लोकमतचे संपादक प्रा.सुरेश द्वादशीवार ह्यांची प्रमुख उपस्थिती होती.

दि. ५ ऑक्टोबर, २०१४ विदर्भातील कलेची व संस्कृतीची ओळख नवीन पिढीला व्हावी ह्या दृष्टीने विदर्भ साहित्य संघातर्फे वैदर्भीय कला व संस्कृती ह्या विषयांवरील चित्रस्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्याचे प्रदर्शन दि.५ ऑक्टोबर रोजी कलादालनात आयोजित केले होते. सुप्रसिद्ध चित्रकार सुहास बहुळकर ह्यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. त्याचदिवशी सायंकाळी सुहास बहुळकर ह्यांची मुलाखत अजेय गंपावार ह्यांनी घेतली. त्याचबरोबर सुप्रसिद्ध साप्ताहिक 'विवेक' ह्यांनी महाराष्ट्रातील २०० वर्षांच्या कलेचा इतिहास असलेला 'दृश्यकला चित्रकलेचा खंड' तयार केला. खंडाचे संपादन श्री.सुहास बहुळकर ह्यांनी केले. ह्या ग्रंथाचे प्रकाशन झाले. 'विवेक'चे संपादक दिलीप करंबेळकर, दीपक घारे, डॉ.मनीषा पाटील ह्यांची ह्या प्रसंगी विशेषत्वाने उपस्थित होते. ज्ञानेश चित्रकला महाविद्यालय (नवरगाव, जि.चंद्रपूर) येथील श्वेता पोईनकरला रु.१५,०००/- रोख मनीषा नेतामला द्वितीय पारितोषिक तर दोन उत्तेजनार्थ पारितोषिके सुनील लोहकरे (नवरगाव) व सतीश पिंपळे (अकोला) ह्यांना प्राप्त झाले. स्पर्धेतील सर्वात लहान वयाचा कलावंत वैभव कांबळे ह्याने काढलेल्या मार्बतीच्या चित्राला विशेष पारितोषिक देण्यात आले. पारितोषिक वितरणापूर्वी सुहास बहुळकर यांनी पोर्ट्रेट. पेंटिंगचे अप्रतिम प्रात्याक्षिक सादर केले. 'परफॉर्मिंग आर्टचा' उत्तम अनुभव उपस्थितांनी घेतला.

दि. ८ ऑक्टोबर, २०१४ विदर्भातील साहित्य विश्वाला सुपरिचित असलेल्या स्वर्गीय कवी उ.रा.गिरी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विदर्भ साहित्य संघातर्फे कोजागिरीच्या पर्वावर नवोदितांचे कविसंमेलन आयोजित करण्यात आले होते. सुप्रसिद्ध कवी वसंत वाहोकर अध्यक्षस्थानी होते. ह्या प्रसंगी डॉ.रवींद्र शोभणे ह्यांनी कवी उ.रा.गिरी ह्यांच्या कवितेच्या संदर्भात आणि ह्या उपक्रमासंबंधीचा उद्देश स्पष्ट केला. रंगतदार कविसंमेलनाचा आस्वाद रसिकांनी घेतला.

अनुक्रमणिका

दि. १८ ऑक्टोबर, २०१४ : श्रीमती केतकी कानिटकर ह्यांच्या 'शतरूपा' ह्या कथासंग्रहाचे प्रकाशन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरु प्राचार्य योगानंद काळे ह्यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाचे कार्याध्यक्ष श्री.वामन तेलंग होते. कथासंग्रहावर डॉ.रवींद्र शोभणे आणि डॉ.आशा सावदेकर ह्यांनी भाष्य केले. हा कार्यक्रम विदर्भ साहित्य संघ व विजय प्रकाशन, नागपूर ह्यांच्या संयुक्त विद्यमाने झाला.

दि. ५ नोव्हेंबर, २०१४ : मराठी रंगभूमीदिनाच्या पर्वावर विदर्भ साहित्य संघाच्या 'घर-अभंग' ह्या उपक्रमांतर्गत महाभारत, दुर्गा भागवत, शिवाजी सावंत व डॉ. अरुणा ढेरे ह्यांच्या महाभारतातील निवडक व्यक्तिरेखांच्या विखुरलेल्या मूळ लेखनावर 'निळा सावळा काठ एक चिरंतन शोध' ह्या शीर्षकासाठी कर्ण, कुंती, द्रौपदी आणि राधा ह्या व्यक्तिरेखांवर आधारित डॉ.रजनी हसनअली हुद्दा ह्यांनी पुनर्लेखन केलेल्या संहितेचे अभिवाचन अजित दिवाडकर, माधुरी बेडेकर, डॉ.अंजली भांडारकर आणि रेणुका देशकर ह्यांनी केले. दिलीप म्हैसाळकर ह्यांची संकल्पना, अजित दिवाडकर ह्यांचे मार्गदर्शन व गणेश नायडू व अनिल इंदाने ह्यांचे निर्मिती सहाय्य ह्या प्रयोगास लाभले.

दि. १२, १३ व १४ डिसेंबर, २०१४ विदर्भ साहित्य संघाचे ६४ वे विदर्भ साहित्य संमेलन तळोधी (बाळापूर) जिल्हा चंद्रपूर येथे श्री.गोविंदप्रभू कला, वाणिज्य महाविद्यालय आणि विदर्भ साहित्य संघ ह्यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते, ६४ व्या विदर्भ साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष सुप्रसिद्ध समीक्षक डॉ.अक्षयकुमार काळे ह्यांनी भूषविले. संमेलनाची संपूर्ण धुरा विदर्भ साहित्य संघाचे जुने जाणकार सहकारी संमेलनाचे कार्याध्यक्ष डॉ.तु.वि.गेडाम ह्यांनी व स्वागत समितीच्या कार्यकर्त्यांनी सांभाळली. संमेलनाचे उद्घाटन श्री.मा.गो.वैद्य ह्यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे डॉ.गो.ब.देगलूरकर, प्रा.सुरेश द्वादशीवार आणि पूर्वाध्यक्ष श्री.शंकर बडे उद्घाटन प्रसंगी उपस्थित होते. परिसंवाद, अशोक पवार ह्यांची प्रकट मुलाखत, कविसंमेलन आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी संमेलन गाजले. ग्रंथदिंडी हे विशेष आकर्षण होते.

दि. १७ डिसेंबर, २०१४ : विदर्भ साहित्य संघातर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या ना.के.बेहेरे स्मृती विदर्भस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा झाली. स्पर्धेचे उद्घाटन कार्याध्यक्ष वामन तेलंग ह्यांच्या हस्ते झाले. स्पर्धेचा विषय होता. 'माझ्या संकल्पनेतील भारत' स्पर्धकांनी इंग्रजी, मराठी व हिंदी ह्या तीनही भाषातून विचार व्यक्त केले. प्रथम पारितोषिक एल.ए.डी. महाविद्यालय नागपूरच्या खायमा अहमद हिने पटकाविले तसेच महाविद्यालयाला स्मृतिचिन्ह प्राप्त झाले. पारितोषिक वितरण सुप्रसिद्ध डॉ.उदय गुप्ते ह्यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमास बेहेरे कुटुंबीयांपैकी मीनाताई बेहेरे आवर्जून उपस्थित होत्या.

दि. १४ जानेवारी, २०१५ विदर्भ साहित्य संघाचा ९२वा वर्धापन दिन. विदर्भ साहित्य संघ यंदा आपल्या गौरवपूर्ण वाटचालीची ९१ वर्षेपूर्ण करून ९२व्या वर्षात पदार्पण करीत आहे. मकर संक्रांतीच्या मुहूर्तावर स्थापन झालेल्या विदर्भ साहित्य संघाचा ९२वा वर्धापनदिन समारंभ बुधवार, दि.१४ जानेवारी, २०१५ रोजी सायंकाळी ५:३० वाजता विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक संकुलाच्या चवथ्या मजल्यावरील सभागृहात आयोजित करण्यात आला होता. ज्येष्ठ पत्रकार श्री.विजय कुवळेकर समारंभाचे प्रमुख अतिथी असून सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश न्या.विकास सिरपूरकर विशेष अतिथी होते. विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष मनोहर म्हैसाळकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभात संस्थेचे विश्वस्त व डॉ.चंद्रशेखर मेश्राम उपस्थित होते. ग.त्र्यं.माडखोलकर स्मृती जीवनव्रती पुरस्कार व संस्थेच्या अन्य वाङ्मय पुरस्कारांचे या समारंभात वितरण झाले. के.ज.पुरोहित 'शांताराम' यांना जीवनव्रती पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून प्रा.डॉ.म.शं.वाबगावकर, केतन पिंपळापुरे, डॉ.भारती सुदामे, डॉ.संध्या अमृते, नेहा भांडारकर, डॉ.तीर्थराज कापगते, सदानंद सिनगारे, प्रसन्न शेंबेकर, सविता देव-हरकरे, कथाकार मिलींद बोकील, डॉ.महेंद्र भवरे व चंद्रकांत ढाकुलकर हे यंदाचे पुरस्कारविजेते आहेत. विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र असलेल्या 'युगवाणी' या वाङ्मयीन नियतकालिकामध्ये १९४६ ते १९७६ या काळात प्रसिद्ध झालेल्या निवडक लेखांचा समावेश असलेल्या 'निवडक युगवाणी, खंड-१' ह्या ग्रंथाचे प्रकाशनही या समारंभात झाले. या खंडाचे संपादन वामन तेलंग यांनी केले आहे.

दि. १९ जानेवारी, २०१५ नेहा भांडारकर ह्यांच्या सहा पुस्तकांचे प्रकाशन वामन तेलंग ह्यांच्या हस्ते झाले. डॉ.रवींद्र शोभणे व वसंत वाहोकर ह्यांनी पुस्तकावर भाष्य केले.

दि. ६ फेब्रुवारी, २०१५ विदर्भ साहित्य संघाच्या ९२व्या वर्धापनदिनी ज्येष्ठ पत्रकार ग.त्र्यं.माडखोलकर स्मृती 'जीवनव्रती' हा सर्वोच्च साहित्य पुरस्कार यंदा ज्येष्ठ कथाकार

अनुक्रमणिका

प्रा.के.ज.पुरोहित, (शांताराम) ह्यांना घोषित झाला. प्रा.के.ज.पुरोहित ह्यांना पुरस्कार प्रदान करण्याचा समारंभ विदर्भ साहित्य संघातर्फे मुंबई मुक्कामी त्यांच्या निवासस्थानी साहित्य सहवास, वांद्रा येथे आयोजित करण्यात आला. विदर्भ साहित्य संघातर्फे सौ.शोभा उबगडे ह्यांनी त्यांचा शाल, श्रीफल, सन्मान चिन्ह व रु.२५,०००/-चा धनादेश देऊन गौरव केला. ह्या प्रसंगी मुंबई मराठी साहित्य संघाच्या कार्यवाह उषाताई तांबे व विदर्भ साहित्य संघाचे डॉ.रवींद्र शोभणे ह्यांची गौरवपर भाषणे झाली. विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक समितीचे आमंत्रक प्रकाश एदलाबादकर ह्यांनी प्रास्ताविक, मानपत्र, वाचन व सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास अनेक सुप्रसिद्ध साहित्यिक त्यांचे चाहते आणि कुटुंबीय उपस्थित होते.

दि. १० फेब्रुवारी, २०१५ सुप्रसिद्ध साहित्यिक, विदुषी दुर्गा भागवत ह्यांच्या १०५व्या स्मृती प्रीत्यर्थ 'दुर्गा भागवत एक शोध' ह्या अंजली कीर्तने ह्यांनी त्यांचा संपूर्ण जीवनपट उलगडून दाखविणारा अप्रतिम लघुपट तयार केला आहे. त्याची प्रस्तुती झाली. लघुपटाच्या आरंभी अंजली कीर्तने ह्यांची मुलाखत प्रकाश एदलाबादकर ह्यांनी घेतली. त्यातून दुर्गा भागवतांच्या बद्दलची त्यांची आत्मीयता व्यक्त झाली.

दि. २७ फेब्रुवारी, २०१५ मराठी भाषा दिनानिमित्ताने डॉ.विलास चिंतामण देशपांडे ह्यांचे 'भाषा प्रदूषण' या विषयावर व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी संघाचे कार्याध्यक्ष वामन तेलंग होते. सूत्र संचालन प्रकाश एदलाबादकर ह्यांनी केले.

दि. १० मार्च, २०१५ महिला दिनानिमित्त डॉ.अरुणा देशमुख ह्यांचे अध्यक्षस्थानी कर्तव्य संध्या आयोजित केली होती. सूत्र संचालन डॉ.सुरभी डबीर ह्यांनी केले. प्रास्ताविक शुभदा फडणवीस यांचे होते.

दि. ११ मार्च, २०१५ विदर्भ साहित्य संघाचे सन्माननीय सदस्य ज्येष्ठ साहित्यिक प्रा.म.ना.लोही ह्यांना श्रद्धांजलीचा कार्यक्रम संस्थेचे कार्याध्यक्ष वामन तेलंग यांच्या अध्यक्षतेखाली झाला. डॉ.रवींद्र शोभणे व डॉ.श्रीपाद भालचंद्र जोशी ह्यांनी शोक संवेदना व्यक्त केल्यात. सभेस प्रा.म.ना.लोही ह्यांच्या चाहता वर्ग व संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

विदर्भ साहित्य संघ

विद्वत्‌रत्न डॉ. के. ल. (भाऊजी) दप्तरी स्मृती संदर्भ ग्रंथालय
व
महामहोपाध्याय डॉ. वा. वि. मिराशी स्मृती सार्वजनिक वाचनालय

ग्रंथसहवास काही अभिप्राय

■

दीपा लागू अभिनेत्री ज्येष्ठ चित्रपट रंगभूमी, पुणे

मी आज २० वर्षांनी इथे (ह्या इमारतीत) आले आहे. सगळं बदलूनच गेलय. फार छान भव्य झालय. इथे लायब्ररीत बसून वाचत राहावं असे वातावरण आहे. सगळं डोनेशनवर उभं आहे हे समजल्यावर कौतुक माझ्या मनात वाढलं ते उतरवत आहे. हार्दिक शुभेच्छा!

माधवी वैद्य कार्याध्यक्ष (महाराष्ट्र साहित्य परिषद) आणि अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, पुणे

विदर्भ साहित्य संघाचे आणि माझे खूप जुने नाते आहे. आज (मला) आपण (सत्कारासाठी बोलवलेत!) प्रेमाने सत्कार केलात त्यामुळे हे नाते परत एकदा उजळून निघाले आहे (असे वाटते). आपली देखणी वास्तू व भरघोस साहित्याची वाटचाल पाहून अभिमान वाटतो. (आपली साथ सदैव आहेच ती तशीच असू द्यावी ही प्रार्थना!)

निना कुळकर्णी सुप्रसिद्ध रंगभूमी/चित्रपट अभिनेत्री आणि निर्माती, मुंबई

आज ह्या वास्तूत आले आणि असे वाटले की इथून हलूच नये! अप्रतिम! पुस्तकांचा वास नाकात भिनतोय, पुस्तकं खुणावताहेत! आनंद झाला! धन्यवाद!

विजय भटकर भारतीय बनावटीच्या परममहासंगणकाचे उद्गाते

विदर्भ साहित्य संघाचे 'ग्रंथसहवास' ग्रंथालय हे एक अत्यंत प्रेक्षणीय व आदर्श ग्रंथालय वाटले. ग्रंथालयातील ४०,००० हून जास्त ग्रंथ, ग्रंथरचना, ग्रंथालय वास्तू सारेच काही अभिनव वाटले, हे ग्रंथालय खऱ्या अर्थाने साहित्य

संघाचेच नव्हे तर नागपूर शहराचे खरे वैभव आहे असे मला वाटते. ग्रंथालयात प्रवेश करून अवर्णनीय आनंदायी अनुभूती झाली. माझ्या शुभेच्छा. या ग्रंथालयाचे संपूर्ण संगणिकीकरण व्हायला हवे. या प्रकल्पात माझे पूर्ण सहकार्य राहील.

अवधूत परळकर चित्रपट माध्यम अभ्यासक, मुंबई

'अद्‌भूत' या एका शब्दात या ग्रंथालयाचं वर्णन होऊ शकेल की त्यासाठी नवा शब्द शोधावा लागेल? ग्रंथात इतक्या सन्मानानं वावरणारी दुसरी वास्तू आणि संस्था माझ्या पाहण्यात नाही. ग्रंथालयाला कल्पक प्रशासक लाभावेत ही देखील आनंदाची गोष्ट आहे. सर्व संबंधीतांना मनःपूर्वक शुभेच्छा !

डॉ. विद्यागौरी टिळक मराठी विभाग प्रमुख, पुणे विद्यापीठ, पुणे

विदर्भ साहित्य संघाचे हे ग्रंथालय अतिशय आवडले. संदर्भ मिळायला आणि त्यानुसार पुस्तके मिळायलाही अतिशय सहज अशी व्यवस्था असल्याने 'ग्रंथसहवास' खरोखरीच घडतो. एकूण व्यवस्था, मांडणी आणि त्यासोबतच ग्रंथालयातील सर्व व्यक्तींचे सौजन्यही मनावर सुंदर ठसा उमटवून गेले. मनापासून धन्यवाद!

श्री. डॉ. द. भि. कुळकर्णी ज्येष्ठ समीक्षक, 'माजी अ.भा.म.साहित्य संमेलनाध्यक्ष,पुणे'

या ग्रंथालयाशी अभ्यासक म्हणून माझे नाते केवळ दीर्घकालीनच नाही तर उत्कट, भावपूर्णही आहे. अभ्यासक म्हणून मला घडविण्यास या ग्रंथालयाचा वाटा फार मोठा आहे. ग्रंथालय आणि ग्रंथसंग्रहालय या दोन भिन्न संज्ञा आहेत. हे लक्षात घेऊन आपण विदर्भातील निवडक नामवंत साहित्यिकांचे साहित्य व त्यावरील साहित्य यांचे स्वतंत्र उपविभाग करावेत, ही विनंती. ग्रंथालयाचे नवे रूप अभ्यासकांना हुरूप देईल.

अरुण टिकेकर ज्येष्ठ संपादक/चरित्रकार आणि माजी अध्यक्ष एशियाटिक लायब्ररी, मुंबई

वाचकाला कोणत्याही ग्रंथालयाला भेट देताना नेहमीच आनंद होतो. त्यात ते ग्रंथालय शंभरीच्या आसपास आलेले असेल तर त्यामधील ग्रंथ पाहताना, न्याहाळताना आणि हाताळताना एक प्रकारच्या उच्च कोटीतील आनंद होतो. विदर्भ साहित्य संघाच्या नव्या वास्तूत संघाचे ९० वर्षांचे ग्रंथालय घडले. आता नवनव्या कल्पना या ग्रंथालयाच्या संदर्भात आखल्या जात आहेत. आधुनिकतेचा मार्ग स्वीकारत आहे. माझ्या शुभेच्छा!

दत्तप्रसाद दाभोळकर विचारवंत,सातारा

या ग्रंथालयाला भेट देणे हा मी आयुष्यातील सुवर्णयोग मानतो. मन प्रसन्न झाले. महाराष्ट्रात मराठी भाषेसाठी एवढे सुनीयोजन काही कुठे आढळले नव्हते. यापूर्वी रशिया कोसळण्यापूर्वी रशियात अशी मोठी पण तरीही आपली घरगुती वाटणारी चैतन्याने भरलेली ग्रंथालये पाहिली होती. विदर्भ आमचा आहे असे म्हणणाऱ्या उर्वरीत महाराष्ट्राने असे काही करण्याचा संकल्प प्रमुख शहरात, किमान एका शहरात तरी करून तो प्रत्यक्षात आणावा असे वाटते. आपल्या नेहमीच्या भाषेत सांगायचे तर येथे येऊन 'बॅटरी चार्ज' झाली. या ग्रंथालयाचे संगणकीकरण आणि महाराष्ट्रातील प्रमुख ग्रंथालये या ग्रंथालयाशी जोडणे फार गरजेचे आहे असे वाटते.

चारुता नानिवडेकर बडोदे, मराठी चरित्र अभ्यासक

विदर्भ साहित्य संघाचे ग्रंथालय मला स्वतःला अतिशय चांगले वाटले. इथे पुस्तक संग्रह लक्षणीय आहे. वातावरण स्वच्छ व आनंददायक आहे. मुख्यतः वाचनालयातील सर्व लोक श्री. दिलीप म्हैसाळकर व इतर कर्मचारी मदत करण्यास तत्पर व कर्तव्यशील आहेत. ह्या वातावरणात वचन व अभ्यास करण्याचा माझा अनुभव इतका छान वाटला की जेव्हाही मला शक्य होईल तेव्हा पुन्हा इथे येण्याचा मी नेहमीच प्रयत्न करीन. येथील सर्व लोकांना माझ्या सदिच्छा व त्यांचे मनःपूर्वक आभार!

गिरीश कार्नाड आंतरराष्ट्रीय कीर्तीचे नाट्य लेखक, हिन्दी चित्रपट अभिनेता, दिग्दर्शक, बेंगलुरू

A beautiful library. It's a pleasure to be a guest here.

अशोक कोठावळे संचालक, 'मॅजेस्टिक'प्रकाशन, संपादक 'ललित', मुंबई

काही वास्तूंचं असं वैशिष्ट्यं असतं की तिथे गेल्यावर तुम्हाला प्रसन्न वाटतं. घराची किंवा दुकानाची वास्तू खरेदी करताना ही प्रसन्नाता मी प्रथम बघतो. वि. सा. सं. च्या वास्तूत आल्यावर जे प्रसन्न आणि ऊर्जा देणारं वाटलं त्यांची कारण मला नेहमी वाटतं, त्या वास्तूत होणारे उपक्रम अभ्यागत ही त्या वास्तूची नेहमी शोभा वाढवित असतात. या वास्तूत असलेली ग्रंथसंपदा, रचना अतिशय सुरेख आहे. तिथे परत परत यावसं वाटतं. भविष्यात वि.सा.सं आणि 'मॅजेस्टिक' यांचा संबंध यायला हरकत वाटत नाही.

■■■

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक


युगवाणी

एप्रिल-मे-जून २०१५



चित्र : चंद्रगुप्त भालेराव

अनुक्रमणिका



ISSN-2319-6092

वार्षिक वर्गणी : २०० रूपये

पत्ता :
विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक,
नागपूर - ४४० ०१२
दूरध्वनी : ०७१२-२५२३९२९, २५५३७६७

संपादकीय पत्रव्यवहार :
प्रा. अजय देशपांडे
वामनघाट मार्ग, हनुमान नगर,
वणी - ४४५ ३०४, जि. यवतमाळ.
भ्रमणभाष : ९८५०५९३०३०
ई-मेल : srushti_ajay@rediffmail.com
yugwanivss@rediffmail.com

www.facebook.com/yugwani.ank@gmail.com

श्री विदर्भ साहित्य संघ
विदर्भ विषयः सारस्वतीजन्मभूः ॥
मकर संक्रांत १९२३

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक
युगवाणी

अनुक्रमणिका